जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २३ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०

ट्रक ड्रायव्हरला तब्बल १२ कोटींची बंपर लॉटरी!

मोहाली /वृत्तसंस्था- पंजाबमधील मोहाली येथे एका ट्रक चालकाचे नशीब फळफळले असून त्याला बंपर लॉटरी लागली आहे. या ड्रायव्हरने लॉटरीमध्ये तब्बल १२ कोटी रुपये जिंकले आहेत. त्यांनी ५०० रुपयांचे तिकीट खरेदी केले होते. गेल्या १५ वर्षांपासून आपण सातत्याने लॉटरीचे तिकीट खरेदी करत होतो, असे लॉटरी विजेते ट्रक चालक बलजिंदर सिंह यांनी सांगितले आहे. बलजिंदर यांना विश्वास होता की कधीना कधी मला लॉटरी लागेल म्हणून ते आज सत्य झाले आहे.

पंजाबच्या मोहाली जिल्ह्यात राहणाऱ्या या ट्रक ड्रायव्हरचे नशीब एका रात्रीत पालटले आहे. बलजिंदर सिंह यांनी २०२६ च्या 'पंजाब स्टेट डिअर दिवाळी बंपर लॉटरी'चे पहिल्या क्रमांकाचे बक्षीस १२ कोटी रुपये जिंकले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बलजिंदर सिंह गेल्या १५ वर्षांपासून न चुकता प्रत्येक सणाला लॉटरीचे तिकीट खरेदी करत होते. अखेर त्यांच्या या विश्वासाला फळ मिळाले आहे. नशीबाने त्यांना यंदा साथ दिली आहे एका रात्रीत ते करोडोचे मालक झाले आहेत.

धुळ्यातील भाविकांचा राजस्थानात अपघात, एकाच कुटुंबातील ९ जण ठार

क्रूझर उभ्या ट्रकला धडकली; खाटू श्यामजीहून येत होते परत







कोटा, /वृत्तसंस्था- कोटा-उदयपूर राष्ट्रीय महामार्ग-५२ वर शनिवारी मध्यरात्री १ च्या सुमारास रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका ट्रकला भरधाव वेगातील 'क्रूझर'ने धडक दिली. या अपघातात क्रूझरमधून प्रवास करणारे एकाच कुटुंबातील नऊ जण ठार झाले. मृतांत दोन लहान मुलांचाही समावेश आहे.

या दुर्घटनेत ट्रक चालकासह इतर सात जण जखमी झाले आहेत. ही घटना कोटा येथील नाटा पोलीस ठाण्याच्या हद्दीत, शंभूपुरा गावाजवळ घडली. मृतदेह आणि जखमी व्यक्ती वाहनात अडकले होते. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढून 'न्यू मेडिकल कॉलेज हॉस्पिटल'मध्ये दाखल केले.

पोलीस अधीक्षक (एसपी) तेजस्विनी गौतम यांनी सांगितले की, क्रूझरमध्ये एकाच कुटुंबातील १५ सदस्य होते. ते महाराष्ट्रातील धुळे येथील रहिवासी असून खाटू श्यामजी मंदिराच्या दर्शनावरून परतत होते.

पोलिसांच्या माहितीनुसार, ३६ जणांचे एक कुटुंब मंगळवारी धुळ्यावरून धार्मिक तीर्थयात्रेसाठी तीन वेगवेगळ्या वाहनांतून निघाले होते. त्यांनी या प्रवासात मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर आणि उज्जैन, तसेच राजस्थानमधील सांवरिया सेठ, अजमेर आणि पुष्करला भेट दिली. त्यानंतर शनिवारी सकाळी ११:०० वाजता ते खाटूश्यामजी येथे पोहोचले होते.

अपघातातील मृत व्यक्तींची नावे - उषाबाई सज्जन पवार (६० वर्षे), रा. शांतिगीत नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. सुशिलाबाई बाबूलाल पवार (६५ वर्षे), रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. कैलास भगवान पवार (४५ वर्षे), रा. अमराळे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. सान्वी गणेश पवार (६ वर्षे), रा. शांतिगीत नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. सज्जन दौलत पवार (७० वर्षे), रा. शांतिगीत नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. अनिता कैलास पवार (४० वर्षे), रा. अमराळे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. बाबूलाल दौलत पवार रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. जानवी कैलास पवार (१३ वर्षे), रा. अमराळे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. माधवी गणेश पवार (४५ वर्षे), रा. शांतिगीत नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. मृत व्यक्तींमध्ये धुळे शहरातील शांतिगीत नगर येथील ४, नवनाथ नगर येथील २ आणि शिंदखेडा तालुक्यातील अमराळे येथील ३ व्यक्तींचा समावेश असल्याची माहिती जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली आहे.

अपघातात जखमी व्यक्तींची नावे- जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाकडून प्राप्त सुधारित माहितीनुसार, अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींची नावे, वय व पत्ते पुढीलप्रमाणे आहेत. मनीषा शरद पवार (४१ वर्षे), रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. मयुरी शरद पवार (२० वर्षे), रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. जगदीश कैलास पवार (१० वर्षे), रा. अमराळे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. श्रीजीत गणेश पवार (४ वर्षे), रा. शांतिगीत नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. शरद बाबूलाल पवार (४५ वर्षे), रा. नवनाथ नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. गणेश सज्जन पवार (३२ वर्षे), रा. शांतिगीत नगर, सुरत बायपास, ता. जि. धुळे. कोटा येथील पोलीस नियंत्रण कक्षाकडून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे मृत व जखमी व्यक्तींची सुधारित नावे, वय आणि पत्त्यांचा तपशील उपलब्ध करून देण्यात आल्याचे धुळे जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाने कळविले आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, दुर्घटनेबाबत पुढील अधिकृत माहिती प्राप्त झाल्यानंतर अधिक तपशील स्पष्ट होणार असल्याची माहिती जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री म्हणाले - अपघात अत्यंत दुःखद

मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी 'एक्स' वर लिहिले: 'कोटा-उदयपूर महामार्गावर शंभूपुरा जवळ झालेल्या रस्ते अपघातात प्राणहानी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. शोकग्रस्त कुटुंबांच्या दुःखात मी सहभागी आहे.' 'मी संबंधित अधिकाऱ्यांना जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार मिळतील याची खात्री करण्याच्या आणि बाधित कुटुंबांना सर्वतोपरी मदत पुरवण्याच्या सूचना दिल्या आहेत. जखमी व्यक्ती लवकर बरे व्हाव्यात, अशी मी प्रार्थना करतो.'

राष्ट्रपतींनी व्यक्त केली शोकसंवेदना- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कोटा येथील रस्ते अपघाताबाबत 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून शोक व्यक्त केला आहे.

अपघाताची माहिती मिळताच सिटी एसपी तेजस्विनी गौतम घटनास्थळी पोहोचल्या. त्यांनी वाहनात अडकलेल्या व्यक्तींच्या ☞(पान २ वर)

'तलाव भरण्यासाठी अजित पवारांना आणायचं का?',

आनंदराज आंबेडकरांचं वक्तव्य; राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक!



मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि जलसंधारण धोरणावरून राज्य सरकारवर टीका करताना रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा संदर्भ देत एक वादग्रस्त विधान केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळं राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त इऊद या वृत्तसंस्थेनं दिलं आहे.

रिपब्लिकन सेनेच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी जालना शहरात आयोजित जाहीर मेळाव्यात आनंदराज आंबेडकर बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यातील पाणीटंचाईच्या मुद्द्यावरून सरकारच्या धोरणांवर जोरदार निशाणा साधला. सभेला संबोधित करताना आनंदराज आंबेडकर म्हणाले की, 'आपले राज्यकर्ते जनतेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' असं आवाहन करतात. पण ज्या भागात पाऊसच पडत नाही, तिथं काय करायचं? तलाव भरण्यासाठी अजित पवारांना आणायचं का?' त्यांच्या या विधानानंतर उपस्थितांमध्ये एकच चर्चा सुरू झाली.

माफी मागा; राष्ट्रवादीचा इशारा!

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी' वर पोस्ट करत आनंदराज आंबेडकर यांच्यावर टीका केली आहे. 'आनंदराज आंबेडकर यांनी स्व. अजितदादा पवार यांच्यावर केलेल्या विधानाचा आम्ही जाहीर निषेध करतो. हयात नसलेल्या व्यक्तीवर बोलून त्यांनी अक्कलेची दिवाळखोरी दाखवलेली आहे. फक्त आंबेडकर आडनाव ☞(पान २ वर)

२५ जानेवारीपासून घरोघरी होणार जनगणना; १० ते २४ जानेवारीदरम्यान स्वयंगणना

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची माहिती



मुंबई/प्रतिनिधी : जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यातील लोकसंख्या गणनेचे काम अचूक, पारदर्शक आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने या कामास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. जनगणनेच्या माध्यमातून संकलित होणारी माहिती पुढील नियोजन आणि विविध विकासकामांसाठी महत्त्वपूर्ण असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले. २५जानेवारीपासून घरोघरी तर १० ते २४ जानेवारीदरम्यान ऑनलाइन पद्धतीने स्वयंगणना नोंदवता येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रधान जनगणना अधिकाऱ्यांची राज्यस्तरीय परिषद २१ नोव्हेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्घाटन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या आभासी उपस्थितीत झाले.

जनगणनेतील माहिती अचूक असणे ☞(पान २ वर)

विरोधकांचे देश अस्थिर करण्याचे प्रयत्न- राधाकृष्ण विखे



अहिल्यानगर /प्रतिनिधी :: जगातील काही देशांना भारताची प्रगती पहावत नसल्याने ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार अस्थिर करण्यासाठी देशातील विरोधकांना पैसा पुरवत आहेत. राहुल गांधी व काँग्रेसने देश परदेशातून नाही तर संसदेतून चालतो, हे लक्षात घ्यावे. पंतप्रधान मोदी यांची बदनामी भाजप खपवून घेणार नाही. जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशारा जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी आज, रविवारी सायंकाळी शहरातील सभेत दिला.

विरोधकांना प्रत्युत्तर देण्यासाठी भाजपने 'लोकशाही वाचवा-अराजकता हटवा' अशी घोषणा देत आज सायंकाळी शहरात मोर्चाचे आयोजन केले होते. या मोर्चाचे रूपांतर नंतर दिल्ली दरवाजा भागातील जाहीर सभेत झाले. त्यावेळी पालकमंत्री विखे बोलत होते. तत्पूर्वी जुन्या बसस्थानक चौकातील ☞(पान २ वर)

आठ वर्षांचं नातं संपवलं, प्रियकराने थेट प्रेयसीचं घरच पेटवलं



मुंबई/प्रतिनिधी : आठ वर्षांपासून सुरू असलेले प्रेमसंबंध संपवण्याचा निर्णय प्रेयसीने घेतल्याने संतापलेल्या तरुणाने थेट तिचे घरच पेटवून दिल्याची धक्कादायक घटना महाराष्ट्रातील डोंबिवली येथे उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दीपेश रस्तोगी असे याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपी तरुणाचे नाव असून, मानपाडा पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. या भीषण आगीतून संबंधित तरुणी आणि तिचे आई-वडील सुदैवाने सुखरूप बचावले असून, वेळीच प्रसंगावधान राखल्यामुळे मोठा अनर्थ टळला आणि कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या घटनेबद्दलचे सविस्तर वृत्त इंडिया टुडेने दिले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित तरुणी डोंबिवलीतील एका उच्चभ्रू आणि शांत परिसरात आपल्या आई-वडिलांसह राहते. तिचे आरोपी दीपेश रस्तोगी याच्यासोबत गेल्या सात ते आठ वर्षांपासून प्रेमसंबंध होते. सुरुवातीच्या काळात सर्वकाही सुरळीत असताना, कालांतराने दोघांमध्ये विविध कारणांवरून मतभेद निर्माण होऊ लागले. हे वाद वाढत गेल्याने अखेर तरुणीने हे जुने नाते संपवण्याचा आणि वेगळे होण्याचा ठाम निर्णय घेतला. तिने आपला हा निर्णय दीपेशला कळवला होता. मात्र, प्रेयसीने ब्रेकअपचा निर्णय घेतल्याने दीपेशने संतापाच्या भरात टोकाचे पाऊल उचलण्याचे ठरवले.

प्रेयसीने संबंध संपवण्याचा निर्णय घेतल्याने संतापलेल्या दीपेशने तिच्या घराला आग लावल्याचा आरोप आहे. अचानक घरात आग लागल्याने परिसरात आणि घरातील सदस्यांमध्ये भीती पसरली. मात्र, तरुणी आणि तिच्या आई-वडिलांनी वेळीच घराबाहेर धाव घेतल्याने तिघांचेही प्राण वाचले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. ☞(पान २ वर)

डागाळलेल्या अधिकाऱ्याच्या नियुक्तीवरून महायुतीत खडाजंगी; भाजपा आमदाराकडून थेट सेनेच्या खात्याला लक्ष्य



मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील सत्ताधारी युतीतील घटक पक्ष असलेल्या भाजपा आणि शिवसेनेमध्ये पुन्हा एकदा मतभेद उफाळून आले आहेत. राज्य कामगार विमा सोसायटीच्या वैद्यकीय संचालकांच्या नियुक्तीवरून हा नवा वाद निर्माण झाला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. भाजपा आमदार नमिता मुंदडा यांनी डॉ. अशोक थोरात यांच्या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. बीड जिल्ह्यातील कोविड-१९ मदत कार्यातील अनियमिततेप्रकरणी डॉ. थोरात यांना यापूर्वी निलंबित करण्यात आलं होतं, तसेच नाशिक जिल्ह्यातही त्यांच्यावर अशाच प्रकारच्या अनियमिततेचं आणि एका फौजदारी गुन्ह्याचे आरोप आहेत. राज्याचे आरोग्यमंत्री शिवसेनेचे नेते प्रकाश आबिटकर असताना, मुंदडा यांनी भाजपाच्या राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांना पत्र लिहून या प्रकरणाकडे लक्ष वेधलं आहे. तसंच त्यांनी विधानसभेतही थोरात यांच्या निलंबनाची मागणी केली आहे. या आरोपांना प्रत्युत्तर देताना डॉ. थोरात यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आपल्या विभागाला पत्र लिहिलं आहे. आपल्याला जाणीवपूर्वक लक्ष्य केलं जात असून, कोणत्याही वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यामार्फत चौकशीला सामोरं जाण्यास आपण तयार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. डॉ. थोरात यांच्या पत्नी बीडमधील शिवसेना नेत्या आहेत. मार्च २०२५ मध्ये, बीडमधील कोविड-१९ काळातील आर्थिक अनियमिततेच्या आरोपांवरून शिवसेना नेते आबिटकर यांनीच विधिमंडळात डॉ. थोरात यांच्या निलंबनाची घोषणा केली होती. मात्र, नंतर हे निलंबन मागे घेण्यात आलं आणि डॉ. थोरात यांना ऐघ्ए मध्ये प्रतिनियुक्तीवर पद देण्यात आलं.

मुख्यमंत्र्यांचा आदेश धुडकावून बँका, फायनान्स ☞(पान २ वर)



सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

डॉ.संदीप दानखडे यांची महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ञ संघटनेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड

अमरावती/प्रतिनिधीः-नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ञ संघटनेच्या उपाध्यक्षपदी अमरावती शहरातील ख्यातनाम बालरोग तज्ञ डॉ. संदीप दानखडे यांची २०२७ सालच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

संपूर्ण महाराष्ट्रात सहा हजार पेक्षा जास्त बालरोगतज्ञ् सदस्य संख्या असलेल्या महाराष्ट्र बालरोग तज्ञ संघटनेची वार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली. यामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून मुंबई येथील माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बकुल पारीख, तसेच पुणे येथील डॉ. संजय ललवाणी व नागपूर येथील डॉ.संजय मराठे यांनी कामकाज पाहिले.

डॉ.संदीप दानखडे हे अमरावती येथे वरिष्ठ बालरोग तज्ञ म्हणून गेल्या २७ वर्षांपासून कार्यरत असून ते डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज येथील बालरोग विभागातही अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

डॉ. संदीप दानखडे यांनी यापूर्वी अमरावती बालरोग तज्ञ संघटनेचे अध्यक्षपदासह महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ञ संघटनेच्या विविध पदांवर कार्य केले असून अनेक राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये तज्ञ व्याख्याते म्हणून आपली छाप पाडली आहे. यापूर्वीही २००५ यावर्षी झालेल्या महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ञ संघटनेच्या वार्षिक परिषदेचे आयोजन सहसचिव पदाची तसेच २०१९ यावर्षी झालेल्या महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ञ संघटनेच्या राज्य परिषदेची आयोजन सचिव पदाची जबाबदारी सांभाळली आहे.

रोटरी, जायंट्स, जेसीज सह विविध सामाजिक संघटनांमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या तसेच विविध पदांवर समर्थपणे जबाबदारी सांभाळणारे डॉ.संदीप दानखडे हे इंडियन मेडिकल असोसिएशनचे अमरावती शाखेचे नियोजित अध्यक्षही आहेत.

अत्यंत मानाची समजली जाणारी ही निवडणूक सुरळीत पार पडण्यासाठी महाराष्ट्र राज्य संघटनेचे बालरोग तज्ञ



संघटनेचे २०२६ चे अध्यक्ष डॉ. संजीव जोशी, उपाध्यक्ष डॉ. अमोल पवार, सचिव डॉ. रेणू बोराळकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सदरचा बहुमान विदर्भातील अमरावतीला मिळण्यामागे बालरोग तज्ञ संघटना अमरावती शाखेतील सर्व सक्रिय सदस्य, पदाधिकारी तसेच विदर्भातील व राज्यातील वरिष्ठ बालरोग तज्ञ, याचप्रमाणे राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील संघटनेचे वरिष्ठ पदाधिकारी यांचे मार्गदर्शन व सहकार्य असल्याचा विनम्रपणे उल्लेख केला.

बालरोग तज्ञ संघटना अमरावती शाखेच्या अध्यक्ष - डॉ. प्रतिभा विनय काळे, सचिव - डॉ. आदित्य टांक, कोषाध्यक्ष - डॉ. सुरज बनसोड तसेच वरिष्ठ बालरोग तज्ञ डॉ. सतीश तिवारी, डॉ. सतीश अग्रवाल, डॉ.जयंत पांढरीकर, डॉ. राजेश बुब, डॉ. श्रीपाद जहागीरदार, डॉ. भूपेश भोंड,डॉ. रोहन बोबडे, डॉ.राजेश शर्मा, डॉ. धीरज सवाई यांचेसह सर्व बालरोग तज्ञांनी एका पत्रकाद्वारे अभिनंदन केले. तसेच आय एम ए चे अध्यक्ष डॉ.दिनेश वाघाडे व सचिव डॉ. विक्रम वानखडे यांचेसह संपूर्ण कार्यकारिणीने अभिनंदन केले.

महाराष्ट्र राज्य बालरोगतज्ञ संघटनेची २०२७ सालची नवनियुक्त कार्यकारिणी पुढील प्रमाणे राहील. अध्यक्ष - डॉ विनायक पाटील(अलिबाग, नियोजित अध्यक्ष -डॉ सुचित तांबोळी(अहिल्यानगर), उपाध्यक्ष - डॉ. संदीप दानखडे(अमरावती), सचिव - डॉ. रेणू बोराळकर(छत्रपती संभाजी नगर कोषाध्यक्ष -डॉ. महेश अहिरराव, सहसचिव(प्रशासन)- डॉ. सागर भालेराव(नाशिक), तसेच कार्यकारणी सदस्य पदी मुंबई व कोकण विभागातून डॉ. प्रमोद वानखेडे व डॉ. गौरी कुलकर्णी, विदर्भ विभागातून डॉ. गुरुप्रसाद थेटे व डॉ. संदीप मोंगरे,पश्चिम महाराष्ट्र विभागातून डॉ. शरद घाडगे व भूषण मिरजे तसेच मराठवाडा विभागातून डॉ. स्नेहल नागरे व विनोद तोतले व उत्तर महाराष्ट्र विभागातून डॉ संगीता लोढा बाफना व डॉ. दादाभाई पाटील यांचा समावेश राहील. सदरच्या निवडीबद्दल संघटनेतर्फे तथा समाजाच्या विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून उत्तम कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची सुनील खराटे यांनी घेतली भेट

अमरावतीमधील विविध प्रश्नांवर चर्चा

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी सुनील खराटे यांनी आज मुंबई येथे अन्न व औषध प्रशासन म्हणजेच एफ डी ए चे आयुक्त तुकाराम मुंढे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी अमरावती च्या विकासाशी संबंधित विविध विषय, प्रशासकीय कामकाज तसेच जनहिताच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी तुकाराम मुंढे यांनी प्रशासकीय सेवेत केलेल्या कार्याबद्दल जनतेच्या वतीने सुनील खराटे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.या भेटीदरम्यान मुंढे यांनी विशेषतः अन्न सुरक्षा व अन्नविषयक जनजागृती या विषयावर काम करण्याचे आवाहन केले. नागरिकांनी कोणते अन्न खावे, अन्नाचा दर्जा कसा असावा, अन्नपदार्थ खरेदी करताना कोणती काळजी घ्यावी, स्वच्छ व सुरक्षित अन्न कसे ओळखावे, तसेच बाहेरचे अन्न सेवन करताना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात, याबाबत समाजात व्यापक जनजागृती करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

केवळ अन्न उपलब्ध असणे महत्त्वाचे नसून ते सकस, स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी असणेही तितकेच आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

या सूचनेची दखल घेत सामाजिक कार्यकर्ते सुनील खराटे यांनी अमरावती येथे विविध जनजागृतीपर कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित करून अन्न सुरक्षा, सुरक्षित अन्नपदार्थांची निवड, अन्नाचा दर्जा आणि आरोग्यदायी आहार याविषयी नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात येईल, असे सांगितले. अन्न सुरक्षा ही प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याशी निगडित महत्त्वाची बाब असून, या अभियानाच्या माध्यमातून समाजात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार असे सुनील खराटे यांनी सांगितले.

१ व १० वरील उर्वरित

धुळ्यातील भाविकांचा राजस्थानात

सुटकेच्या कार्यावर देखरेख ठेवली. जखमींना रुग्णवाहिकेद्वारे 'न्यू मेडिकल कॉलेज हॉस्पिटल'मध्ये हलवण्यात आले.

एसपी तेजस्विनी गौतम यांनी सांगितले की, 'क्रूझर' (एक प्रकारची बहुउपयोगी गाडी) मधील सर्व प्रवासी धुळे (महाराष्ट्र) येथील रहिवासी होते आणि ते खाटू श्यामजींच्या दर्शनावरून परतत होते. प्राथमिक माहितीनुसार, चालकाला डुलकी लागल्यामुळे हा अपघात झाला असावा, असे दिसून येते.

८ जणांचा घटनास्थळीच मृत्यू

न्यू मेडिकल कॉलेज हॉस्पिटलचे अधीक्षक डॉ. आशुतोष शर्मा यांनी सांगितले की, ८ जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. याव्यतिरिक्त, माधवी नामक महिला रुग्णालयात मरण पावली. आठ जखमी व्यक्तींवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत; त्यापैकी मनीषाला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे.

३६ जण ३ वाहनांतून तीर्थयात्रेला निघाले होते

'क्रूझर' गाडीच्या मागे असलेल्या वाहनातून प्रवास करणाऱ्या प्रदीप यांनी सांगितले की, हे सर्व कुटुंबीय मंगळवारी धुळे (महाराष्ट्र) येथून तीर्थयात्रेसाठी निघाले होते. एकूण ३६ कुटुंबीय तीन वेगवेगळ्या वाहनांतून प्रवास करत होते. ते सर्व एकमेकांचे नातेवाईक आहेत.

त्यांनी सर्वप्रथम मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर आणि उज्जैनला भेट दिली. त्यानंतर, राजस्थानमार्गे प्रवास करताना त्यांनी सांवरिया सेठ, अजमेर आणि पुष्करला भेट दिली आणि शेवटी खाटू श्यामजी येथे पोहोचले. शनिवारी संध्याकाळी ते खाटू श्यामजी येथून निघाले.

रात्री साडेदहाच्या सुमारास हा समूह जेवणासाठी जयपूरमध्ये थांबला. जेवण झाल्यावर, पहिली गाडी इतर गाड्यांच्या अर्धा तास आधी तिथून निघाली. त्यानंतर, दुसऱ्या गाडीतील कुटुंबीय कोटाच्या दिशेने जात असताना, त्यांची 'क्रूझर' गाडी नंता परिसरातील शंभूपुरा येथे एका उभ्या असलेल्या ट्रकवर आदळली.

'तलाव भरण्यासाठी अजित

असलं म्हणजे अक्कल असतेच असं नाही. स्व. अजितदादांवर केलेल्या विधानाची त्यांनी जाहीर माफी मागावी, अन्यथा संविधानिक पद्धतीने त्यांना भेटतील तिथे विरोध करू.'

आनंदराज आंबेडकरांनी आपल्या वक्तव्याचा बचाव कसा केला?

'मी हा उल्लेख वेगळ्या पद्धतीने केला होता. त्यांनी पाण्यासंदर्भात जे वक्तव्य केलं होतं, त्यामुळं मी हे उपरोधिकपणे केलेलं वक्तव्य आहे.' अशी प्रतिक्रिया आनंदराज आंबेडकरांनी माध्यमांशी संवाद साधताना दिली.

२५ जानेवारीपासून घरोघरी

महत्त्वाचे – डॉ. निरुपमा डांगे

संयुक्त सचिव (भारत सरकार) व मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, महाराष्ट्र डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी जनगणनेतील माहिती अचूकपणे संकलित करण्याचे महत्त्व विशद केले. जनगणनेतील त्रुटींचा परिणाम मतदारसंघ पुनर्रचना, वैधानिक आरक्षण तसेच आगामी दशकातील लोकसंख्याविषयक मूलभूत आकडेवारीवर होऊ शकतो. त्यामुळे राज्यभरात तैनात करण्यात येणाऱ्या सुमारे २.८४ लाख प्रगणक व पर्यवेक्षकांनी प्रत्येक व्यक्तीची नोंद होईल, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले. बेघर व्यक्ती, वसतिगृहे, कारागृहे, हॉटेल्स, पेइंग गेस्ट निवासस्थाने तसेच दुर्गम आणि वंचित भागांतील लोकसंख्येची नोंद घेण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यासाठी ४० प्रश्नांची डिजिटल प्रश्नावली, प्रगणकांसाठी पीई मोबाइल ?प, ऑनलाइन स्वयं-गणना आणि रिअल-टाइम देखरेख प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

शहरी भागातील आव्हानांचा विचार करून नियोजन करा – डॉ. के. एच. गोविंदराज

अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांनी शहरी भागातील जनगणनेदरम्यान येणाऱ्या आव्हानांकडे लक्ष वेधले. महाराष्ट्राच्या लोकसंख्येतील सुमारे ५० टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत असल्याने स्थलांतर, नागरिकांची सततची ये-जा, दाट वस्ती आणि शहरांचा विस्तार यांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बंद किंवा रिकाम्या घरांसाठी आवश्यकतेनुसार पुन्हा भेटी देणे, प्रगणकांची नियुक्ती व प्रशिक्षण वेळेत पूर्ण करणे, तसेच त्यांना आवश्यक सुविधा आणि मानधन उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला.

प्रशिक्षण आणि पूर्वतयारी वेळेत पूर्ण करा – रणजित सिंग देओल

प्रधान सचिव व राज्य नोडल अधिकारी रणजित सिंग देओल यांनी जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या वेळापत्रकाची आणि राज्यातील तयारीची माहिती दिली. प्रगणक व पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या, प्रशिक्षण आणि संबंधित प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांनी जिल्हास्तरीय प्रशिक्षणात सहभागी होऊन कामकाजाचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

विरोधकांचे देश अस्थिर

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास मंत्री विखे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे, आमदार मोनिका राजळे, आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मोर्चाला सुरुवात करण्यात आली. शहराच्या प्रमुख रस्त्यावरून पक्षाचे झेंडे घेऊन निघालेला मोर्चा दिल्ली दरवाजा येथे नेण्यात आला.

यावेळी मंत्री विखे म्हणाले, हा मोर्चा म्हणजे शक्तीप्रदर्शन नव्हे तर विरोधकांच्या भीडतंत्राच्या विरोधात, लोकशाहीच्या संरक्षणाचा निर्धार आहे. राहुल गांधी संसदेत बोलत नाहीत मात्र परदेशात जाऊन देशाबद्दल नकारात्मक भूमिका मांडत आहेत. पंतप्रधानांची बदनामी करत आहेत. मोदी यांनी संविधान दिन सुरू केला, मात्र संविधानाची प्रत घेऊन फिरणाऱ्या राहुल गांधी आणि काँग्रेसने संविधानाची पायमल्ली केली. मोदी यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात भारत १५ व्या स्थानावरून जगातील तिसरी महाशक्ती बनला. हे जगातील काही देशांना पाहवत नाही. त्यातूनच विरोधकांच्या माध्यमातून देश अस्थिर करण्याचा प्रयत्न सुरू आहेत.

आठ वर्षांचं नातं संपवलं

मानपाडा पोलिसांकडून आरोपीला अटक

घटनेची माहिती मिळताच मानपाडा पोलिसांनी तपास सुरू केला आणि दीपेश रस्तोगी याला अटक केली. घराला आग लावताना आरोपीचा तरुणी आणि तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याचा हेतू होता का, याचाही तपास पोलीस करत आहेत. मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली आहे.

डागाळलेल्या' अधिकाऱ्याच्या नियुक्तीवरून

जप्ती ; राज्य शासनाचा धाक नसल्याचा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शिंदे यांचा आरोप

मुंदडा यांनी सप्टेंबर २०२५ आणि ऑगस्ट २०२६ मध्ये बोर्डीकर यांना पाठवलेल्या पत्रांमध्ये नाशिकमधील कथित ३.३७ कोटी रुपयांचा कोविड आयसीयू घोटाळा, बीडमधील आर्थिक अनियमितते ची चौकशी आणि बीड जिल्ह्यातीलच केज येथील एका गर्भपात प्रकरणाचे आरोप केले आहेत. आरोग्य विभागातील सूत्रांच्या मते, हे प्रकरण प्रशासकीय बाबीपेक्षा अधिक राजकीय वळण घेत आहे.

सत्य बाहेर येईल-मुदंडा

इंडियन एक्स्प्रेसने या संदर्भात संपर्क साधला असता मुंदडा म्हणाल्या की, त्यांनी या सर्व प्रकरणांचा उल्लेख सभागृहात अनेक वेळा केला आहे. 'याची चौकशी सुरू असून त्यातून सर्व सत्य बाहेर येईल, असा आम्हाला विश्वास आहे', असं त्या म्हणाल्या. हा वाद भाजपा आणि शिवसेनेतील प्रशासकीय संघर्षातून निर्माण झाला आहे का, असं विचारले असता त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. केज येथील डॉक्टर डॉ. चंद्रकांत लामतुरे यांनी थोरात यांच्याविरोधात दाखल केलेल्या अशाच एका तक्रारीची चौकशी मुख्यमंत्री कार्यालयाकडूनही सुरू आहे. या तक्रारीबाबत दोन्ही मंत्र्यांनी मौन बाळगणं पसंत केले आहे, तर आपल्यावरील कोणत्याही आरोपांवर भाष्य करणार नसल्याचे डॉ. थोरात यांनी म्हटले आहे.

मेळघाटातील प्रस्तावित जलविद्युत

मांडण्यात आली. या प्रकल्पाविरोधात गावपातळीपासून ते थेट मंत्रालयापर्यंत तीव्र लढा उभारण्याचा इशाराही शिवसेनेतर्फे देण्यात आला आहे.

या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांच्यासह उपजिल्हा प्रमुख आशिष वाटाणे, जिल्हा समन्वयक अभिजीत काळमेघ, युवासेना जिल्हा प्रमुख शिवराज चौधरी, चेतन जवंजाळ, तालुका प्रमुख अचलपूर अश्विन नागे, तालुका प्रमुख प्रमोद धनोकर, शहर प्रमुख सागर वाटाणे, विधानसभा समन्वयक सचिन ठाकरे, राहुल गावंडे उपजिल्हा प्रमुख सुमित घोगे, युवासेना विधानसभा संघटक,प्रतीक कळसकर,मुन्ना शर्मा उपस्थित होते.

मॉर्निंग वॉकला गेलेल्या युवकाला

दाखवत त्यांना तातडीने धामणगाव रेल्वे येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. कैलास खंडारे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या खंडारे यांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, अशोकनगरसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे. धडक देऊन पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा आणि चालकाचा शोध पोलीस घेत आहेत.

१४ वर्षीय रोहन जानवाडेचे 'मॅन्युप्लेटर'

हे इंग्रजी पुस्तक प्रकाशित केले असून ऑनलाइन अमेझॉन व फ्लिपकार्ट वर विक्रीस उपलब्ध आहेत व वरचेवर डिस्काउंट ही उपलब्ध असतात.

अमरावती शहरातील जयश्री देशमुख यांनी पहिले पुस्तक विकत घेतले असून ऑनलाइन ऑफलाइन दोन्ही कडे उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

रोहनी आई शोभा गृहिणी व बाबा हेमंत, एस टी महामंडळ येथे मेकॅनिक असून त्यांनी त्याला प्रोत्साहन दिले. त्यांच्या सह अरुणोदय इंग्लिश स्कुल च्या शिक्षकांनी सुद्धा त्याचा गौरव केला.स्वराध्या ग्रुपच्या वतीने आज छोटेखानी समारंभात त्याचा गौरव करण्यात आला असून सर्वांनी त्याला शुभेच्छा ही दिल्यात. या प्रसंगी डॉ गोविंद कासट, नगरसेवक ऋषिकेश देशमुख, प्रशांत महल्ले भोजराज काळे, हरीश हजारे, दिलीप हटवार, दिनकर तायडे ,स्वामींनी तायडे, गणेश बिजवे, मंगेश ठाकरे, मयूर डहाके, मयूर इंगळे योगेश सोनटक्के, राजेश हरकूट, दिलीप बागडे प्रशांत डांगे, पुरुषोत्तम खांडेकर,इत्यादी उपस्थित होते.

नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या

पाच हजाराची मदत जमा झाली नसल्याने या शेतकऱ्यांमध्ये सुद्धा नाराजी आहे. तालुक्यात ३० व ३१ जुलै रोजी शेती ही ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी ने बाधित झाली होती. यामध्ये शेकडो एकर मधील पीक बाधित झाले परंतु अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना घोषणा करूनही अद्यापही शासनाकडून मदत मिळाली नाही. तेव्हा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्याला प्रोत्साहन पर अनुदान केव्हा मिळणार याबाबत शासनाने घोषणा करून या शेतकऱ्यांना सुद्धा न्याय द्यावा. कारण या शेतकऱ्यांचा संयम सुटत असून अपेक्षा भंग होत आहे. घोषणाही घोषणाच ठरू नये अशी शंका निर्माण होत आहे. यापुढे आम्ही सुद्धा वेळेवर कर्ज भरावे की नाही असा विचार आता नियमित कर्ज फेड करणारा शेतकरी करू लागला आहे. कारण शासनाने नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सुद्धा सहानुभूतीपूर्वक विचार करून घोषणेनुसार ५० हजार रुपयाचे प्रोत्साहन पर अनुदान नियमित कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीने देण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून पुढे येत आहे.

भरधाव दुचाकीवर हुल्लडबाजी,

हातात चाकू असून तो हुल्लडबाजी करीत चालकाला आणखी वेगाने वाहन चालविण्यास चिथावणी देत होता. पोलिसांनी हाताने इशारा करून दुचाकी थांबविली. चालकाकडे वाहन चालविण्याचा परवाना विचारला असता, त्याने परवाना नसल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडून चाकू आणि दुचाकी जप्त केली. त्यांच्याविरुद्ध पोलिसांनी भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्यासह महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

शेतकऱ्यांची कर्जमाफीच्या नावाखाली थट्टा

कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, सरकारला आगामी निवडणुकांमध्ये पराभवाची भीती वाटत असल्याने दुष्काळी परिस्थितीचे कारण पुढे करून निवडणुका रोखण्याचे काम केले जात आहे. दुसरीकडे अनेक शेतकरी अद्याप कर्जमाफीपासून तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीच्या मदतीपासून वंचित आहेत. प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा मिळत नसताना कर्जमाफीचा मोठा गाजावाजा करून सरकार शेतकऱ्यांची थट्टा करीत आहे. सरकारच्या या धोरणांना आता जनता कंटाळली असून आगामी निवडणुकीत जनता सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवून देईल. काँग्रेस पक्ष पुन्हा सत्तेत येईल, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मेळाव्याच्या माध्यमातून युवक काँग्रेसच्या संघटनात्मक विस्तारावर विशेष भर देण्यात आला. ग्रामीण भागातील युवकांना पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणून गावागावांत काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्षाची ध्येयधोरणे जनतेपर्यंत पोहोचवून युवकांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले. या भव्य मेळाव्याचे नियोजन व आयोजन अचलपूर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत गोरले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल गाठे यांनी केले, तर प्रास्ताविक प्रशांत गोरले यांनी मांडले. मोठ्या संख्येने युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

६ डिसेंबरच्या अभिवादन यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हा- खा.बळवंत वानखडे

तालुका युवक काँग्रेस ही काँग्रेस पक्षाची महत्त्वाची ताकद असून गावागावांतील युवकांना संघटित करून शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार तरुण आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्याची जबाबदारी युवकांनी पार पाडावी, असे ते म्हणाले. या मेळाव्यात तालुक्याची जम्बो कार्यकारिणी जाहीर होऊन नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. ही संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. केवळ पदे स्वीकारून न थांबता प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या गावात संघटनेचे काम वाढवावे, जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

नांदगाव पेठ ग्रामपंचायतवर पुन्हा

बोडणा, नांदगाव पेठ आणि कामुंजा यांचा समावेश आहे. यामध्ये नांदगाव पेठ ग्रामपंचायतीचे सरपंच पद नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलेसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.तर सर्वसाधारण प्रवर्गामध्ये यावली शहीद, कुंड सर्जापूर, करजगाव, रेवसा, वडगाव, शिराळा, कसतुरा-मोगरा, काट आमला, देवळी, रोहनखेडा, नांदुरा पिंगळाई, डवरगाव, वायघोळी, कठोरा बुद्रुक, वडगाव माहोरे, डिगरगव्हाण, नांदुरा बुद्रुक, मासोद, वनारसी, नया अकोला, बोरगाव धर्माळे, सावंगा, पाढी, केकतपूर, चिंचखेड, पुसदा, पिंपळविहीर, टाकळी जहागीर, माहुली जहागीर आणि अंजनगाव बारी आदी ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

आरक्षण जाहीर झाल्याने आता गावपातळीवर सरपंच पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या हालचाली सुरू होणार आहेत. विशेषतः महिला आरक्षण असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये महिला उमेदवारांच्या निवडीबाबत चर्चा रंगण्याची शक्यता आहे. आगामी निवडणुकीत कोणाला संधी मिळणार, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

एटीएम कार्डची अदलाबदल करून ७३ हजार लंपास

अमरावती/प्रतिनिधीः- एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेलेल्या व्यक्तीच्या मागे उभे राहून मदतीच्या बहाण्याने त्याचे कार्डच बदलून घेण्यात आले. त्यानंतर संबंधित कार्डचा वापर करून खात्यातून तब्बल ७३ हजार ४० रुपये काढण्यात आले. एटीएममधील हातचलाखीचा हा प्रकार दर्यापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला असून, या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतुल (वय ४१, रा. धामोडी, ता. दर्यापूर) असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. शनिवारी, २१ नोव्हेंबर रोजी ते पैसे काढण्यासाठी एका एटीएम केंद्रात गेले होते. यावेळी त्यांच्या मागे एक अनोळखी व्यक्ती उभी होती. पैसे काढण्याच्या प्रक्रियेदरम्यान या व्यक्तीने अतुल यांच्याशी बोलणे सुरू केले. बोलण्याच्या ओघात त्यांचा विश्वास संपादन करून संशयिताने हातचलाखीने त्यांच्या एटीएम कार्डची अदलाबदल केल्याचा आरोप आहे. या प्रकाराची कल्पना नसल्याने अतुल गावंडे तेथून निघून गेले. दरम्यान, संबंधित अनोळखी व्यक्तीने त्यांच्या कार्डचा वापर करून बँक खात्यातून ७३ हजार ४० रुपये काढले. खात्यातून रक्कम कमी झाल्याचे लक्षात आल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.त्यानंतर त्यांनी दर्यापूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, संबंधित व्यक्तीचा शोध सुरू केला आहे.

डिव्हायडरवर बाईक धडकल्याने तरुणाचा मृत्यू

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- शहरातील पारिक पेट्रोल पंपाजवळ आज गुरुवार १९ नोव्हेंबर रोजी सकाळी झालेल्या भीषण रस्ते अपघातात १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. मृतकाचे नाव ऋत्विक संतोष मुरतकर आहे. बाईक चालवताना अचानक नियंत्रण सुटल्याने त्याची मोटार सायकल रस्त्यावर असलेल्या डिव्हायडरला जाऊन धडकली. धडक इतकी जोरदार होती की, तरुणाला गंभीर जखमा झाल्या आणि त्याने घटनास्थळीच प्राण सोडला.या घटनेमुळे अंजनगाव सुर्जी शहर आणि आसपासच्या परिसरात शोककळा पसरली आहे. माहिती नुसार ऋत्विक संतोष मुरतकर गुरुवारी सकाळी आपल्या मोटारसायकलने जात होता. याच दरम्यान पारिक पेट्रोल पंपाजवळ अचानक त्याच्या बाईकवरील नियंत्रण सुटले. बघता बघता भरधाव मोटारसायकल रस्त्याच्या मधोमध असलेल्या डिव्हायडरला जोरदार धडकली. धडक इतकी भीषण होती की, ऋत्विक गंभीररित्या जखमी झाला. डोक्याला आणि शरीराला गंभीर मार लागल्याने त्याला सावरण्याचा मौकाच मिळाला नाही आणि त्याचा घटना स्थळीच मृत्यू झाला.

क्रीडा महोत्सवः आरसीसी क्रिकेट

बॅट्समन बल्लाजी यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभाला गुड्डू शर्मा, सतीशजी चौधरी, विवेक राऊत, राजेश कडू सर, देवानंद खुणे, राजिक शेख, गजानन ठाकरे, हर्षल वाघ, राजीव शिवणकर, सुमेद सरदार, अमोल गवळी, प्रफुल मकेश्वर, शहजाद सौदागर, बबलू शहा, निशिकांत देशमुख, हाजी अनिस सौदागर, राहुल इमले व अरिहंत गेडाम यांची उपस्थिती होती. या क्रीडा महोत्सवाच्या आयोजनासाठी राजिक शेख, नंदा वाधवानी, राजेश कडू सर, सारंग देशमुख, भीमा मामा पवार, सचिन देशमुख, प्रदीप मेश्राम, सुमित चोरडिया, डॉ क्रांती सागर ढोले, निलेश भालेराव, सचिन खंडार, निशिकांत देशमुख, पिंटू हुसेन व संगपाल हरणे, यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजीव शिवणकर, संजय राठोड, सुमेद सरदार, अजय राऊत, सिद्धार्थ दाभाडे व निलेश बनसोडे यांनी परिश्रम घेतले. ग्रामीण भागातील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे, युवकांमध्ये क्रीडा संस्कृती रुजवणे आणि खेळाडूंना प्रोत्साहन देणे या उद्देशाने सुयश संस्थेच्या वतीने मागील तेरा वर्षांपासून क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव घेण्यात येत आहे.

अॅड. उर्वी केचे यांना पीएच.डी.

यावलीकर, काका-काकू - प्रा. शार्दुल व प्रा. डॉ. ज्योती (ठाकरे) केचे, प्रा. सौरभ व पल्लवी (चित्रकार) केचे, बहिणी- मृदुला केचे, तन्वी केचे आणि गौरी केचे, यांचे मोलाचे योगदान व प्रोत्साहन लाभले. कन्या सैदेही हिच्या प्रेमाळ सहवासानेही त्यांना सातत्याने प्रेरणा दिली. या सर्वांच्या मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रेमाबद्दल अॅड. उर्वी केचे यावलकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

पाहिजेत
रात्रपाळीत पार्ट टाईम मशीन वर कामासाठी होतकरु मुले पाहिजे
संपर्क
९९७५३१

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com



पत्र्याच्या गोठ्यात गर्भलिंग तपासणीचा काळा धंदा!

अमडापूर–लवाळा मार्गावर पीसीपीएनडीटी पथकाचा छापा



बोगस डॉक्टरसह तिघे जेरबंद, पोर्टेबल सोनोग्राफी मशीन जप्त



■ प्रतिनिधी | अकोला/ वाशिम ■

मुलींच्या जन्माआधीच त्यांचा जीव घेण्याच्या विकृत मानसिकतेला खतपाणी घालणाऱ्या अवैध गर्भलिंग निदानाच्या काळ्या धंद्याचा धक्कादायक प्रकार अमडापूर–लवाळा मार्गावर उघडकीस आला आहे. शेतातील एका पत्र्याच्या गोठ्यात पोर्टेबल सोनोग्राफी मशीनच्या साहाय्याने गर्भलिंग तपासणी सुरू असतानाच अकोला, वाशिम आणि बुलढाणा येथील पीसीपीएनडीटी विभागाच्या संयुक्त पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत बोगस डॉक्टर, वाशिम येथील एजंट आणि त्यांना मदत करणाऱ्या अन्य एका व्यक्तीला रंगेहात पकडण्यात आले. घटनास्थळावरून सोनोग्राफी मशीनसह तपासणीचे साहित्य जप्त करण्यात आले असून, तिघांविरुद्ध अमडापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गर्भलिंग निदानाचा हा अवैध व्यवसाय किती नियोजनबद्ध पद्धतीने सुरू होता, याची कल्पना या कारवाईवरून येते. रुग्णालयाऐवजी शेतातील पत्र्याचा गोठा, अत्याधुनिक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन आणि ठिकाण बदलून तपासणी करण्याची पद्धत, असा या कथित काळ्या धंद्याचा प्रकार समोर आला आहे.

सकाळपासून पाठलाग, आठ तासांनी सापळा यशस्वी!

संशयित बोगस डॉक्टर पोर्टेबल सोनोग्राफी मशीन घेऊन विविध ठिकाणी फिरत अवैध गर्भलिंग निदान करीत असल्याची गोपनीय माहिती अकोला उपसंचालक कार्यालयातील पीसीपीएनडीटी विभागाला मिळाली होती. या माहितीची गंभीर दखल घेत उपसंचालक डॉ. आरती कुलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली डिकॉय ऑपरेशनची आखणी करण्यात आली.

२१ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून विभागीय पथकाने संशयिताचा माग काढण्यास सुरुवात केली. वाशिम येथून सुरू झालेला पाठलाग अखेर अमडापूर–लवाळा मार्गावरील गणेश शंकरराव सूर्यवंशी यांच्या शेतातील पत्र्याच्या गोठ्यापर्यंत पोहोचला. तेथे डिकॉयच्या माध्यमातून सोनोग्राफी तपासणी सुरू करण्यात आली. संशयित डॉक्टर तपासणी करीत असतानाच दबा धरून बसलेल्या पथकाने दुपारी २ वाजता छापा टाकला आणि तिघांना रंगेहात पकडले.

मशीन जप्त; सायंकाळी गुन्ह्याची नोंद

कारवाईदरम्यान पोर्टेबल सोनोग्राफी मशीन आणि तपासणीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सायंकाळी ६ वाजता अमडापूर पोलीस ठाण्यात तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. उपजिल्हा रुग्णालय, चिखलीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. उमर सय्यद यांनी यासंदर्भात फिर्याद दिली.

अकोला परिमंडळाच्या पथकाची चौथी कारवाई

अकोला परिमंडळात पीसीपीएनडीटी विभागीय पथक सक्रियपणे कार्यरत असून, २०१७ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा येथे या पथकाने पहिली कारवाई केली होती. २०२६-२७ या वर्षातील ही चौथी यशस्वी कारवाई असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. या मोहिमेसाठी उपसंचालक डॉ. आरती कुलवाल, बुलढाण्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार आणि वाशिमचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त पथकाने कामगिरी बजावली.

कारवाईत डॉ. अनुप चौधरी, डॉ. सोनाली तायडे, ॲड. शुभांगी ठाकरे, किरण जाणूनकर, डॉ. राहुल डोंगरे, ॲड. राधा नरवलिया, ॲड. वंदना काकडे, डॉ. उमेश सावजी आणि ज्ञानेश्वर मुळे यांनी सहभाग घेतला. वाशिम स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी संतोष वाघ, तेजस्विनी खोडके आणि सुनील तायडे यांनी सहकार्य केले. अमडापूर पोलिसांचेही सहकार्य लाभले.

मुलींच्या जन्मावर घाला घालणाऱ्यांना कठोर धडा मिळणार का?

गर्भलिंग निदान करणे, गर्भलिंग सांगणे किंवा अशा बेकायदेशीर कृत्याला मदत करणे हा पीसीपीएनडीटी कायद्यानुसार गंभीर दंडनीय अपराध आहे. मात्र, कायद्याचा धाक असूनही अशा प्रकारे शेतातील गोठ्यांमध्ये गर्भलिंग तपासणीचे प्रकार सुरू असतील, तर ही समाजासाठी चिंतेची बाब आहे. केवळ छापे टाकून थांबण्याऐवजी अशा रॅकेटची संपूर्ण साखळी, त्यामागील सूत्रधार आणि आर्थिक व्यवहार उघड करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मुलगी जन्माला येण्याआधीच तिच्या अस्तित्वावर घाला घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी प्रशासनाने अधिक कठोर भूमिका घेण्याची गरज आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा नारा केवळ घोषणांपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची वेळ आली आहे.

शेतक-यांची हळद तहानलेली ; धरणाचे पाणी कवठ्यात वाया

वाडी–रायताळ धरणाचे पाणी शेतीसाठी बंद; दूषित पाण्यामुळे हजारो लिटरची नासाडी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

एका बाजूला हळद पीक वाचविण्यासाठी शेतकरी पाण्याची प्रतीक्षा करीत आहेत, तर दुसरीकडे वाडी-रायताळ धरणाचे पाणी कवठा ग्रामपंचायतीला सोडले जात असून, ते वापरात येत नसल्याने हजारो लिटर पाण्याची नासाडी होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. धरणातील पाणी शेतीसाठी बंद केल्याने शेकडो शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

वाडी-रायताळ प्रकल्पाचा मुख्य उद्देश सिंचन असून, या धरणावर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार एकीकडे शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळत नाही, तर दुसरीकडे पाण्याचा वापर होत नसल्याने नासाडी होत असल्याची परिस्थिती आहे. या प्रश्नावर वाडी-रायताळ लाभक्षेत्रातील शेतकरी



एकत्र येऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार आहेत. कवठ्यातील फिल्टर प्लांटचे काम पूर्ण होऊन शुद्ध पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत धरणाचे पाणी पूर्वीप्रमाणे शेतीसाठी द्यावे, अशी त्यांची मागणी आहे.

सुमारे ८५० हेक्टर शेती अवलंबून आहे. सवड, मोहजा इंगोले, भोकरखेड, हराळ शिवाराचा काही भाग, वाडी-रायताळ आणि कवठा परिसरातील शेतकऱ्यांसाठी हा प्रकल्प गेल्या आठ ते दहा वर्षांपासून आधार ठरला आहे. सध्या हळद पीक अंतिम टप्प्यात असून, डिसेंबरपर्यंत

पाण्याची गरज आहे. वेळेत सिंचन न झाल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. दुसरीकडे प्रशासनाने धरणातील पाणी कवठा ग्रामपंचायतीला पिण्यासाठी सोडले आहे. मात्र, धरणातील पाणी

> माझी दोन एकर हळद आहे. चार-पाच दिवसांपासून पाण्याची लाइन बंद केली आहे. पाणी देण्यासाठी दुसरी कोणतीही सोय नाही. अशा परिस्थितीत हळद पीक कसे वाचवावे, असा प्रश्न पडला आहे.
>
> **विठ्ठल लांडगे,**
> शेतकरी, भोकरखेडा

गाळमिश्रित, काळपट आणि दुर्गंधीयुक्त असल्याने ते वापरण्यायोग्य नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. जलजीवन मिशनअंतर्गत कवठ्यासाठी फिल्टर प्लांट मंजूर झाला असला, तरी त्याचे काम अद्याप अपूर्ण आहे. ग्रामविकास अधिकारी संदीप अवचार यांच्याशी संपर्क साधला असता, ग्रामपंचायतीकडे फिल्टर प्लांट नसल्याचे त्यांनी सांगितल्याचा दावा आहे. त्यामुळे प्रक्रिया न केलेले पाणी सोडून नेमका कोणता उद्देश साध्य होत आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

नायलॉन मांजाचा वापर, विक्री व साठवणुकीवर बंदी नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

पक्ष्यांसह मानवी जीवांच्या सुरक्षेसाठी मालेगाव पोलिसांचे नागरिकांना आवाहन; पतंग उडविण्यासाठी सुती मांजाच वापरण्याचे आवाहन

पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणारा नायलॉन आणि चायनीज मांजा हा पक्ष्यांसह मानवी जीवांसाठीही अत्यंत धोकादायक ठरत आहे. या मांजामुळे अनेकदा गळा, हात-पाय गंभीर जखमी होण्याबरोबरच पक्ष्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होतो. ही बाब लक्षात घेता नायलॉन व चायनीज मांजाच्या वापरावर, विक्रीवर तसेच साठवणुकीवर पूर्णपणे बंदी असल्याची माहिती पोलीस स्टेशन मालेगावच्या वतीने देण्यात आली आहे. नायलॉन मांजा हा सहज न तुटणारा आणि धारदार असल्याने दुचाकीस्वार, पादचारी तसेच लहान मुलांसाठी मृत्यूचा सापळा ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी अशा मांजाचा वापर करू नये.



तसेच नायलॉन किंवा चायनीज मांजाची विक्री अथवा साठवणूक करताना कोणी आढळून आल्यास संबंधितांवर पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ च्या कलम १५ अन्वये कठोर कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

पतंगोत्सव साजरा करताना कोणाच्याही जीवाला धोका निर्माण होणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. पक्ष्यांचे आयुष्य वाचविण्यासोबतच मानवी जीवांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी केवळ साध्या सुती मांजाचाच वापर करावा. नायलॉन मांजाची विक्री किंवा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस स्टेशन मालेगावच्या वतीने करण्यात आले आहे. पतंगोत्सवाचा आनंद घ्या; मात्र नायलॉन मांजापासून दूर राहून स्वतःसह इतरांचेही जीवन सुरक्षित ठेवा, असा संदेश मालेगाव पोलिसांनी दिला आहे.

वाशिममध्ये वंचित बहुजन आघाडीला धक्का;

माजी जिल्हा संघटकांचा रिपब्लिकन सेनेत प्रवेश



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वंचित बहुजन आघाडीला वाशिम जिल्ह्यात धक्का बसला असून, पक्षाचे माजी जिल्हा संघटक इंजिनिअर पारितोष इंगोले यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत रिपब्लिकन सेनेत जाहीर प्रवेश केला. रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. इंगोले यांनी वंचित बहुजन आघाडीत जिल्हा संघटक म्हणून काम केले आहे. तसेच सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली होती. विधानसभा निवडणुकीच्या काळात त्यांच्यावर अनेक मतदारसंघांच्या निरीक्षकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. संघटनात्मक पातळीवर विविध जबाबदाऱ्या पार पाडलेल्या इंगोले यांच्या रिपब्लिकन सेनेतील प्रवेशामुळे वाशिम जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेशाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

गजानन महाराज मंदिरात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

वाशिम : कार्तिकी एकादशीनिमित्त जुनी आय.यू.डी.पी. कॉलनी येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात शनिवारी (दि. २१ नोव्हेंबर) विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त मंदिराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. अभिषेकासह विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.यावेळी भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. या प्रसादाचे यजमान धनंजय दौलतराव गोरे व परिवार हे होते. त्यांच्या सहकार्याने फराळ वाटपाचा उपक्रम पार पडला. कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने मंदिरात दिवसभर भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले.

धरणातील गाळ काढण्यासह वेस्टरची दुरुस्ती, बांधावरील वृक्षतोड व खोदकाम बुजविण्याची मागणी

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यात यंदा निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती आणि दिवसेंदिवस खालावत चाललेली भूजल पातळी लक्षात घेता फुलउमरी येथील खटकाळी धरणाचे पाणी जतन करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. मात्र, धरणातील मोठ्या प्रमाणावरील गाळ, बांधाची झालेली दुरवस्था आणि पाण्याची होणारी गळती यामुळे उपलब्ध जलसाठ्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर खटकाळी धरणातील गाळ तातडीने काढण्यात यावा, धरणाच्या वेस्टरजवळ आवश्यक कामे करण्यात यावीत, बांधावर वाढलेली वृक्षतोड करून



बांधाचे खोदकाम बुजविण्यात यावे, तसेच धरणाच्या विहिरीत टाकण्यात आलेली माती काढून संबंधित गेट बंद करण्यात यावे, अशा विविध मागण्या सोमेश्वर नगर येथील नागरिकांनी आमदार बाबुसिंग महाराज व आमदार सई डहाके यांना दिलेल्या निवेदनातून केल्या आहेत.

धरणातील पाणीसाठा हा केवळ शेतीसाठी नव्हे, तर परिसरातील नागरिक, पशुधन आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्याच्या गरजेसाठीही महत्त्वाचा आहे. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत धरणातील उपलब्ध पाण्याची गळती रोखणे आणि जलसाठ्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने प्रत्यक्ष कामे सुरू करावीत, अशी नागरिकांची मागणी आहे.

हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करणार

खटकाळी धरणाचा प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी न लागल्यास नागपूर येथे होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात येणार असल्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर माणिक चव्हाण, माजी सरपंच मधुकर राठोड, माजी उपसरपंच भुलेश्वर राठोड, पंजाब महाराज, ब्रह्मदेव आडे, गुलाब राठोड, अजय राठोड यांच्यासह गावातील शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सर्व साधुसंतांच्या मंगलमय उपस्थितीत वाशिममध्ये 'युगप्रवर्तक डॉ. हेडगेवार' महानाट्याचा भव्य नाट्याविष्कार!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रभक्ती, त्याग, समर्पण आणि संघटनशक्तीचा प्रेरणादायी इतिहास जिवंत करणाऱ्या 'युगप्रवर्तक डॉ. हेडगेवार' या भव्य महानाट्याचा ६७ वा प्रयोग वाशिम नगरीत मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आयोजित आणि 'नादब्रह्म, नागपूर' निर्मित या महानाट्याला सर्व साधुसंतांची विशेष उपस्थिती लाभली. संत-महंतांचे आशीर्वाद, मान्यवरांची उपस्थिती आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे हा सोहळा वाशिमच्या सांस्कृतिक क्षेत्रातील एक अविस्मरणीय पर्व ठरला. स्थानिक आयोजन समिती, सकल हिंदू समाज (वत्सगुल्म), वाशिम यांच्या वतीने बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता अकोला रोडवरील वाटाणे लॉन्स येथे या



महानाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

संत-महंतांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला लाभले आध्यात्मिक वैभव

या विशेष सोहळ्याला पोहरादेवी येथील पीठाधीश्वर महंत बाबूसिंग महाराज, बालयोगी श्री गोपालनाथजी बाबा, ह.भ.प. नामदेव महाराज काकडे, ह.भ.प. विजय महाराज शास्त्री (गवळी) आणि पवन महाराज, समाजसेवी दिनकरराव वाटाणे, जिल्हा संघचालक लक्ष्मणराव ढोबळे, नादब्रह्म नागपूरचे अध्यक्ष पद्माकर धानोरकर, वाशिम नगराध्यक्ष अनिल केंदळे यांची उपस्थिती होती. संत-महंतांच्या सान्निध्यामुळे कार्यक्रमाला आध्यात्मिक आणि प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले. त्यांच्या उपस्थितीने आयोजकांसह उपस्थित नागरिकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

डॉ. हेडगेवार यांच्या जीवनप्रवासातून राष्ट्रकार्याची प्रेरणा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनकार्यावर आधारित या महानाट्यातून त्यांचे राष्ट्राप्रती असलेले समर्पण, दूरदृष्टी, संघटन कौशल्य, त्याग आणि अखंड राष्ट्रसेवेची भावना प्रभावीपणे उलगडण्यात आली. केवळ एका व्यक्तीचा जीवनपट नव्हे, तर राष्ट्रनिर्मितीसाठी संघटित समाजाची आवश्यकता आणि प्रत्येक नागरिकाचे सामाजिक उत्तरदायित्व यांचा विचारप्रवर्तक संदेश या नाट्याविष्कारातून देण्यात आला.

सतीश खेकाळे यांच्या अभिनयाने डॉ. हेडगेवार साकारले जिवंत

महानाट्यात डॉ. हेडगेवार यांची प्रमुख भूमिका सतीश खेकाळे यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारली. त्यांच्या संवादफेकीने, अभिनयातील सहजतेने आणि व्यक्तिमत्त्वाच्या सशक्त सादरीकरणाने प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली. त्यांना अमोल तेलपांडे, प्रशांत मंगदे, गणेश केळकर, निखिल अदलाबादकर, रमेशचंद्र दीक्षित, मिलिंद हसबनीस, विजय हरदास, श्याम पिंपरकर, मंगेश बावसे, विनय लोहित, सचिन चावरे, शिरीष देढे यांच्यासह सुमारे ४० कलाकारांनी समर्थ साथ दिली. प्रत्येक कलाकाराच्या अभिनयातून नाट्यप्रसंग अधिक प्रभावी आणि जिवंत झाले.

सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

'कोयने'चे पाणी मुंबईला मिळणार?

मुख्यमंत्री फडणवीसांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय बैठकीत चर्चा

मुंबई- कोयना जलविद्युत प्रकल्पातून समुद्रात जाणारे पाणी मुंबईला वळवण्याबाबतची चर्चा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत झाली, अशी माहिती जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दिली. या निर्णयाच्या अंमलबजावणीनंतर मुंबईकरांसाठी तब्बल ६७ टीएमसी नवा पाणीसाठा उपलब्ध होणार आहे, असेही महाजन यांनी नमूद केले. गिरीश महाजन यांनी सांगितले की, जलबोगदे व पाईपलाईनच्या माध्यमातून



मुंबईकडे पाणी वळवण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठकीत चर्चा झाली. वीजनिर्मिती झाल्यानंतर बाहेर पडणारे अतिरिक्त पाणी जलबोगदे व पाईपलाईनच्या माध्यमातून मुंबईकडे वळवण्याबाबत चर्चा झाली.मुंबई व महानगरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता पुढील पन्नास वर्षांच्या पाण्याचे नियोजन सरकार करत आहे. याचसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या व नवीन प्रकल्पांसह कोयना धरणातून वीजनिर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर चर्चा झाली.

चिपळूण तालुक्यातील पोफळी येथील जलविद्युत प्रकल्पातून वीजनिर्मिती झाल्यानंतर बाहेर पडणारे अतिरिक्त पाणी वाशिष्ठी नदीत सोडून दिले जाते. या पाणीसाठ्याच्या वरील भागात कुठलाही प्रकल्प किंवा एमआयडीसी नसल्यामुळे कोयना धरणात येणारे पाणी हे महाराष्ट्रातील सर्वात शुद्ध पाणी मानले जाते.वीजनिर्मितीनंतर समुद्रात वाया जाणारे पाणी भुयारी बोगदे आणि पाईपलाईनच्या माध्यमातून मुंबईपर्यंत आणता येऊ शकेल का, याबाबत उच्चस्तरीय बैठकीत चर्चा झाली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास मुंबईकरांना तब्बल ६७ टीएमसी पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.

संक्षिप्त

मुंबई ते कोकण प्रवास होणार ४५ मिनिटात

रायगड- कोकण ते मुंबई हे अंतर सागरी मार्गाने जवळ



आणण्यासाठी जुन्या प्रस्तावित असलेल्या सागरी महामार्गाच्या प्रकल्पाला आता गती देण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग ते मुंबई थेट मोठ्या प्रकल्पाने जोडले जाणार आहे. त्यामुळे आता कोकणातील रायगड जिल्ह्यातील अलिबाग ते मुंबई हा प्रवास केवळ पाऊण तासावर येणार आहे. त्यामुळे कोकणातील पर्यटन उद्योगाला मोठी चालना मिळणार आहे. जवळपास सुमारे ३,५०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प धरम तर खाडीवर उभा राहत आहे. देशातील सर्वात उंच असणारा रेवस ते करंजा हा सागरी सेतू असलेला हा महत्त्वकांक्षी प्रकल्प ठरणार आहे. या शाश्वत पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे कोकणातील पर्यटन व उद्योग क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प कोकणासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.कोकणातील रायगड जिल्ह्यातील अलिबाग ते मुंबई हे अंतर आता अवघ्या काही मिनिटांवर येण्यासाठी हा मोठा प्रकल्प उभा राहत आहे. यासाठी मोठा सागरी उड्डाणपूल रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील धरमतर खाडीवरती उभारण्याचे काम सुरू आहे. दहा किलोमीटरचा उड्डाणपूल तर दोन किलोमीटरचा सागरीपूल असणार आहे. एमएसआरडीसी कडून हा महत्त्वाचा प्रकल्प उभारला जात आहे.

'रामायण'चा बॉक्स ऑफिसवर धमाका

मुंबई-नितेश तिवारी दिग्दर्शित आणि नमित मल्होत्रा निर्मित 'रामायण' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई करत ९०० कोटींच्या क्लबमध्ये प्रवेश केला असून, 'पुष्पा २' आणि 'धुरंधर २' नंतर हा टप्पा गाठणारा हा तिसरा सर्वात वेगवान चित्रपट ठरला आहे. प्रदर्शनाच्या १७ व्या दिवशी २७.४० कोटी रुपयांची निव्वळ (नेट) कमाई करून 'रामायण'ने २०२६ मधील ब्लॉकबस्टर 'धुरंधर २' चा २५.६५ कोटींचा विक्रम मोडीत काढला आहे; चित्रपटाची एकूण निव्वळ कमाई ९०६.९० कोटी रुपये तर एकूण ग्रॉस कमाई १०८३.७० कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

चंद्रपूर सुधारगृहातून पळून आलेल्या सहा मुली हिंगणघाट पोलिसांच्या ताब्यात

हिंगणघाट- चंद्रपूर येथील सुधारगृहातून निघालेल्या सहा मुलींना हिंगणघाट पोलिसांनी सुखरूप ताब्यात घेतले. पोलिसांच्या धाडसी आणि तत्पर कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.चंद्रपूर येथील एका सुधारगृहातील अधिकाऱ्यांशी झालेल्या वादानंतर सहा मुली निघून गेल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच चंद्रपूर



पोलिसांनी मुलींची शोधमोहीम सुरू केली. मुली रेल्वेने नागपूरच्या दिशेने जात ही माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली.गुन्हे शोध पथकातील पोलिस कर्मचाऱ्यांना मुली रेल्वे स्थानकजवळील परिसरात मिळाल्या. सहाही मुलींना सुरक्षितपणे ताब्यात घेत पोलिस ठाण्यात आणण्यात आले. हिंगणघाट पोलिसांनी चंद्रपूर पोलिसांशी संपर्क साधला. रामनगर पोलिस ठाण्याचे पथक हिंगणघाट येथे दाखल झाले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मुलींना सुरक्षितपणे चंद्रपूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

दुष्काळाशी लढण्यासाठी पैसे नाहीत; खासदारांना १५० कोटीची ऑफर

मुंबई- महाराष्ट्रात दुष्काळाशी लढण्यासाठी निधी उपलब्ध नाही, मात्र डीलिमिटेशन विधेयक मंजूर करून घेण्यासाठी खासदारांना १५०-१५० कोटी रुपयांची ऑफर दिली जात असल्याचा संताप त्यांनी व्यक्त केला. इतकेच नव्हे तर लहान पक्षांनाही वेगवेगळ्या ऑफर्स दिल्या जात असून पक्ष फुटत नसतील तर त्या पक्षातील खासदारांनाच फुटण्यासाठी थेट आमिषे दाखवली जात असल्याचा खळबळजनक आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

संसदेचे हिवाळी अधिवेशन अद्याप न घेतले जाणे हे पूर्णपणे नियमबाह्य आणि संविधानाच्या विरोधात असल्याचे संजय राऊत म्हणाले. अधिवेशन गुंडाळण्याची हिंमत सत्ताधाऱ्यांना केवळ अहंकारामुळेच होत आहे; कारण अधिवेशन घेतल्यास डीलिमिटेशनचे विधेयक आणून ते कोणत्याही किंमतीत मंजूर करायचे, त्यासाठी खासदार विकत घ्यायचे, पक्ष फोडायचे किंवा संसद बंद पाडायची अशी त्यांची रणनीती असल्याचे विधान संजय राऊत यांनी केले. पुढे ते म्हणाले, द्रमुक, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल



संजय राऊत यांचा घणाघात

कम्युनिस्ट पार्टी तसेच इतर लहान पक्षांवर दबाव आणि फोडाफोडीचे राजकारण होत असल्याचे सांगत संजय राऊत यांनी, आमच्यावरही असेच प्रयोग झाले आणि आमचेही सहा आमदार फोडण्यात आले, असे नमूद केले. बहुमताचा आकडा गाठण्यासाठी अमित शहा किंवा भाजपकडून नेमलेल्या एजंटांमार्फत डीलिमिटेशनच्या बाजूने मतदान करण्यासाठी खासदारांचा १५० कोटींचा भाव सुरू असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. हे वास्तव असून कोणाला काय बोलायचे ते बोलू द्या, असेही संजय राऊत ठणकावून म्हणाले.

संजय राऊत यांनी ही राजकीय संस्कृती कोणी आणली, असा संतप्त सवाल महाराष्ट्रातील आमदारांच्या फोडाफोडीचा दाखला दिला. महाराष्ट्रातील आमदार काही चिंचोके देऊन किंवा खणानारळाने ओटी भरून फुटले नाहीत, तर त्यांनाही ५०-५० आणि १००-१०० कोटी रुपये देऊनच फोडण्यात आले, असा आरोप त्यांनी केला. २०२९ च्या दृष्टीने हे विधेयक भाजपच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण करणारे अत्यंत महत्त्वाचे विधेयक असल्याने १५० कोटी घेऊन बाजूने मतदान करण्याची सर्वपक्षीय ऑफर दिली जात असल्याचे संजय राऊत म्हणाले. विविध पक्षांतील खासदारांना वैयक्तिक पातळीवर संपर्क साधून पक्षाचा व्हीप झुगारल्यास खासदारकी वाचवण्याचे आश्वासन देणारी यंत्रणा उभी करण्यात आल्याचे संजय राऊत म्हणाले. महाराष्ट्रात दुष्काळाशी सामना करण्यासाठी पैसे नसताना खासदारांच्या खरेदीसाठी १५०-१५० कोटींची बोली लावली जात आहे. लहान पक्षांनाही छोटे प्रस्ताव दिले जात असून पक्ष फुटत नसेल तर त्यातील खासदारांनाच फोडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा संताप खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला.

राज्यातील ३,८३२ अंगणवाड्या होणार 'स्मार्ट'- आदिती तटकरे

मुंबई- राज्यातील अंगणवाडी केंद्रात देण्यात येणाऱ्या सेवांमध्ये आधुनिक शैक्षणिक साहित्य आणि पायाभूत सुविधांची सुधारणा करत ३८३२ अंगणवाड्यांना 'स्मार्ट अंगणवाडी' करण्यास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

अंगणवाडी केंद्रांमधून ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पोषण, आरोग्य, पूर्वप्राथमिक शिक्षण तसेच गर्भवती महिला, स्तनदा मातांना पोषण,आरोग्याशी संबंधित सेवा दिल्या जातात. आदर्श अंगणवाडी केंद्र तयार करून त्यात आधुनिक सुविधा देत बालकांना आनंददायी, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण वातावरण उपलब्ध करून



देण्याच्या उद्देशाने स्मार्ट अंगणवाडी संकल्पना राबविण्यात येत आहे. शासकीय जागेत विद्युत जोडणी उपलब्ध असलेल्या केंद्रांचा विचार करून ३,८३२ अंगणवाडी केंद्रांना स्मार्ट करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या स्मार्ट अंगणवाडी किटमध्ये विविध आधुनिक सुविधा आणि साहित्याचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये ई-लर्निंगसाठी आवश्यक हार्डवेअर व सॉफ्टवेअर, स्वच्छ भारत किट, वॉटर प्युरिफायर, हात धुण्यासाठी बेसिन सुविधा, अंगणवाडी इमारतीची रंगरंगोटी, इमारतीची आवश्यक किरकोळ दुरुस्ती, रेन वॉटर हार्वेस्टिंग तसेच स्वयंपाकघराचे आधुनिकीकरण याबाबींचा समावेश आहे.अंगणवाडी केंद्रांमधील सुविधा आधुनिक आणि सक्षम करण्यासाठी टप्प्याटप्प्याने स्मार्ट अंगणवाड्यांची निर्मिती करण्यात येत असून बालकांच्या पोषण, आरोग्य आणि प्रारंभिक शिक्षणासाठी अधिक गुणवत्तापूर्ण वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

बहुजन समाजाचा आवाज हरपला

मुंबई- राज्यसभा खासदार रामराव सखाराम वडकुते यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारे आहे. सर्वसामान्य कुटुंबातून आपल्या कर्तृत्वाच्या आणि संघर्षाच्या बळावर तळागाळातून देशाच्या सर्वोच्च सभागृहापर्यंत पोहोचलेले नेतृत्व आज हरपले आहे. त्यांच्या निधनाने राजकीय, सामाजिक तसेच बहुजन समाजाच्या चळवळीची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दांत ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या.

खासदार रामराव वडकुते यांनी सहकार, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला. विशेषतः धनगर समाजासह बहुजन समाजाच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला.

खासदार रामराव वडकुटे यांचे निधन

मुंबई- महाराष्ट्रातील भाजपचे राज्यसभा खासदार रामराव वडकुटे यांचं दिल्लीतील एम्स रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. धनगर समाजाच्या आरक्षणासाठी सातत्याने संघर्ष करणारे वडकुटे यांनी सामाजिक कार्यातून राजकारणात प्रवेश केला होता. राष्ट्रवादी काँग्रेसपासून भाजपपर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास आणि धनगर आरक्षणासाठीचा लढा त्यांच्या निधनाने अर्धवट राहिला.भाजपने काही महिन्यांपूर्वीच त्यांना राज्यसभेवर पाठवलं होतं. धनगर समाजाला अनुसूचित जमाती अंतर्गत आरक्षण मिळावं, या मागणीसाठी ते सातत्याने लढत होते.



रॅलीवेळी त्यांनी राज्य सरकार आणि आंदोलकांमध्ये समन्वय साधण्याचं काम केलं होतं. वडकुटे यांनी १९८८ मध्ये सामाजिक जीवनाची सुरुवात केली. त्यांनी धनगर समाज उन्नती मंडळ, परभणीचे अध्यक्ष म्हणून कामाला सुरुवात केली. हे मंडळ दिवंगत शिवाजीराव शेंडगे यांचं होतं. त्यातून त्यांनी समाजाच्या प्रश्नांवर काम करायला सुरुवात केली. नंतर सामाजिक कार्यासोबतच त्यांनी राजकारणातही पाऊल ठेवलं. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रिय काम केलं. २००२ ते २००५ दरम्यान त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी बकरी आणि मेंढी विकास महामंडळाचे अध्यक्षपद सांभाळलं.धनगर आरक्षणाचा लढा अर्धवट ठेवूनच त्यांनी जगाचा निरोप घेतला.

देशातील विजेची मागणी ११.७ टक्क्यांनी वाढली!

महाराष्ट्रातही वीज पुरवठ्याचे आव्हान; महावितरणचा बॅटरी साठवणुकीवर भर

मुंबई- देशातील विजेची मागणी वेगाने वाढत असून चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते ऑक्टोबर या पहिल्या सात महिन्यात गेल्या वर्षाच्या तुलनेत ११.७ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. वाढते औद्योगिकीकरण, व्यावसायिक वापर, वातानुकूलन यांमुळे संपूर्ण आर्थिक वर्षात विजेची मागणी सुमारे ८.५टक्क्यांनी वाढण्याचा इक्राचा (इन्व्हेस्टमेंट इन्फॉर्मेशन अँड क्रेडिट रेटिंग एजन्सी) अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात मार्च,२०२७मध्ये सुमारे दोन हजार मेगावॉट विजेची तूट निर्माण होण्याची शक्यता असून ती भरून काढण्याचे मोठे आव्हान महावितरणसमोर असेल. सौर ऊर्जेवर भर देत मागणी-पुरवठ्याचे गणित साधण्याकरिता विजेच्या बॅटरी साठवणुकीवर महावितरणचा भर असेल.


इक्राच्या अहवालानुसार, देशातील विजेच्या मागणीत एप्रिल ते ऑक्टोबर २०२६ या काळात ११.७ टक्क्यांची वाढ झाली. नोव्हेंबरच्या पहिल्या ११ दिवसांतही मागणी मागील वर्षाच्या तुलनेत १२.९ टक्क्यांनी वाढली. संपूर्ण आर्थिक वर्षात देशातील विजेची मागणी सुमारे ८.५ टक्क्यांनी वाढण्याचा इक्राचा अंदाज आहे. वाढते तापमान, औद्योगिक उत्पादन आणि व्यावसायिक क्षेत्रातील विजेचा वापर ही मागणीवाढीमागील प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे औष्णिक वीजनिर्मितीसाठी कोळशाचा पुरेसा साठा राखणे आणि वाढत्या मागणीनुसार वीज उपलब्ध करून देणे ही देशापुढील आव्हाने असल्याचेही अहवालातून स्पष्ट होते.

महाराष्ट्रात ऑक्टोबरमध्ये आतापर्यंतची सर्वोच्च म्हणजे ३३ हजार ६२५ मेगावॉट इतकी विजेची विक्रमी मागणी नोंदविली गेली. राज्यात मार्च २०२७ मध्ये सर्वोच्च मागणी ३६ हजार ८५८ मेगावॉटपर्यंत जाण्याचा अंदाज केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने व्यक्त केला आहे. त्या तुलनेत वीज उपलब्धता ३४ हजार ७२१ मेगावॉट राहण्याची शक्यता असल्याने सुमारे २,१३७ मेगावॉटची तूट निर्माण होऊ शकते. ही संभाव्य तूट आणि संध्याकाळच्या वाढत्या मागणीचा सामना करण्यासाठी महावितरणने बॅटरी ऊर्जा साठवणूक प्रकल्पांवर भर दिला आहे.या पार्श्वभूमीवर महावितरणने सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्याबरोबरच दिवसा निर्माण होणारी अतिरिक्त वीज साठवून संध्याकाळच्या वेळी वापरण्याची व्यवस्था उभारण्यास सुरुवात केली आहे, असे महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत राज्यात सुमारे सात हजार मेगावॉट क्षमतेचे विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून यातून दिवसा निर्माण होणारी अतिरिक्त वीज साठविण्यासाठी सुमारे ५० ठिकाणी प्रत्येकी १० मेगावॉट क्षमतेचे बॅटरी ऊर्जा साठवणूक प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. या प्रकल्पांची एकत्रित वीजपुरवठा क्षमता ५०० मेगावॉट असून, दोन तासांसाठी एक हजार मेगावॉट-अवर वीज साठवून पुरवता येते. महावितरणने बॅटरी साठवणूक प्रकल्पांचा आणखी विस्तार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. एकूण ७५० मेगावॉट क्षमतेच्या प्रकल्पांमधून दोन तासांसाठी १,५०० मेगावॉट-अवर वीज उपलब्ध होऊ शकेल. यापैकी एक हजार मेगावॉट-अवर क्षमतेचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. याशिवाय चार हजार मेगावॉट-अवर क्षमतेच्या अतिरिक्त बॅटरी साठवणूक प्रकल्पांचे कामही प्रगतीपथावर आहे.

सूर्यास्तानंतर सौर वीजनिर्मिती कमी होते. मात्र घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक वापरामुळे संध्याकाळी विजेची मागणी वाढते. अशा वेळी साठवलेली वीज वापरल्यास पारंपरिक वीजनिर्मितीवरील ताण आणि खुल्या बाजारातून महागड्या दराने वीज खरेदी करण्याची गरज कमी होऊ शकते.

देशातील विजेची मागणी वाढत असताना महाराष्ट्रात सौरऊर्जेची क्षमता आणि बॅटरी



साठवणुकीचे जाळे विस्तारत आहे. मात्र, मार्च २०२७ मधील संभाव्य मागणी आणि उपलब्धतेतील तफावत भरून काढण्यासाठी बॅटरी प्रकल्पांबरोबरच अतिरिक्त वीजखरेदी, औष्णिक वीजनिर्मिती आणि इतर स्रोतांचे नियोजनही महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः संध्याकाळच्या सर्वोच्च मागणीच्या काळात किती वीज उपलब्ध होऊ शकते, यावर आगामी उन्हाळ्यातील वीजपुरवठ्याची स्थिती अवलंबून असेल.

चार सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या



मुंबई- राज्य सरकारने आज चार सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. त्यानुसार महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांची बदली मंत्रालयात दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदी झाली आहे, तर मुख्य सचिवांच्या कार्यालयातील सहसचिव मकरंद देशमुख यांची बदली राज्य कर विभागाच्या सह आयुक्तपदी करण्यात आली आहे उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे सचिव प्रवीण पुरी यांची बदली महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सचिवपदी झाली आहे, तर गुलाब खरात यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी करण्यात आली आहे.

देशातील ३२ विद्यापीठे बोगस, महाराष्ट्रातील दोन संस्थांचाही समावेश

मुंबई- उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाची निवड हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय असतो. चांगले शिक्षण, पदवी आणि भविष्यातील नोकरीच्या आशेने विद्यार्थी लाखो रूपये खर्च करून प्रवेश घेतात. मात्र, ज्या संस्थेकडून पदवी मिळणार आहे, तिलाच मान्यता नसेल तर विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येऊ शकते.

देशातील अशाच बोगस विद्यापीठांचा पर्दाफाश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) केला असून, देशभरातील १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ३२ संस्थांचा बोगस विद्यापीठांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

वृत्तानुसार, यूजीसीने फेब्रुवारी २०२६ मध्ये जारी केलेल्या यादीत या ३२ संस्थांची नावे समाविष्ट केली आहेत. यामध्ये दिल्लीतील सर्वाधिक १२ संस्थांचा समावेश आहे. त्याखालोखाल उत्तर प्रदेशातील चार संस्था या यादीत आहेत. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, पुदुचेरी आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी दोन संस्थांचा समावेश आहे. तर



अरुणाचल प्रदेश, हरियाणा, झारखंड आणि राजस्थानमधील प्रत्येकी एका संस्थांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील दोन संस्थांनाही यूजीसीने जारी केलेल्या बोगस विद्यापीठांच्या यादीत समावेळी आहे. यामध्ये नागपूर येथील 'राजा अरेबिक युनिव्हर्सिटी' आणि सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील तडवळ येथील 'नॅशनल बॅकवर्ड कृषी विद्यापीठ' यांचा समावेश आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांनीही कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी तिची अधिकृत मान्यता तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, मार्च २०२३ मधील यूजीसीच्या यादीत २० संस्थांचा समावेश होता. त्यापैकी १८ संस्थांची नावे फेब्रुवारी २०२६ च्या यादीतही कायम आहेत. म्हणजेच २०२३ मध्ये बोगस म्हणून ओळखण्यात आलेल्या ९० टक्के संस्था नव्या यादीतही कायम आहेत.

या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या ९ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशानंतर यूजीसीने १७ नोव्हेंबरला विद्यार्थ्यांसाठी सार्वजनिक सूचना जारी केली. तसेच अनधिकृत शैक्षणिक संस्थांविरोधात जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यूजीसीने विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित विद्यापीठाला कायदेशीर मान्यता आहे का, पदवी देण्याचा अधिकार आहे का आणि आवश्यक नियामक संस्थांच्या परवानग्या आहेत का, याची संपूर्ण चौकशी करण्याचे आवाहन केले आहेत. केवळ जाहिराती, वेबसाइट, माहितीपत्रके किंवा सोशल मीडियावरील दाव्यांवर विश्वास ठेवू नये, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३५५ ■ सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

प्रवाशांच्या जीवाशी एसटी कर्मचाऱ्यांचा जीवघेणा खेळ

मद्यधुंद चालकाच्या हाती बसचे स्टेअरिंग; विरुळ आकाजीजवळ मोठा अनर्थ टळला

भरधाव बस पुलाजवळ अनियंत्रित; प्रवाशांच्या आरडाओरडीनंतर बस थांबविली, कारवाईची जोरदार मागणी



विरुळ आकाजी जनमाध्यम : प्रवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनीच प्रवाशांचे जीव धोक्यात घातल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. मद्यधुंद अवस्थेत चालकाने भरधाव वेगाने बस चालविल्याने विरुळ आकाजीजवळ बसवरील नियंत्रण सुटले. पुलाजवळ बस अनियंत्रित झाल्याने ती थेट पुलाखाली उलटण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, सुदैवाने मोठा अनर्थ टळला आणि अनेक प्रवाशांचे प्राण वाचले. या प्रकारामुळे एसटी महामंडळाच्या सुरक्षित प्रवासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वर्धा बसस्थानकावरून दररोज सायंकाळी ७ वाजता विरुळ आकाजीकडे मुक्कामी जाणारी ही बस रात्री ८ ते ८.३० वाजताच्या सुमारास गावात पोहोचते. शनिवारी रात्री बस क्रमांक एमएच ४० वाय ५४३८ मधून प्रवासी प्रवास करीत होते. या बसवर चालक एम. डी. पाटील आणि वाहक महेश मरकाम कार्यरत होते. संबंधित चालक आणि वाहक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा गंभीर आरोप प्रवाशांनी केला आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, वर्धा बसस्थानकातून निघाल्यापासूनच चालक बस भरधाव वेगाने चालवीत होता. बसवरील नियंत्रण वारंवार सुटत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. पुलाजवळ तर बस अनियंत्रित झाली. काही क्षणांतच बस पुलाखाली उलटून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. प्रवाशांनी चालकाला बस थांबविण्याची विनंती केली. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप आहे. अखेर प्रवाशांचा संताप अनावर झाल्यानंतर बस थांबविण्यात आली.

या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओही समोर आला असून, त्यामध्ये चालकाच्या वर्तनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. रात्रीची वेळ असल्याने गावात पोहोचल्यानंतर तातडीने कोणतीही कारवाई झाली नाही. मात्र, या घटनेनंतर प्रवाशांनी संबंधित चालक आणि वाहकावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

व्हिडिओच्या आधारे चौकशी, दोषींवर कारवाई करणार

या प्रकरणी बसस्थानक प्रमुख नंदकिशोर मसराम यांच्याशी संपर्क साधला असता, प्रवाशांची तक्रार आमच्याकडे प्राप्त झाली आहे. व्हिडिओच्या आधारे संबंधित कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर निश्चितच कारवाई करण्यात येईल. त्यांचे बयानही नोंदविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रवाशांच्या जीवाशी खेळणाऱ्या कर्मचाऱ्यांना केवळ चौकशीच्या नावाखाली अभय मिळू नये. मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविण्याचा आरोप गंभीर असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. एसटी महामंडळाचा प्रवास सुरक्षित की प्रवाशांच्या जिवावर बेतणारा, असा संतप्त प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

सेलूत अवैध दारू विक्रीचा पर्दाफाश; ८४८ बाटल्यांसह कार जप्त

स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल, ७.९६ लाखांचा मुद्देमाल जप्त



सेलू जनमाध्यम : जिल्ह्यात अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम सुरू केली असून, सेलू येथे केलेल्या कारवाईत देशी व विदेशी दारूच्या ८४८ सिलबंद बाटल्यांसह होंडा अमेझ कार जप्त करण्यात आली. या कारवाईत दोघांविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सेलू येथील वार्ड क्रमांक ४ मध्ये अमोल कैलास मांढरे याच्या घरावर छापा टाकण्यात आला. घराची झडती घेतली असता आठ प्लास्टिक चुंगड्यांमध्ये देशी दारू, तर एका चुंगडीमध्ये विदेशी दारूचा साठा आढळून आला.

पोलिसांनी तपासणी केली असता, अमोल मांढरे याने हा दारूसाठा हिंगणी येथील अतुल वाघमारे याच्याकडून खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. दोघेही संगनमताने आर्थिक फायद्यासाठी अवैध दारू विक्रीचा व्यवसाय करीत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले.

या कारवाईत प्रिमियम नंबर वन कंपनीच्या ९० मिलीच्या देशी दारूच्या ८०० सिलबंद बाटल्या आणि ऑफिसर्स चॉईस कंपनीच्या १८० मिलीच्या विदेशी दारूच्या ४८ सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. तसेच दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली मेटॅलिक ग्रे रंगाची होंडा अमेझ कार (एमएच ४९ एई २०३२) जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ७ लाख ९६ हजार ८०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

याप्रकरणी अमोल मांढरे आणि अतुल वाघमारे या दोघांविरुद्ध सेलू पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी तसेच पोलीस अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, सागर भोसले आणि रवि पुरोहित यांनी केली.

दुष्काळाच्या भीतीने शेतकऱ्याने फेकली २० टन संत्री

६५० झाडांवरील फळे जमिनीवर; लाखोंचा खर्च मातीमोल, कर्ज फेडण्याचे स्वप्नही भंगले

कारंजा (घाडगे) जनमाध्यम :एका बाजूला झाडांना लगडलेली संत्री आणि दुसऱ्या बाजूला सिंचनासाठी थेंबभरही पाणी नाही. डोळ्यांसमोर उभ्या असलेल्या दुष्काळाच्या संकटापुढे हतबल झालेल्या शेतकऱ्याने अखेर आपल्या चार एकरांतील संपूर्ण संत्रीबागेतील फळे तोडून फेकून दिली. तब्बल २० टन संत्री जमिनीवर टाकण्याची वेळ रामदास नासरे या शेतकऱ्यावर आली. कारंजा (घाडगे) तालुक्यातील दाभा येथे घडलेल्या या घटनेने शेतीसमोरील भीषण वास्तव पुन्हा एकदा उघडे पडले आहे.

रामदास नासरे यांनी चार एकर क्षेत्रात ६५० संत्र्यांची झाडे मोठ्या कष्टाने जोपासली होती. खत, कीटकनाशके, औषध फवारणी आणि बागेच्या देखभालीवर त्यांनी लाखो रुपये खर्च केले.

आधुनिक ठिबक सिंचन व्यवस्थाही उभारली. यंदा झाडांना चांगला बहार आल्याने बागेत जवळपास २० टन संत्री लगडली होती. याच उत्पादनातून आर्थिक परिस्थिती सुधारेल, डोक्यावरील कर्जाचा भार हलका होईल आणि कुटुंबाला सुखाचे दिवस पाहायला मिळतील, अशी आशा नासरे कुटुंबाने बाळगली होती.

मात्र, पावसाने ओढ दिली आणि संत्रीबागेसाठी आवश्यक असलेले पाणीच संपले. विहिरींची पाणीपातळी कमालीची खालावली. दाभा परिसरात सिंचनासाठी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली. बाग जगवायची कशी, हा प्रश्न शेतकऱ्यापुढे उभा ठाकला. पाण्याअभावी उभे पीक हातचे जाण्याची भीती निर्माण झाल्याने नासरे यांनी झाडांवरील संत्री तोडून फेकण्याचा कटू निर्णय घेतला.

आज संपूर्ण बागेत संत्र्यांचा खच पडला आहे. ज्या फळांकडे पाहून कुटुंबाने सुखाची स्वप्ने रंगवली होती, तीच फळे आता उन्हात सडत आहेत. लाखोंचा खर्च, महिन्यांची मेहनत आणि कर्जमुक्तीची आशा काही क्षणांत मातीमोल झाली. संत्रीबागेत विखुरलेली फळे पाहून नासरे कुटुंबाच्या डोळ्यांत अश्रू तरळत आहेत.

शेतकऱ्याच्या घामाला बाजारपेठ मिळाली नाही, तर पाण्याअभावी पीक जगवता आले नाही, मग शेती करायची तरी कशाच्या भरवशावर? दाभ्यातील ही घटना केवळ एका शेतकऱ्याची शोकांतिका नसून दुष्काळाच्या सावटाखाली जगणाऱ्या संत्री उत्पादकांच्या संकटाची गंभीर हाक आहे. शासनाने या बागेची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानभरपाई आणि तातडीच्या मदतीचा विचार करणे गरजेचे आहे.

घरगुती वादातून ५२ वर्षीय व्यक्तीची गळफास घेऊन आत्महत्या

जोशीनगर परिसरातील घटना

सेलू जनमाध्यम : शहरातील जोशीनगर परिसरात घरगुती वादातून एका ५२ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना आज सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. मुस्ताक शेख (वय ५२, रा. जोशीनगर, सेलू) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

घटनेची माहिती मिळताच रुग्णमित्र प्रज्वल लटारे तसेच सेलू पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय, सेलू येथे पाठविला.

प्राथमिक माहितीनुसार, घरगुती वादातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, आत्महत्येमागील नेमके कारण पोलिस तपासातून स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे जोशीनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

घराच्या आवारात गांजाची शेती; पोलिसांचा छापा अन् लागवडीचा पर्दाफाश

पाचगावात चार गांजाची झाडे जप्त; ५ किलो ७०४ ग्रॅम ओल्या गांजासह ८५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत



देवळी जनमाध्यम : घराच्या आवारातच गांजाची शेती फुलविण्याचा प्रकार देवळी तालुक्यातील पाचगाव (पुनर्वसन) येथे उघडकीस आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे देवळी पोलिसांनी थेट घराच्या परिसरात छापा टाकत गांजाची चार झाडे जप्त केली. या कारवाईत तब्बल ८५ हजार ५६० रुपये किमतीचा ५ किलो ७०४ ग्रॅम ओला गांजा हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी बळीराम दौलत शिवरकार (५५, रा. पाचगाव पुनर्वसन, ता. देवळी) याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने काही महिन्यांपूर्वी वर्ध्यातील एका गांजा विक्रेत्याकडून सुमारे पाच ग्रॅम गांजा खरेदी केला होता. त्यातील काही बिया काढून त्याने घराच्या मागील बाजूस पेरल्या. या बियांपासून गांजाची चार झाडे उगवली.

त्यापैकी तीन झाडांची उंची तब्बल दहा फुटांपर्यंत पोहोचली होती, तर एक झाड लहान होते. घराच्या आवारात गांजाची लागवड सुरू असल्याची गोपनीय माहिती देवळी पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने पाचगाव गाठून परिसराची पाहणी केली असता हा प्रकार उघडकीस आला.

पोलिसांनी घटनास्थळावरून चारही झाडे जप्त केली. त्यांचे वजन ५ किलो ७०४ ग्रॅम भरले असून बाजारमूल्य ८५ हजार ५६० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. घराच्या आवारातच अमली पदार्थांची लागवड केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार संदीप कापडे, पोलीस उपनिरीक्षक शिवराज जाधव, पोलीस उपनिरीक्षक मगरे, विनोद कांबळे, अमोल आलवडकर, निलेश तेलरांधे, गजानन महाकाळकर, आकाश कसर आणि संतोष गिते यांनी केली.

गांजाची लागवड केल्यास थेट कारवाई

घराच्या आवारात किंवा शेतात गांजाची लागवड करणे हा एनडीपीएस कायद्यान्वये गंभीर गुन्हा आहे. नागरिकांनी अशा प्रकारांना थारा देऊ नये. कुठेही गांजाची लागवड आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

-संदीप कापडे,
ठाणेदार, देवळी.

घरफोडीतील चोरीचा ३० हजारांचा मुद्देमाल फिर्यादीला परत

मुद्देमाल मिळताच फिर्यादीने मानले आभार



सेलू जनमाध्यम : घरफोडी करून चोरी केलेल्या दागिन्यांचा शोध घेत सेलू पोलिसांनी आरोपीला अटक केली. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेला ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्यादीला परत करण्यात आला. चोरीला गेलेले दागिने पुन्हा मिळाल्याने फिर्यादी सतीश इंगोले यांनी पोलिसांचे आभार मानले.

केळझर येथील वार्ड क्रमांक २ मधील रहिवासी सतीश आनंदराव इंगोले (वय ४७) यांच्या तक्रारीवरून सेलू पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध अप. क्र. ४१३/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०५ (अ) व ३३१ (३) नुसार घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना वर्धा पोलिसांनी चोरीस गेलेल्या मुद्देमालाचा शोध घेत आरोपीला अटक केली. त्याच्याकडून चोरीचे दागिने जप्त करण्यात आले.

यामध्ये २५ हजार रुपये किमतीची चार ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, एक हजार रुपये किमतीच्या दोन चांदीच्या अंगठ्या, दोन हजार रुपये किमतीचा चांदीचा गोफ आणि अडीच हजार रुपये किमतीचा पांढऱ्या धातूचा गोफ असा एकूण ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

हा मुद्देमाल २१ नोव्हेंबर २०२६ रोजी न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्यादी सतीश इंगोले यांना परत करण्यात आला. चोरीला गेलेली मालमत्ता पुन्हा मिळाल्याने इंगोले यांनी ठाणेदार पंकज वाघोडे, पीएसआय निरंजन वरभे, देवा वनवे, मोहरर संजय डगवार व वर्धा पोलिसांचे आभार व्यक्त केले.

वाकलेला विद्युत खांब बनला जीवघेणा महावितरणला अपघाताची प्रतीक्षा

गांगापूरच्या चौकात दुर्घटनेचा धोका

ग्रामस्थांचा संताप, तातडीने नवीन खांब बसविण्याची मागणी



वडनेर जनमाध्यम : हिंगणघाट तालुक्यातील गांगापूर येथील वार्ड क्रमांक एकमध्ये वाकलेला विद्युत खांब नागरिकांच्या जिवावर उठण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गजानन हाते यांच्या घराशेजारी असलेला हा खांब धोकादायक स्थितीत असूनही महावितरणचे अधिकारी आणि अभियंते याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या खांबावरून विद्युत वाहिन्या जात असून, जोरदार वारा किंवा पावसामुळे खांब कोसळण्याची भीती आहे. विशेष म्हणजे, हा परिसर चौकात असल्याने येथून नागरिकांची चोवीस तास वर्दळ असते. मागील वर्षीही महावितरणच्या अधिकाऱ्यांना याबाबत तोंडी सूचना देण्यात आली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

अपघात घडल्यानंतरच महावितरणला जाग येणार का, असा संतप्त प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. हेमंत कडू, गजानन हाते, बंडुजी भोयर, संदीप भोयर आणि शेषराव भोयर यांच्या घरालगत असलेल्या या चौकातील धोकादायक खांबामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

जीवितहानी होण्यापूर्वी महावितरणने तातडीने वाकलेला खांब सरळ करावा किंवा नवीन खांब बसवावा, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

रक्तदानातून जीवनाला आधार; स्व. दुर्गादेवी राठी यांच्या स्मृतीत १८ जणांचे रक्तदान

पगडी विधीच्या दिवशी रक्तदानातून श्रद्धांजली



वर्धा जनमाध्यम : एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर तिच्या स्मृती जपण्यासाठी अनेक उपक्रम केले जातात. मात्र, दुःखाच्या प्रसंगाला सामाजिक सेवेची जोड देत दुसऱ्याच्या आयुष्यात जीवनाचा प्रकाश निर्माण करण्याचा आदर्श वर्ध्यातील माहेश्वरी नवयुवक मंडळाने जपला आहे. स्व. दुर्गादेवी ताराचंदजी राठी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पगडी विधीच्या दिवशी आयोजित रक्तदान शिबिरात १८ जणांनी रक्तदान करून अनोखी श्रद्धांजली अर्पण केली.

शिबिराचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष ऋषभ जाजू यांच्या हस्ते झाले. स्व. दुर्गादेवीजी यांनी आयुष्यभर सकारात्मक विचार, एकाग्रता आणि कर्तव्यनिष्ठेचे संस्कार दिले. त्यांच्या स्मृतीत केलेले रक्तदान अनोळखी व्यक्तीला जीवनदान देणारे ठरते, असे त्यांनी सांगितले.

स्व. दुर्गादेवीजी यांच्या ९३ व्या वाढदिवसानिमित्ता स्वावलंबी होत्या. धार्मिक कार्य, समाजपरंपरा आणि संस्कारांबद्दल त्यांना विशेष आस्था होती.यावेळी गोविंद राठी यांच्यासह १८ जणांनी रक्तदान केले. मनोज राठी, राजेंद्र राठी, श्रीराम टावरी, राजकुमार जाजू यांच्यासह समाजबांधवांनी सहकार्य केले. सचिव अमित लद्धड यांनी आभार मानले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २.० अंतर्गत वर्धा तालुकास्तरीय कार्यशाळा

वर्धा जनमाध्यम : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २.० अंतर्गत पंचायत समिती वर्धा येथे तालुकास्तरीय कार्यशाळा घेण्यात आली. ग्रामपंचायतींनी लोकसभागासह सूक्ष्म नियोजनातून सक्रिय सहभाग घेतला तरच स्पर्धेत यश प्राप्त होईल, असे यावेळी गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे यांनी सांगितले.



यावेळी उच्चश्रेणी गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, गटशिक्षणाधिकारी डॉ.कुमरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.माधुरी दिघेकर, कृषी अधिकारी श्री.धारकर, विस्तार अधिकारी स्वाती वानखडे यांच्यासह पंचायत, कृषी, आरोग्य आणि शिक्षण विभागातील अधिकारी, सर्व गावचे सरपंच, प्रशासक, ग्राम पंचायत अधिकारी, कर्मचारी, रोजगार सेवक, ग्रामपंचायत केंद्रचालक, गटप्रवर्तक, आणि पर्यवेक्षिकांनी सहभाग घेतला.

कोर्ट विद्यमान श्रीमती. एन. जे. पेठे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, हिंगणघाट, जिल्हा वर्धा

जाहिरनामा

किरकोळ अर्ज ६१/२०२६ पेशी ताः ०१/०१/२०२७

अर्जदार :

१. प्रभावती वाल्मीकराव गायकवाड

वय ६५ वर्ष, कामधंदा घरकाम रा. अंबोडा दहेबाव (मास्कीन), ता. हिंगणघाट जि. वर्धा

विरुध्द

गैरअर्जदार :

निरंक

ज्याअर्थी अर्जदार हे मृतक कमलाकर गुलाबराव हिवरकर यांचे बहीण आहे. मृतक कमलाकर गुलाबराव हिवरकर यांचा मृत्यु दि.०१/०६/२०२६ रोजी हिंगणघाट येथे झाला आहे. मृतक कमलाकर गुलाबराव हिवरकर हे अविवाहीत असुन त्यांना कोणतेही अपत्य नाही आहे. मृतक कमलाकर गुलाबराव हिवरकर यांचे मृत्युनंतर अर्जदार हे मृतकांचे कायदेशीर वारस आहेत.

मृतक कमलाकर गुलाबराव हिवरकर यांच्या इतर शासकीय व निमशासकीय असल्याने अर्जदार प्रभावती वाल्मीकीराव वारसान प्रमाणपत्र कामाकरीता वारसान प्रमाणपत्र आवश्यक गायकवाड विरुध्द निरंक, यांनी किरकोळ अर्ज ६१/२०२६ मिळण्याकरीता विद्यमान न्यायालयात दाखल केले आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जदार प्रभावती वाल्मीकीराव गायकवाड विरुध्द निरंक, हे परोक्त मृतकांचे कायदेशीर वारसान नाही असे कोणास सांगावयाचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून १ महिन्याचे आत त्यांनी हया न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती लेखी कळवाव्या आणि जर दिलेल्या मुदतीत कोणत्याही हरकती प्राप्त झाल्या नाही तर हया लेखावरून हे न्यायालय सदर अर्जदार यांचे मागणी प्रमाणे ते असल्याबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क प्रमाणपत्राबाबत योग्य तो आदेश पारित करण्यात येईल. कायदेशीर वारस शाबीत झाल्यास कायदेशीर

दिनांक २१/११/२०२६

आदेशान्वये

सहाय्यक अधिक्षक सह दिवाणी न्यायालय क. स्तर, हिंगणघाट. जि. वर्धा.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

नवी इनिंग

'कॅप्टन कूल' महेंद्रसिंग धोनी आता नव्या भूमिकेत दिसणार आहे. खेळाडू आणि कर्णधार भारतीय क्रिकेटला म्हणून अनेक ऐतिहासिक क्षण देणारा धोनी आता चेन्नई सुपर सुपर किंग्जचा मार्गदर्शक म्हणून नव्या खेळाडूंना घडवणार आहे. रांचीच्या सामान्य कुटुंबातून आलेल्या महेंद्रसिंग धोनीने तिकीट तपासनीस ते भारतीय संघाचा यशस्वी कर्णधार असा प्रवास केला. आपल्या नेतृत्वाखाली भारताला टी- २० आणि एकदिवसीय विश्वचषक जिंकून देणाऱ्या धोनीने कोट्यवधी चाहत्यांची मने जिंकली. आता आयपीएलमधील खेळाडू म्हणून त्याचा प्रवास थांबणार असून, तो चेन्नई सुपर किंग्जचा मार्गदर्शक म्हणून नवी जबाबदारी स्वीकारणार आहे. धोनीचा हा प्रवास संघर्षातून सुरू झाला. लहानपणी त्याला क्रिकेटपेक्षा फुटबॉलची अधिक आवड होती. शाळेत तो फुटबॉलचा गोलरक्षक म्हणून खेळायचा. मात्र, त्याच्यातील यष्टीरक्षणाचे कौशल्य प्रशिक्षकांनी ओळखले आणि त्याला क्रिकेटकडे वळवले. घरची परिस्थिती सामान्य असतानाही त्याने क्रिकेटची आवड जपली. खडगपूर रेल्वे स्थानकावर नोकरी करत असताना तो सरावासाठी वेळ काढत असे. नोकरी आणि क्रिकेट यांची सांगड घालत त्याने भारतीय संघात स्थान मिळवण्याचे स्वप्न पाहिले. २००४ मध्ये त्याला भारतीय संघात संधी मिळाली. सुरुवातीच्या काही सामन्यांत त्याला मोठी खेळी करता आली नाही. मात्र, पाकिस्तानविरुद्ध विशाखापट्टणम येथे केलेल्या आक्रमक फलंदाजीने त्याने आपली ओळख निर्माण केली. लांब केस, आक्रमक फटके आणि हेलिकॉप्टर शॉटमुळे तो अल्पावधीतच चाहत्यांच्या पसंतीस उतरला. यष्टीमागे त्याची चपळाई आणि निर्णय घेण्याची क्षमता, यामुळे तो एक परिपूर्ण खेळाडू म्हणून नावारूपाला आला. २००७ मध्ये पहिल्या टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाचे नेतृत्व धोनीकडे सोपवण्यात आले. संघात अनेक अनुभवी खेळाडू नव्हते. मात्र, धोनीने तरुण खेळाडूंना सोबत घेत संघाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. अंतिम सामन्यात पाकिस्तानविरुद्धचा थरार आणि अखेरच्या षटकात जोगिंदर शर्माकडे चेंडू सोपवण्याचा त्याचा निर्णय आजही चाहत्यांच्या लक्षात आहे. भारताने तो सामना जिंकत पहिल्या टी-२० विश्वचषकावर नाव कोरले. या विजयाने धोनीच्या नेतृत्वाची ताकद जगासमोर आली. त्यानंतर त्याच्याकडे भारतीय संघाचे पूर्णवेळ कर्णधारपद सोपवण्यात आले. धोनीच्याच नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने २८ वर्षांनंतर एकदिवसीय विश्वचषक जिंकला. मुंबईच्या वानखेडे मैदानावर श्रीलंकेविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात धोनीने नाबाद ९१ धावा केल्या. गौतम गंभीरसोबतची त्याची भागीदारी आणि विजयावर शिक्कामोर्तब करणारा शेवटचा षटकार आजही क्रिकेटप्रेमी विसरलेले नाहीत. २०१३ मध्ये चॅम्पियन्स करंडक जिंकून धोनीने आणखी एक मोठे यश मिळवले. आयसीसीच्या तीन प्रमुख मर्यादित षटकांच्या स्पर्धा जिंकणारा तो पहिला कर्णधार ठरला. धोनीच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कठीण प्रसंगातही शांत राहण्याची त्याची वृत्ती. विजय मिळाल्यावर त्याने त्याचे श्रेय सहकाऱ्यांना दिले, तर पराभवाची जबाबदारी स्वतः स्वीकारली. त्याच्या नेतृत्वाखाली अनेक नव्या खेळाडूंना संधी मिळाली. पुढे याच खेळाडूंनी भारतीय संघात महत्त्वाची कामगिरी केली. त्यामुळे धोनीने केवळ सामने जिंकले नाहीत, तर नव्या खेळाडूंनाही घडवले. २०१४ मध्ये धोनीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. २०१७ मध्ये त्याने मर्यादित षटकांच्या संघाचे कर्णधारपद सोडले. त्यानंतर १५ ऑगस्ट २०२० रोजी त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. हा निर्णय चाहत्यांसाठी अनपेक्षित होता. मात्र, धोनीने आपल्या कारकिर्दीतील महत्त्वाचे निर्णय नेहमीच शांतपणे घेतले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटला निरोप दिल्यानंतरही त्याचा क्रिकेटशी संबंध कायम राहिला. आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून खेळताना तो चाहत्यांच्या भेटीला येत राहिला. २००८ मध्ये आयपीएल सुरू झाल्यापासून चेन्नई सुपर किंग्ज आणि धोनी यांचे नाते अधिक घट्ट झाले. धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नईने पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावले. दोन वेळा चॅम्पियन्स लीग टी- २० स्पर्धाही जिंकली. पिवळ्या जर्सीत मैदानावर उतरणारा धोनी चेन्नईच्या चाहत्यांसाठी केवळ कर्णधार राहिला नाही, तो त्यांच्या आनंदाचा आणि विश्वासाचा भाग बनला. संघ अडचणीत असताना त्याच्याकडे पाहिले जायचे. त्याचा अनुभव, शांतपणा आणि निर्णयांवर चाहत्यांचा विश्वास होता. त्यामुळेच धोनी आणि चेन्नईचे नाते इतर संघांपेक्षा वेगळे ठरले. आता चेन्नई सुपर किंग्जच्या मार्गदर्शकपदी त्याची नियुक्ती झाल्याने या नात्याला नवे वळण मिळणार आहे. मैदानावर फलंदाजी करताना, यष्टीमागे उभे राहून प्रतिस्पर्ध्यांच्या डावपेचांना उत्तर देताना धोनीला पाहण्याची चाहत्यांना सवय झाली आहे. त्यामुळे त्याला खेळाडू म्हणून मैदानावर पाहता येणार नाही, ही बाब चाहत्यांसाठी नक्कीच हळवी आहे. सामन्याचा दबाव कसा हाताळायचा, कठीण वेळी निर्णय कसे घ्यायचे आणि संघासाठी एकत्र कसे खेळायचे, हे त्याने आपल्या कारकिर्दीतून दाखवून दिले आहे. त्याचा फायदा नव्या पिढीला होऊ शकतो. धोनीच्या कारकिर्दीत अनेक विक्रमांची नोंद झाली. मात्र, त्याला चाहत्यांच्या मनात खास स्थान मिळवून दिले ते त्याच्या खेळाइतकेच त्याच्या स्वभावाने. मोठे यश मिळूनही त्याचे पाय जमिनीवर राहिले. पराभवाने तो खचला नाही आणि विजयाने हुरळूनही गेला नाही. संघातील प्रत्येक खेळाडूला सोबत घेऊन पुढे जाण्याची त्याची वृत्ती अनेकांना भावली. म्हणूनच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही त्याची लोकप्रियता कायम राहिली. धोनीचा खेळाडू म्हणून आयपीएलमधील प्रवास आता नव्या टप्प्यावर पोहोचत आहे. मैदानावर त्याने चेन्नईला अनेक विजय मिळवून दिले. आता मार्गदर्शक म्हणून तो नव्या खेळाडूंना विजयाचा मार्ग दाखवणार आहे. त्याच्या हातात आता बॅट नसेल, यष्ट्यांमागे त्याची चपळाई दिसणार नाही; पण त्याचा अनुभव आणि मार्गदर्शन संघासाठी महत्त्वाचे ठरेल. एका सामान्य तरुणाने आपल्या जिद्दीच्या जोरावर क्रिकेटविश्वात निर्माण केलेले स्थान आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

महागाईचे पीक!

एकाचवेळी भारतात दुष्काळजन्य परिस्थिती व भू-राजकीय समस्यांमुळे उद्भवलेली महागाई, तर दुसरीकडे बँकांच्या क्रेडिटच्या मदतीने फुगत चाललेली 'मागणी' अशी दुधारी तलवार निर्माण झाली आहे. यामुळे येणाऱ्या काळात महागाईचे पीक अधिकच फोफावू शकते.



ताज्या आकडेवारीनुसार, भारतातील किरकोळ महागाईच्या दराने (सीपीआय इन्फ्लेशन रेट) आता गेल्या दोन वर्षांतील उच्चांक गाठला आहे. ऑक्टोबर महिन्यात हा दर ६.०९ टक्क्यांवर जाऊन पोचला असून, तो आता रिझर्व्ह बँकेच्या ६ टक्के - या मर्यादेपेक्षा अधिक आहे. 'किरकोळ महागाई निर्देशांक' हा सामान्य ग्राहक ज्या वस्तू व सेवा वापरतात (उदा. अन्नधान्य, कपडेलत्ते, घरभाडे, वाहतूक, वैद्यकीय सेवा, शिक्षण, मनोरंजन इत्यादी) - त्यांच्या किंमतींमधील बदलांची नोंद घेत असतो. हा महागाईचा दर प्रामुख्याने अन्नधान्याच्या चढ्या किंमती व वाढलेला वाहतूकखर्च, यांमुळे उंचावला असला तरीही गेल्या काही महिन्यांत इतर उपभोग्य वस्तू व सेवा यांच्या किंमतीतही लक्षणीय वाढ झाली आहे. म्हणजेच महागाई व्यापकपणे वाढली आहे, हे दिसून येते.

अन्नधान्यातील महागाईचे बारकाईने निरीक्षण केले तर हे दिसून येते की तांदूळ, ज्वारी, लहान भरड धान्ये, डाळी (विशेषत: तूर व उडीद डाळ), खाद्यतेले, साखर, गूळ, भाज्या (कांदा, लसूण, मुळा), फळे (केळी, नारळ, पपई, पेरू), दूध, अंडी, मांसाचे विविध प्रकार, अशा सामान्यांच्या जेवणातील अनेक महत्त्वाच्या खाद्यपदार्थांच्या किंमती आजमितीला जबरदस्त वाढलेल्या आहेत. या मागची प्रमुख कारणे म्हणजे या वर्षी बसलेला एल निनोचा धक्का (गेल्या १० वर्षांतील सर्वाधिक तीव्र असा हवामानविषयक व्यत्यय), त्यामुळे झालेले पिकांचे नुकसान व कमी उत्पादन तसेच जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्यय (इराण-अमेरिका-इस्त्राएल युद्ध) ही आहेत.

सन १९५१-५२ पासून ते आत्तापर्यंतच्या काळात भारताला एकूण २५ वेळा 'एल निनो' या हवामान व्यत्ययाचा सामना करावा लागला. त्यापैकी चार वेळा अती तीव्र 'एल निनो'चा फटका बसला. चालू वर्षातील 'एल निनो' हे त्या चारांपैकी एक म्हणजेच 'अती तीव्र' स्वरूपाचे आहे. त्यामुळेच या वर्षीचा पावसाळा जबरदस्त अशा १३ टक्के तुटीसह संपला. या काळात, विविध महिन्यांतील तसेच प्रदेशांतील पावसाच्या प्रमाणात तीव्र विषमता दिसून आली. भारताच्या पूर्व, दक्षिण तसेच ईशान्येकडील राज्यांत (२६ टक्के तूट) तसेच दक्षिणेकडील राज्यातही (२४ टक्के तूट) अगदीच कमी पाऊस पडल्याने प्रचंड तूट दिसून आली. तुलनेने एकूण तुटीचे प्रमाण मध्य भारतात (३ टक्के तूट) व वायव्य भारतात (६ टक्के तूट) कमी राहिले.

जिल्हा पातळीवर विचार केला तर या वर्षी भारतातील एकूण जिल्ह्यांपैकी ४४ टक्के जिल्ह्यांत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. हे मान्सूनच्या अखेरीचे चित्र आहे. त्यानंतरच्या काळात वाढलेल्या उष्णतेमुळे तसेच सततच्या पाणीवापरामुळे देशभरातील पाण्याच्या साठ्यांत झपाट्याने घट होते आहे. १२ नोव्हेंबरच्या केंद्रीय जल आयोगाच्या अहवालानुसार, देशातील एकूण पाण्याचा साठा गेल्या वर्षीच्या तुलनेत ३० टक्क्यांनी घटला असून, गेल्या दहा वर्षांतील सरासरीपेक्षा २० टक्क्यांनी घटला आहे. दक्षिण भारतातील परिस्थिती भीषण असून आंध्र प्रदेश, तेलंगण व तमिळनाडू या राज्यांतील पाण्याचे साठे एकूण क्षमतेच्या ४० टक्क्यांहूनही कमी झाले आहेत. महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थानमधील अनेक जिल्हे 'दुष्काळग्रस्त' म्हणून जाहीर झाले आहेत. तर आसाम, मेघालय, बिहार आणि पश्चिम बंगाल येथील पाण्याचे साठे एकूण क्षमतेच्या ५० टक्क्यांहून कमी झाले आहेत.

साहजिकच दुष्काळग्रस्त परिस्थितीचा खरीप पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. दक्षिणेतील राज्ये, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, पश्चिम मध्य प्रदेश, बिहार, आणि ईशान्य भारतातील खरीप पिकांवर सर्वाधिक ताण दिसून आला आहे, ज्याचा परिणाम तांदूळ, ज्वारी, भरड धान्ये, कांदे, डाळी व साखर यांच्या अवाच्यासवा भडकलेल्या किंमतींत दिसून येत आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्यामुळे तसेच जलाशयांतील पाण्याचा साठा आटत चालल्यामुळे रबी हंगामातील पेरणीदेखील मंदावली आहे. नोव्हेंबरच्या मध्यापर्यंतच्या आकडेवारीप्रमाणे, गव्हाची पेरणी १५.३ टक्क्यांनी तर हरभऱ्याची पेरणी २१.६ टक्क्यांनी, मागील वर्षांच्या तुलनेत पिछाडीवर आहे. याचा येणाऱ्या काळातील अन्नधान्याच्या महागाईवर निश्चितपणे नकारात्मक परिणाम दिसून येणार आहे.

भारतातील महागाईला यावर्षी बसलेला धक्का हा फक्त अन्नधान्याच्या चढलेल्या किंमतींचा नसून, पश्चिम आशियातील युद्धामुळे वाढलेल्या जागतिक ऊर्जा किंमतींचा तसेच कमकुवत झालेल्या रुपयामुळे वाढलेल्या आयात-वस्तूंच्या किंमतीचासुद्धा आहे. सरकारी हस्तक्षेपामुळे पेट्रोल व डिझेलच्या किंमतींत जरी मर्यादित वाढ झाली असली तरीही व्यावसायिक द्रवीभूत पेट्रोलियम वायू (एलपीजी) तसेच अनेक रसायने, खते व प्लास्टिकच्या किंमतींत लक्षणीय वाढ झाली आहे. ऑक्टोबर महिन्यात घाऊक किंमत निर्देशांकात मोजला जाणारा वार्षिक महागाईचा दर १२.३ टक्के एव्हढा झाला आहे. यामुळे वाढलेल्या उत्पादन खर्चाचा साहजिकच कंपन्यांच्या नफ्यावर विपरीत परिणाम झाला आहे.

एकाच वर्षात 'अन्नधान्याच्या महागाई'चा तसेच 'ऊर्जा-महागाई'चा फटका बसणे हे भारतासारख्या विकसनशील व ऊर्जा-आयातीवर जबरदस्त अवलंबत्व असलेल्या देशासाठी नक्कीच सोपे नाही. यातून उद्भवणारी महागाई ही तात्कालिक स्वरूपाची न राहता, चिवट बनण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यात औपचारिक क्षेत्रातील निरनिराळ्या उद्योगांचे आर्थिक वाढीचे चढे दर, बँकांच्या क्रेडिटमध्ये होत असलेली वार्षिक वाढ (१९ टक्क्यांच्या आसपास), उपभोग्य वस्तूंसाठी बँकांकडून घेण्यात आलेली मुबलक कर्जे इत्यादी गोष्टी लक्षात घेतल्या तर भारतातील 'मागणी'चे प्रमाण अजूनही मजबूत असल्याचे दिसून येते. त्यात घरगुती क्षेत्राचे (हाऊसहोल्ड सेक्टर) कर्जे काढून विविध खर्च भागविण्याचे प्रमाण जबरदस्त वाढले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया याबाबतीत सतत धोक्याचा कंदील दाखवत असते.

म्हणजे एकाचवेळी भारतात दुष्काळजन्य परिस्थिती व भू-राजकीय समस्यांमुळे उद्भवलेली महागाई, तर दुसरीकडे बँकांच्या क्रेडिटच्या मदतीने फुगत चाललेली 'मागणी' अशी दुधारी तलवार निर्माण झाली आहे. यामुळे येणाऱ्या काळात महागाईचे पीक अधिकच फोफावू शकते.

हल्ली भारतात हे म्हणण्याची फॅशन झाली आहे की महागाई जेव्हा 'पुरवठ्याला बसलेल्या धक्क्या'मुळे (सप्लाय शॉक) उद्भवते, तेव्हा ती 'तात्पुरत्या' स्वरूपाची असते. म्हणजेच ती चिवटपणे टिकून राहण्याची शक्यता अतिशय कमी असते. पण हे खरे नाही. एकीकडे पुरवठ्याला बसलेल्या धक्क्यामुळे उद्भवलेली महागाई असेल व दुसरीकडे सतत वाढणारी 'मागणी' असेल तर महागाई आटोक्यात आणणे अतिशय कठीण होऊन बसते. त्यात जेव्हा सामान्य लोकांची व उद्योजकांची महागाई वाढतच जाईल अशी 'अपेक्षा' वा 'अंदाज' असतो, तेव्हा त्यांचे प्रयत्न 'वेतन' वाढवून घेण्याच्या दिशेने सुरू होतात, ज्यामुळे खर्च आणखी वाढतात व महागाईला उत्तेजन मिळते. महागाईचे दुष्टचक्र यातून सुरू होते.

महागाई वेळेतच आटोक्यात आणणे अत्यावश्यक असते; कारण महागाई हा गरीब तसेच मध्यम-उत्पन्न वर्गावर लादलेला 'कर' असतो. कमी उत्पन्न असलेली कुटुंबे त्यांच्या उत्पन्नाचा बराच मोठा हिस्सा अन्न, निवारा आणि ऊर्जा यांसारख्या मूलभूत गरजांवर खर्च करतात. जेव्हा या अत्यावश्यक गोष्टींच्या किंमती वाढतात, तेव्हा गरीब कुटुंबांना आपला खर्च कमी करणे किंवा स्वस्त पर्यायांकडे वळणे सहज शक्य नसते. कमी उत्पन्न असलेल्या लोकांचे आणि असंघटित कामगारांचे वेतन, खासगी कंपन्यांत वा सरकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मोबदल्यासारखे लवचीक नसते. त्यांना सहजपणे वेतनवाढ मिळू शकत नाही. त्यामुळेच महागाईचा भस्मासूर जेव्हा उग्र बनतो तेव्हा गरिबांच्या राहणीमानात झपाट्याने व वास्तविक घट होते. यामुळेच महागाई आटोक्यात ठेवणे हे कुठल्याही कल्याणकारी देशातील केंद्रीय बँकेचे आद्य कर्तव्य समजले जाते. याच कारणांमुळे भारतानेही २०१६ साली अधिकृतपणे 'महागाईचे लक्ष्य निश्चित करण्याचे' धोरण (इन्फ्लेशन टार्गेटिंग फ्रेमवर्क) स्वीकारले आहे.

खरेतर २०२६-२७ या वित्तीय वर्षाच्या सुरुवातीपासूनच वाढणाऱ्या महागाईचे निश्चित संकेत मिळण्यास सुरुवात झाली होती; तरीदेखील रिझर्व्ह बँकेने महागाई आटोक्यात ठेवण्यासाठीच्या उपाययोजनेची सुरुवात वेळेत केलेली नाही. रिझर्व्ह बँकेने पैशाच्या पुरवठ्यावर कडकपणे नियंत्रण न ठेवल्याने, तसेच व्याजाचे दर पुरेशा प्रमाणात न वाढविल्याने अर्थव्यवस्थेतील अनुत्पादक खर्च तर वाढले आहेतच, पण अनेक वित्तीय क्षेत्रांत (सुवर्णकर्ज, विनातारण वैयक्तिक कर्ज इत्यादी) मध्ये फुगवटा निर्माण झाला आहे. यांमुळेच ४ डिसेंबर रोजी जाहीर होणाऱ्या मौद्रिक धोरणात रिझर्व्ह बँकेकडून महागाईच्या विरोधात कठोर उपाययोजनेची अपेक्षा आहे. कारण महागाईला खूप दीर्घकाळ उच्च पातळीवर राहू दिले, तर ती खाली आणण्यासाठी रिझर्व्ह बँकेला पुढे जाऊन आक्रमकपणे व्याजदर वाढवावे लागतील, ज्यामुळे व्यावसायिक गुंतवणुकीला तर खीळ बसेलच पण बेरोजगारीतही वाढ होईल. भारताला हे निश्चितच परवडणारे नाही.

(साभार -मटा संवाद)

डॉ. रूपा रेगे नित्सुरे

थेंब थेंब बचतीतूनच भविष्य सुरक्षित

आज पाणी जपले तरच उद्या जीवन जगता येईल. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे ही केवळ जबाबदारी नाही, तर पुढील पिढ्यांप्रति आपले कर्तव्य आहे.



मानवी जीवन, शेती, पशुधन, उद्योग आणि पर्यावरण या सर्वांचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून आहे. असे असतानाही पाण्याचा अमर्याद आणि निष्काळजीपणे होणारा वापर चिंतेचा विषय बनला आहे. आज पाण्याची उपलब्धता ही केवळ नैसर्गिक बाब राहिलेली नसून ती भविष्यातील अस्तित्वाची मोठी समस्या बनत आहे. त्यामुळे पाणी जपून वापरणे ही काळाची गरज आहे. बदलते हवामान, अनियमित पाऊस, वाढते तापमान, भूजल पातळीत होणारी घट आणि पाण्याचे प्रदूषण यामुळे पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होत आहे. काही ठिकाणी नागरिकांना पाण्यासाठी आत्ताच दूरवर भटकंती करावी लागते आहे. दुसरीकडे शहरांमध्ये पाण्याचा बेसुमार वापर, गळणारे नळ, वाहन धुण्यासाठी होणारी पाण्याची उधळपट्टी आणि पाण्याचे अयोग्य नियोजन दिसून येते. एकीकडे पाण्यासाठी संघर्ष सुरू असताना दुसरीकडे पाण्याचा अपव्यय होणे ही निश्चितच दुर्दैवी बाब आहे.

महाराष्ट्राचा विचार करता राज्यात पावसाचे प्रमाण असमान आहे. कोकणात मुसळधार पाऊस पडतो, तर मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भाग कायम दुष्काळाच्या छायेत असतात. पावसाने ओढ दिली, की पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावे लागतात. लातूरसारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवण्याची वेळ आली होती, हे आपण विसरू शकत नाही. धरणांमध्ये गाळ साचल्याने त्यांची पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे तर भूजलाचा बेसुमार उपसा झाल्याने विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडत आहेत. पाणीटंचाई ही काहीशी नैसर्गिक तर बहुतांशी मानवनिर्मित समस्या आहे. या संकटामागे अनेक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय कारणे आहेत. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी आणि अन्नधान्य उत्पादनासाठी पाण्याची मागणी प्रचंड वाढली आहे. काँक्रीटच्या जंगलांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे मार्ग बंद झाले आहेत. भूजलाचा अतिरेकी उपसा, असमान आणि अनियमित पाऊस, शेतीमधील पारंपरिक आणि चुकीच्या सिंचन पद्धती इत्यादीमुळे जलसंकट निर्माण झाले आहे. यावर उपाय म्हणजे पाण्याचा जपून वापर करणे!

पाण्याच्या उपलब्धतेसाठी जलस्रोतांचे पुनर्भरण करावे लागेल. घराच्या छतावर पडणारे पावसाच्या पाण्याने जलस्रोतांचे पुनर्भरण करता येते. मानवाने विज्ञानाच्या भरवशावर अनेक शोध लावले असले, तरी आजपर्यंत त्याला पाणी तयार करता आले नाही. पाण्यासाठी आपल्याला पावसावरच अवलंबून राहावे लागणार आहे. पावसाचे पाणी जास्तीत जास्त जमिनीत मुरविले पाहिजे. पाण्याचा वापर पैशासारखा करायला शिकले पाहिजे. पारंपरिक पद्धतीने पिकांना पाणी देताना मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होतो.

त्यामुळे ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. पिकांच्या गरजेनुसार पाणी देणे, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य देणे आणि पावसाच्या पाण्याचे संकलन करणे यामुळे पाण्याची बचत होऊ शकते. शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिल्यास भूजल पातळी वाढण्यास मदत होईल.

पाणी बचतीची जबाबदारी केवळ सरकार किंवा प्रशासनाची नाही, तर प्रत्येक नागरिकाची आहे. दात घासताना नळ सुरू ठेवणे, आंघोळीसाठी गरजेपेक्षा जास्त पाणी वापरणे, घरातील नळ गळत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करणे अशा छोट्या चुका मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय घडवतात. घरगुती वापरात पाणी जपून वापरणे, पावसाचे पाणी साठवणे, वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे आणि पाण्याचे स्रोत स्वच्छ ठेवणे या सवयी प्रत्येकाने अंगीकारल्या पाहिजेत. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि सामाजिक संस्थांनी पाणी बचतीबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच पाण्याचे महत्त्व रुजवले पाहिजे. गावागावांत जलसंधारणाच्या चळवळी उभ्या राहिल्या पाहिजेत. शहरांमध्ये पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था बंधनकारक करण्याबरोबरच सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यावर भर दिला पाहिजे. प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून पाण्याची गळती आणि चोरी रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

पाण्याचा प्रश्न हा केवळ आजचा प्रश्न नाही, तर तो येणाऱ्या पिढ्यांच्या भविष्याशी जोडलेला आहे. आज आपण पाण्याचा अपव्यय केला, तर उद्या आपल्या मुलांना आणि नातवंडांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागेल. त्यामुळे पाणी ही अमर्याद उपलब्ध असलेली संपत्ती नाही, याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते, की पाणी वाचविण्यासाठी मोठ्या योजना किंवा घोषणांचीच गरज नाही, तर प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील छोट्या कृतीही महत्त्वाच्या आहेत. प्रत्येक थेंबाचे मोल ओळखून पाण्याचा काटकसरीने वापर केला, तरच जलसंकटावर मात करणे शक्य होईल. आज पाणी जपले तरच उद्या जीवन जगता येईल. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे ही केवळ जबाबदारी नाही, तर पुढील पिढ्यांप्रति आपले कर्तव्य आहे. म्हणूनच संकल्प करूया, पाणी जपूया, जीवन वाचवूया !

प्रा. संजय बडे,
दहेगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

पथदिव्यावर कोट्यवधीची उधळपट्टी,मूलभूत सुविधांचा मात्र अंधार!

आधी पाच कोटींचा खर्च,आता पुन्हा दोन कोटींची तरतूद बंद दिवे,अस्वच्छ सांस्कृतिक भवन, सीसीटीव्ही आणि दुकान गाळ्यांचे प्रश्न वाऱ्यावर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

बाभूळगाव, दि. २२ : बाभूळगाव नगरपंचायतीच्या विकासकामांच्या प्राधान्यक्रमावरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात यापूर्वी पथदिव्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च झाले असताना वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून पुन्हा दोन कोटींचा निधी पथदिव्यासाठी मंजूर झाल्याची माहिती आहे. मात्र, आधी बसविलेले अनेक दिवे बंद, सांस्कृतिक भवन अस्वच्छ, शहरात सीसीटीव्हीचा अभाव आणि नगरपंचायतीचे दुकान गाळे उत्पन्नाविना पडून असल्याचे चित्र आहे.

भाडे चार हजार, सुविधा मात्र शून्य!

गोरगरीब नागरिकांसाठी उभारलेल्या सांस्कृतिक भवनाची अवस्था दयनीय झाली आहे. कार्यक्रमासाठी चार हजार रुपये भाडे आकारले जात असताना उघड्यावर असलेली विद्युत वायरिंग, बंद पंखे आणि अस्वच्छ स्वच्छतागृहांमुळे नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

मग विकासाच्या नावाखाली पुन्हा पथदिव्यांवरच एवढा खर्च कशासाठी, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.यापूर्वी शहरातील विविध भागांत सुमारे पाच कोटी रुपये खर्चून पथदिवे बसविण्यात आले. त्यानंतर पाच इलेक्ट्रिक हायमास्ट आणि १७ सौरऊर्जे वरील दिव्यासाठीही सुमारे एक कोटी दहा लाख रुपये खर्च करण्यात आले. आता बसस्थानक ते हिंदू स्मशानभूमी पर्यंत पथदिवे उभारण्यासाठी पुन्हा दोन कोटींचा निधी मंजूर झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, जुन्या दिव्यांची देखभाल आणि दुरुस्तीच होत नसेल, तर नव्या दिव्यांचा उपयोग काय? शहरात चोरीच्या घटनांबाबत तक्रारी वाढत असताना प्रमुख चौक आणि संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी अद्याप प्रलंबित आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेपेक्षा पथदिव्यांना प्राधान्य का, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

पाच कोटींची इमारत, दुकानगाळे उत्पन्नाविना!

नगरपंचायतीची सुमारे पाच कोटींची प्रशासकीय इमारत उभारण्यात आली; मात्र उत्पन्नवाढीसाठी तयार केलेल्या दुकान गाळ्यांचा भाडेतत्त्वावर वापर सुरू करण्याबाबतही अपेक्षित कार्यवाही झालेली नाही. दुसरीकडे घरपट्टी आणि पाणीपट्टीतील वाढीमुळे नागरिकांवर आर्थिक भार वाढला आहे. नगरपंचायतीने नव्या खर्चाचे समर्थन करण्यापूर्वी जुन्या कामांचा लेखाजोखा, देखभालीची स्थिती आणि निधीच्या विनियोगाचा तपशील जनतेसमोर मांडावा. विकास म्हणजे केवळ नवीन दिवे लावणे नव्हे; तर सुरक्षितता, स्वच्छता, उपलब्ध सुविधांची देखभाल आणि उत्पन्नवाढ ही आहे. अन्यथा कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही बाभूळगावच्या मूलभूत प्रश्नांचा अंधार कायम राहणार, हे निश्चित!

वृक्षारोपण केलेली झाडे गेली कुठे? लोखंडी जाळ्या कशासाठी? वृक्षारोपणाच्या खर्चाचा हिशेब द्या!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. २२ : पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली वृक्षारोपण करायचे, झाडांच्या संरक्षणासाठी लोखंडी जाळ्या व खांब उभारायचे आणि नंतर झाडे जगली की वाळली, याची साधी दखलही घ्यायची नाही, असा प्रकार पुसद शहरात समोर आला आहे. वृक्षारोपणातील झाडे गायब असताना त्यांच्या संरक्षणासाठी लावलेल्या जाळ्या व खांब काढण्याचे काम सुरू असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

बी.एन. इंजिनिअरिंग कॉलेज ते बसस्थानक, बसस्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि पुढे पी.एन. कॉलेजपर्यंतच्या मार्गावर एक ते दोन वर्षांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने वृक्षारोपण केले होते. त्यावेळी झाडांच्या संरक्षणासाठी लोखंडी जाळ्या व खांबही लावण्यात आले. मात्र, आज त्या झाडांचे अस्तित्वच दिसत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. झाडे वाळली की गायब झाली, त्यांचे संगोपन कोणी केले आणि किती वेळा पाहणी झाली, याचे उत्तर विभागाकडे आहे काय? विशेष म्हणजे, झाडे जगविण्याऐवजी त्यांच्या संरक्षणासाठी उभारलेल्या जाळ्या व खांब काढले जात असल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशिम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी केला आहे. जिवंत झाडांचे संरक्षण आणि वाळलेल्या झाडांच्या जागी नव्याने लागवड करण्याऐवजी साहित्य काढण्याची घाई कशासाठी, किती निधी खर्च झाला? हा निधी विभागाचा की आमदार-खासदार निधीतील होता? काढलेले साहित्य कुठे जमा केले जाणार? या प्रश्नांचा खुलासा होणे आवश्यक आहे. वृक्षारोपण म्हणजे केवळ फोटोसेशन आणि खर्चाची नोंद नव्हे, तर लावलेली झाडे जगविण्याची जबाबदारीही प्रशासनाची आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने संपूर्ण खर्चाचा तपशील, झाडांच्या सद्यस्थितीचा अहवाल आणि जाळ्या काढण्यामागील कारणे जाहीर करावीत. अन्यथा वृक्षारोपणाच्या नावाखाली झालेल्या खर्चाचा जाब नागरिकांना विचारावा लागेल, असा इशारा मुधाने यांनी दिला आहे.

थोडक्यात



संत नामदेव महाराज जयंती उत्साहात साजरी..!

गुणवंत विद्यार्थी व कर्तृत्ववानांचा गौरव

घाटंजी : संत नामदेव महाराजांच्या समता, बंधुता आणि माणुसकीच्या विचारांचा जागर करीत शिंपी समाज संघटनेच्या वतीने २० नोव्हेंबर रोजी जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शिंपी समाज भवनात आयोजित सोहळ्यात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनानंतर विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्ती आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. आमदार राजू तोडसाम यांनी जात नव्हे, तर कर्म आणि कर्तृत्व माणसाची श्रेष्ठता ठरवते, असे प्रतिपादन केले. एपीआय विनाश जाधव उद्घाटक म्हणून उपस्थित होते. अध्यक्ष प्रशांत नमुलवार यांनी सामाजिक संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले. महाआरती व स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



AIMIMकडून टिपू सुलतान यांना अभिवादन

पांढरकवडा : शहीद टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त पांढरकवडा येथे AIMIMच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २० नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या शौर्यपूर्ण इतिहासाचे स्मरण करण्यात आले. यावेळी AIMIMचे शहराध्यक्ष नौशाद नूरुद्दीन तंवर, तालुकाध्यक्ष रियाज खान आणि तालुका संघटक अल्ताफ शेख उपस्थित होते. तसेच साजिद सय्यद, शाकिब खान, शोएब खान, हुसेना अली, शोएब बेग, मलिक पोसवाल, रेहान काझी यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.
टिपू सुलतान यांनी परकीय सत्तेविरुद्ध दिलेला लढा, त्यांचे धैर्य आणि स्वाभिमानी नेतृत्व इतिहासात महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचे योगदान केवळ स्मरणापुरते मर्यादित न ठेवता त्यातून शौर्य, एकता, बंधुता आणि सामाजिक सलोख्याची प्रेरणा घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.



चंद्रपूर-मुकुटबन, राजुरा-मुकुटबन बस सुरू करण्यासाठी आमदार भोंगळे यांना साकडे..!

झरी : मागील वर्षभरापासून बंद असलेल्या चंद्रपूर-मुकुटबन आणि राजुरा-मुकुटबन बससेवेमुळे प्रवाशांचे हाल सुरू आहेत. विद्यार्थ्यांसह रुग्ण आणि सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत असताना परिवहन महामंडळाने याकडे दुर्लक्ष केल्याने मुकुटबन परिसरातील नागरिकांनी आमदार देवराव भोंगळे यांच्याकडे बससेवा पूर्ववत सुरू करण्याची मागणी केली.
शनिवारी मुकुटबन येथे रक्तदान शिबिरासाठी आलेल्या आमदारांना नागरिकांनी निवेदन दिले. त्याची दखल घेत आमदार भोंगळे यांनी चंद्रपूर आगाराला तातडीने फोन करून संबंधित अधिकाऱ्यांकडे बससेवा सुरू करण्याची मागणी केली. चंद्रपूर येथे उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांसह अनेक गावांतील प्रवाशांसाठी ही बससेवा महत्त्वाची आहे. मात्र, वर्षभरापासून सेवा बंद असल्याने खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. आता आमदारांच्या हस्तक्षेपानंतर बससेवा सुरू होण्याची आशा निर्माण झाली असली, तरी केवळ फोनाफोनी नको, तर प्रत्यक्ष बस रस्त्यावर धावावी, अशी अपेक्षा प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

न्यायालयाच्या आदेशानंतरही प्लॉटवर अतिक्रमण हिवरा ग्रामपंचायतीचे मौन का?

अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर कारवाई न झाल्यास न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणार का?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. २२ : महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) येथे न्यायालयाच्या आदेशाने ग्रामपंचायतीवर देखरेखीची जबाबदारी सोपविण्यात आलेल्या बसस्थानकालगतच्या प्लॉटवर पुन्हा अतिक्रमण झाल्याचा प्रकार समोर आला आहे.

त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याऐवजी ग्रामपंचायत प्रशासन नेमके काय करीत आहे, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित होत आहे. स्व. आनंदराव कदम (भास्कर) यांच्या मालकीच्या या प्लॉटसमोर काही दुकानदारांनी दुकाने थाटली होती. अतिक्रमण हटविण्यासाठी कदम यांनी न्यायालयात धाव घेतली. अनेक वर्षांच्या सुनावणीनंतर न्यायालयाने प्रकरणातील निर्णय राखून ठेवत संबंधित प्लॉटवर अतिक्रमण होऊ नये, यासाठी देखरेख करण्याचे निर्देश ग्रामपंचायत प्रशासनाला दिल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने महामार्गालगतचे अतिक्रमण हटविल्यानंतर संबंधित दुकानदारांनी पुन्हा याच प्लॉटवर दुकाने थाटून कब्जा केल्याचा आरोप आहे. न्यायालयाने जबाबदारी निश्चित करूनही अतिक्रमण वाढत असेल, तर ग्रामपंचायतीची भूमिका काय, हा प्रश्न उपस्थित होत आहे. अतिक्रमण रोखण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन तातडीने कारवाई करणार का? की या प्रकाराकडे दुर्लक्ष करून न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली होऊ देणार? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

अखेर तुटलेल्या जाळीची नगरपालिकेकडून दुरुस्ती!

नवीन लोखंडी जाळी बसविल्याने नागरिकांना दिलासा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. २२ : उमरखेड राज्य मार्गालगत पवननगर व मंगलमूर्ती नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील धोकादायक वळणावर नालीवरील लोखंडी जाळी तुटल्याने निर्माण झालेल्या अपघाताच्या धोक्याची अखेर नगरपरिषद प्रशासनाने दखल घेतली. दैनिक जनमाध्यमसह विविध वृत्तपत्रांनी हा प्रश्न सातत्याने मांडल्यानंतर रविवारी, दि. २२ नोव्हेंबर रोजी नगरपालिकेला दुरुस्तीचा मुहूर्त मिळाला. तुटलेली जाळी हटवून त्या ठिकाणी नवीन लोखंडी जाळी बसविण्यात आली. गेल्या २० ते २५ दिवसांपासून या ठिकाणी अपघाताचा धोका निर्माण झाला होता. यापूर्वी याच परिसरात अपघातांमध्ये जीवितहानी झाल्याच्या घटना घडल्याने नागरिकांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली होती. नगरपरिषदेकडे वारंवार तक्रारी करूनही कार्यवाही होत नसल्याने नागरिकांनी रास्ता रोको आंदोलनाचा इशाराही दिला होता. अखेर वृत्तपत्रांनी हा प्रश्न ऐरणीवर आणल्यानंतर प्रशासनाने हालचाल करीत जाळी बसविण्याचे काम पूर्ण केले. यामुळे महावीरनगर, पवननगर व मंगलमूर्ती नगर परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. प्रश्न मांडला की प्रशासनाला जाग येते, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. मात्र नागरिकांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांवर प्रसारमाध्यमांतून बातमी प्रसिद्ध होण्याची वेळ येण्यापूर्वीच प्रशासनाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

जनमाध्यम च्या बातमीचा इम्पॅक्ट..!

घरभाडे भत्ता प्रकरणात कृषी विभागावर संशयाची सुई,स्वतंत्र चौकशीची मागणी!

स्वतःचे घर असतानाही भत्ता उचलल्याचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २२ : वणी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःचे घर असतानाही घरभाडे भत्ता उचलून शासकीय निधीचा अपहार केल्याचा गंभीर आरोप व्हिसल ब्लोअर तथा माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत बोरेले यांनी केला आहे. या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी जिल्हाधिकारी विकास मीना यांना रजिस्टर पोचपावतीसह कायदेशीर नोटीस बजावली असून, प्रशासनाला १० दिवसांची मुदत दिली आहे.

बोरेले यांनी ६ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करून संबंधितांकडून आर्थिक वसुली, फौजदारी कारवाई आणि दोषींवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र, १२ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने ही तक्रार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे वर्ग केली. ज्या विभागाविरुद्ध तक्रार आहे, त्याच विभागाकडे चौकशी सोपविणे म्हणजे निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब असल्याचे बोरेले यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, तालुका कृषी अधिकारी डी. ए. राऊत यांनी १३ ऑक्टोबरच्या पत्रात २०२५-२६ या आर्थिक वर्षात कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आयकर विवरणपत्रासोबत घरभाडे पावत्या सादर केल्या नसल्याचे नमूद केल्याचा दावा बोरेले यांनी केला आहे. तरीही मुद्देनिहाय चौकशी न करता केवळ पत्रव्यवहार करण्यात आल्याचा आरोप आहे. ६ नोव्हेंबरचा अहवालही २० नोव्हेंबरला मिळाला; मात्र त्यात संपूर्ण चौकशी अहवाल नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्वतंत्र सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी, संबंधित अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी आणि कार्यवाहीचा लेखी अहवाल देण्याची मागणी नोटीसमधून करण्यात आली आहे. दहा दिवसांत कार्यवाही न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा बोरेले यांनी दिला आहे. आता जिल्हा प्रशासन या गंभीर आरोपांची निष्पक्ष दखल घेते की प्रकरण पत्रव्यवहारातच अडकवून ठेवते, याकडे लक्ष लागले आहे.

'नमो उद्यान'चे आमदार राजू तोडसाम यांच्या हस्ते लोकार्पण..!

नागरिकांसाठी विरंगुळ्याचे नवे ठिकाण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



घाटंजी, दि. २२ : घाटंजी शहरातील वसंत नगर परिसरात नगर परिषदेकडून विकसित करण्यात आलेल्या 'नमो उद्यानाचे' लोकार्पण आमदार राजू तोडसाम यांच्या हस्ते करण्यात आले. शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या उद्याना मुळे आणि नागरिकांना मोकळ्या वातावरणात वेळ घालवण्यासाठी हे उद्यान उपयुक्त ठरणार आहे. शहराचा विकास केवळ उद्घाटन आणि लोकार्पणापुरता मर्यादित न राहता अशा सार्वजनिक सुविधांची गुणवत्ता व देखभाल ही महत्त्वाची आहे. यावेळी नगराध्यक्ष परेश कारिया, उपनगराध्यक्ष सोनल ठाकरे, मुख्याधिकारी राजू घोडके, भाजप तालुकाध्यक्ष विजय बैस यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. आता उद्यानाचे लोकार्पण झाले मात्र त्याचा दर्जा आणि सौंदर्य कायम राखण्याची कसोटी नगर परिषदेला पार पाडावी लागणार आहे.

जिओची ५G सेवा नावापुरतीच! आर्णीत इंटरनेटचा खेळखंडोबा ग्राहक त्रस्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

आर्णी, दि. २२ : जिओ कंपनीकडून ५G सेवेचा मोठा गाजावाजा केला जात असताना आर्णी शहरात मात्र या सेवेचा अनुभव ग्राहकांसाठी निराशाजनक ठरत आहे. ५G तर दूरच, साधे ४G इंटरनेटही व्यवस्थित चालत नसल्याने हजारो ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

गेल्या तीन ते चार महिन्यांपासून नेटवर्क वारंवार खंडित होत असून, इंटरनेट सुरू असले तरी मोबाईल आणि लॅपटॉपवर केवळ गोल फिरणारे चिन्ह दिसत असल्याची ग्राहकांची तक्रार आहे. या नेटवर्क समस्येचा सर्वाधिक फटका ऑनलाइन व्यवहार करणारे व्यापारी, व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरदार आणि बँकिंग सेवांचा वापर करणाऱ्या नागरिकांना बसत आहे. व्हॉट्सअॅप कॉल, फोन कॉल, फेसबुकसह विविध इंटरनेट आधारित सेवा विस्कळीत होत असल्याने महत्त्वाची कामे खोळंबत आहेत. विशेषतः आर्णी पोलीस स्टेशन परिसरातील अनेक ग्राहकांना नेटवर्कच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे सांगण्यात येत आहे. नियमित रिचार्ज करूनही अपेक्षित सेवा मिळत नसल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. परिणामी अनेक ग्राहकांनी दुसऱ्या कंपनीकडे सिम पोर्ट करण्यास सुरुवात केली असून, आणखी काही ग्राहक त्याच तयारीत आहेत. रिचार्जचे पैसे पूर्ण, सेवा मात्र अपूर्ण! असा संतप्त सवाल ग्राहक उपस्थित करीत आहेत. कंपनीने नेटवर्कमधील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून अखंडित सेवा द्यावी. तसेच सेवा खंडित राहिलेल्या कालावधीचा विचार करून ग्राहकांना योग्य नुकसानभरपाई अथवा अतिरिक्त रिचार्ज मुदत द्यावी, अशी मागणी होत आहे. प्रशासनानेही या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित कंपनीकडे जाब विचारावा, अशी अपेक्षा आर्णीकर व्यक्त करीत आहेत.

पहिली उचल ४२०० रुपये द्या, अन्यथा महामार्ग रोखणार!

ऊस उत्पादकांचा आक्रमक पवित्रा,२७ नोव्हेंबरपासून नागपूर-तुळजापूर महामार्गावर बेमुदत रास्ता रोको

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. २२ : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन पहिली उचल ४२०० रुपये मिळावी, या मागणीसाठी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे.

येत्या २७ नोव्हेंबर रोजी नागपूर-तुळजापूर महामार्गावर हदगाव-उमरखेडदरम्यान बेमुदत रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या नियोजनासाठी अंबोडा येथे आयोजित सभेला चार तालुक्यांतील शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. अत्यल्प पावसामुळे उसाच्या उत्पादनात घट झाली असताना साखर व उपपदार्थांचे दर वाढूनही शेतकऱ्यांना योग्य मोबदला का नाही, असा सवाल सभेत उपस्थित करण्यात आला. ऊस वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी कारखान्यांचे गेट बंद करण्याऐवजी महामार्ग रोखण्याचा निर्णय घेण्यात आला. मागणी मान्य होईपर्यंत माघार नाही, असा निर्धार व्यक्त करत सर्वपक्षीय नेत्यांनी पक्षभेद विसरून शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन समितीने केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

तिवसा तालुक्यात रब्बी हंगामातील पहिले संकट

दाट धुक्याचा खरीप आणि रब्बी पिकांची नासाडी

कुऱ्हा/ वार्ताहर

तिवसा तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून थोडीफार धुवारी अर्थातच दाट धुक्याचे प्रमाण दिसत होते. पण आज अचानक दाट धुके वाढल्याने शेती पिकांवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कुऱ्हा परिसराच्या शेत शिवारात सकाळच्या वेळी मोठ्या प्रमाणात दाट धुके पसरले होते, त्यामुळे शेतकरी ते धुके पाहून चिंताग्रस्त झालेला आहे. तसेच सूर्यप्रकाश उशिरा निघाल्याने शेतकरी वर्ग चिंतेत पडला आहे. बदलत्या हवामानाचा फटका तालुक्यातील विविध पिकांना बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ढगाळ वातावरण मुके बुरशी आणि किडीची समस्या जास्त प्रमाणात निर्माण होण्याची दाट शक्यता



आहे. तसेच तूर पिकांवर मारुका अळी, दाणे खाणारी अळी, शेंगमाशी दिसत आहे. वांगी पिकातील दिवसेंदिवस फळ पोखरणारी अळी समस्या वाढतच आहे.

महागडे कीटकनाशक फवारणी करून सुद्धा अळी नियंत्रण होत नाही आहे. तसेच काकडी पिकातील बुरशी समस्या कायमच दिसून येत आहे.

तालुक्यात सध्या कापूस, तूर, कांदा, गहू, हरभरा, चना, तसेच विविध प्रकारच्या भाजीपाला पिकांची लागवड क्षेत्र आहे. मात्र सततचे धुके, वातावरणातील वाढलेली आर्द्रता आणि सूर्यप्रकाशाचा अभाव यामुळे पिकांमध्ये बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्यास पोषक परिस्थिती निर्माण होऊन अळी समस्या वाढ झालेली आहे. टोमॅटो, मिरची, वांगी, कोबी, फ्लॉवर, काकडी, वाल, तसेच इतर भाजीपाला पिकांवर दाट धुक्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

पानांवर डाग पडणे, करपा, फळकुज आणि बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यास उत्पादन व गुणवत्तेत घट होऊ शकते. असेच ढगाळ वातावरण कायमचे असल्यास फळात अळी समस्या नक्की वाढू शकते.

आधीच उत्पादन खर्चात वाढ, मजुरीचे वाढते दर आणि शेतीमालाच्या बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकरी अडचणीत आहेत.

त्यातच दाट धुके आणि बदलत्या हवामानामुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

थंडीचा जोर वाढला; रब्बी पिकांना संजीवनी!

अंजनगाव बारी/ वार्ताहर

अमरावती तालुक्यात गुलाबी थंडीचा जोर हळूहळू वाढू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानात चढ-उतार होत असून पहाटेच्या वेळी गारठा, तर दुपारच्या सुमारास उन्हाचा चटका जाणवत आहे. दरम्यान, परिसरात ढगाळ वातावरण कायम असले तरी कालच्या तुलनेत ढगांची दाटी काहीशी कमी झाली असून सूर्यप्रकाश वाढल्याने उन्हाची तीव्रता जाणवू लागली आहे.

नोव्हेंबर महिन्याच्या उत्तरार्धात वातावरणात होत असलेल्या या बदलामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांचे हवामानाकडे लक्ष लागले आहे.

सध्या जाणवणारी थंडी गहू, हरभरा, ज्वारी यांसारख्या रब्बी पिकांच्या वाढीसाठी अनुकूल ठरू शकते. विशेषतः गव्हाच्या पिकासाठी थंड हवामान महत्त्वाचे मानले जाते. जमिनीतील ओलावा आणि आवश्यक पाणी व्यवस्थापन योग्य राहिल्यास पिकांची वाढ चांगली होण्यास मदत मिळू शकते. त्यामुळे रब्बी हंगामातील



पिकांच्या उत्पादनाबाबत शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.एकीकडे रब्बी पिकांसाठी थंडी पोषक ठरत असताना अंजनगाव बारी परिसरात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण अनुभवायला मिळत आहे. मात्र कालच्या तुलनेत आज ढगाळपणा काहीसा कमी झाला असून उन्हाची तीव्रता वाढताना दिसत आहे. वातावरणातील या बदलामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष हवामानाकडे लागले आहे.तूर पिकावर सध्या फुलोरा व शेंगा लागण्याची अवस्था असलेल्या शेतकऱ्यांनी पिकांचे नियमित निरीक्षण करणे आवश्यक आहे.

ढगाळ वातावरण आणि हवेतील आर्द्रतेतील बदल यामुळे काही रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे.

भारतीय हवामान विभागाच्या २० नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या अमरावती जिल्हा कृषी हवामान सल्ला पत्रकानुसार २० ते २४ नोव्हेंबरदरम्यान पावसाची शक्यता कमी असून हवामान प्रामुख्याने स्वच्छ राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या कालावधीत कमाल तापमान ३० ते ३२ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १३ ते १६ अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता आहे.

मात्र प्रत्यक्ष स्थानिक परिस्थितीत ढगाळ वातावरण आणि सूर्यप्रकाश यामध्ये बदल जाणवत आहेत. कालच्या तुलनेत ढगांची दाटी कमी होऊन उन्हाचा चटका वाढत असल्याने आगामी दिवसांत हवामान कोणते वळण घेते, याकडे नागरिकांसह शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

संक्षिप्त

शीला मसराम (तायडे) यांना पीएचडी

अमरावती- शीला जानरावजी मसराम (तायडे)सहा. शिक्षिका जि.प. प्राथ. कन्या शाळा पूर्णानगर यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.त्यांनी 'कुमारवयीन विद्यार्थ्यांकरिता पॉक्सो कायद्याची जाणीव जागृती उपक्रम विकसित करून त्याची परिणामकारकता तपासणे- एक प्रायोगिक अभ्यास. या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. या संशोधनासाठी त्यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर शिक्षण विभागातील मार्गदर्शक डॉ. नीलिमा देवरावजी अंबाडकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.अल्पवयीन मुलांवर होणाऱ्या अनैतिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कसे करावे? बालकांसाठी या कायद्यात काय तरतुदी आहेत? अनैतिक अत्याचार म्हणजे काय? ऑनलाईन अनैतिक अत्याचार म्हणजे काय? या सर्व बाबींची माहिती मुलांना त्यांना समजेल अशा भाषेत, त्यांच्या भावविश्वाचा विचार करून करण्यात आला आहे.या यशामागे त्यांचे पती सतिश ज्ञानेश्वरराव तायडे मुलगा आदर्श व तनय यांनी संपूर्ण संशोधन प्रवासात त्यांना मोलाची साथ दिली.त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत असून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.



प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत कार्यारंभ आदेश वाटप

खल्लार- नगर परिषद दर्यापूरच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश वाटप करण्याचा कार्यक्रम नगर परिषदेच्या सभागृहात उत्साहात पार पडला.कार्यक्रमास नगर परिषदेच्या अध्यक्षा



मंदाकिनी भारसाकळे, उपाध्यक्ष अहमद खा सादत खा आणि मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सर्व सभापती, गटनेते आणि नगरसेवक,नगरसेविका यावेळी उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले. या आदेशांमुळे लाभार्थ्यांना आता प्रत्यक्ष घरकुल बांधकामास सुरुवात करता येणार असून, स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.

विदर्भक्रिकेट संघटनेद्वारे निवड चाचणी

अमरावती- विदर्भ क्रिकेट संघटना नागपूर द्वारा आयोजित विदर्भातील सर्व जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण विभागातील शाळेमधील प्रतिभावंत खेळाडूंचा शोध घेण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये विदर्भ क्रिकेट संघटना तर्फे निवड चाचणी घेण्यात येणार आहे. या निवड चाचणीसाठी फक्त शाळेमधील १५ वर्षाखालील खेळाडूंसाठी व १२ वर्षांवरील मुलींसाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात येणार आहे . या निवड चाचणीसाठी नागपूर येथून विदर्भ क्रिकेट संघटनेचे निवड समितीचे सदस्य येणार आहेत. या निवड चाचणी करता कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क किंवा फी आकारण्यात येणार नाही याची नोंद जिल्ह्यातील सर्व खेळाडू व शाळांनी घ्यावी.जिल्ह्यातील शाळेच्या प्राचार्य /मुख्याध्यापक यांना सविनय कळविण्यात येत आहे की आपल्या शाळेतील इच्छुक क्रिकेट खेळाडूंची यादी शाळेच्या लेटर पॅडवर शाळेच्या क्रीडा शिक्षकाचे नाव व त्यांचा मोबाईल क्रमांक सह खेळाडूचे नाव, जन्म तारखेसह बोनाफाईड प्रमाणपत्र सोबत जोडून श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रिकेट मैदानावर अल्लाद लोखंडे व योगेश नवाथे यांचे कडे २७नोव्हेबर २०२६ पर्यंत जमा करावी. यानंतर कोणाचेही आवेदन स्वीकारण्यात येणार नाही.निवड चाचणीसाठी सर्व शाळांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन विदर्भ क्रिकेट संघटना नागपूर जिल्हा समितीचे अध्यक्ष नितेश उपाध्याय,अमरावती जिल्हा क्रिकेट संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, विदर्भ क्रिकेट संघटनेचे जिल्हा संयोजक डॉ. दीनानाथ नवाथे यांनी केले आहे.

कौंडण्यपुरात बुधवारी वारकरी सेवेचा भक्तिमय सोहळा

विठ्ठलभक्तीचा होणार जागर!, सुधीर दिवे व परिवाराचा उपक्रम

अमरावती/ का.प्र.

विदर्भाची पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपुरात बुधवार, २५ नोव्हेंबर रोजी कार्तिकी भक्तीचा भव्य सोहळा रंगणार आहे. पारंपरिक यात्रेनिमित्त हजारो वारकरी, दिंड्या, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि विठ्ठलनामाच्या जयघोषाने कौंडण्यपुर नगरी भक्तिमय होणार आहे. स्व. वामनराव दिवे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुधीर दिवे व परिवाराच्या वतीने वारकरी सेवा, स्वागत, सन्मान आणि महाप्रसादाचा उपक्रम राबविण्यात येत असून, यंदा या सेवाकार्याचे १८ वे वर्ष आहे.


कौंडण्यपुरच्या या यात्रेला धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेचा मोठा वारसा लाभला आहे. येथील श्री संत सदाराम महाराज दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे जाऊन विठुरायाचे दर्शन घेत असत. मात्र वृद्धापकाळामुळे त्यांना पंढरपूरची वारी करणे अशक्य झाल्यानंतर प्रत्यक्ष विठ्ठलानेच आपण कौंडण्यपुरात कार्तिक पौर्णिमा व प्रतिपदेला येत



असल्याचे सांगितल्याची आख्यायिका आहे. त्यामुळे या पवित्र पर्वावर प्रत्यक्ष विठ्ठलाचे वास्तव्य कौंडण्यपुरात असते, अशी श्रद्धा आहे.

२५ रोजी पहाटे ५ ते सकाळी ७ वाजेपर्यंत मुक्कामी असलेल्या वारकरी व भाविकांसाठी चहा व नाश्ता वितरण, सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत दिंड्यांमधील वारकऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान.

सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत भव्य महाप्रसादाचे आयोजन. बाहेरगावाहून येणाऱ्या भाविक व वारकऱ्यांच्या सोयीसाठी मंगळवार २४ नोव्हेंबर रोजी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे.भक्तिमय सोहळ्याला



श्री संत आचार्य जितेंद्रनाथ महाराज (देवनाथ मठ, अंजनगाव सुर्जी), श्री संत सचिन देव महाराज तसेच श्री संत सयाजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.यावर्षी रुक्मिणी माते करिता १०० मीटरची साडी सुरत येथील भक्तांकडून अर्पण केली जाणार आहे, हे यावर्षीचे विशेष उल्लेखनीय राहणार आहे. या पवित्र भक्तिसोहळ्यात भाविकांनी, वारकरी बांधवांनी आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुधीर दिवे (मार्गदर्शक, स्व. वामनराव दिवे चॅरिटेबल ट्रस्ट) यांनी केले आहे.

एक लाख दिव्यांच्या तेजोमय प्रकाशात न्हाऊन निघाली कौडण्यपूर नगरी!

अंबा रुख्मिणी महोत्सवाचा शुभारंभ

अमरावती/ का.प्र.

श्री क्षेत्र कौडण्यपूर येथे 'महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा' या संकल्प नेतून आयोजित अंबा रुख्मिणी महोत्सव २०२६ चा शुभारंभ शनिवारी अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात झाला. महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी आयोजित करण्यात आलेल्या एक लाख दिव्यांच्या भव्य दीपोत्सवाने श्री क्षेत्र कौडण्यपूर नगरी अक्षरशः प्रकाशमय झाली.

हजारो दिव्यांच्या तेजस्वी प्रकाशाने मंदिर परिसर, घाट परिसर आणि संपूर्ण नगरी उजळून निघाली होती. या नेत्रदीपक सोहळ्याने उपस्थित भाविक आणि नागरिकांना एक अविस्मरणीय अनुभव दिला.

दुपारी ३ ते ६ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या दीपोत्सवासाठी आकर्षक पद्धतीने दिव्यांची मांडणी करण्यात आली होती. एकामागून एक प्रज्वलित होणाऱ्या दिव्यांमुळे संपूर्ण परिसरात तेजस्वी प्रकाशाची आरास निर्माण झाली होती. दिव्यांचा लखलखाट, फुलांची सजावट, धार्मिक वातावरण



आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कौडण्यपूर नगरीचे रूपच पालटले होते. जणू हजारो दीपज्योतींच्या प्रकाशात संपूर्ण नगरी भक्तीच्या सागरात न्हाऊन निघाली होती. या मनमोहक दृश्याने उपस्थितांच्या डोळ्यांचे अक्षरशः पारणे फेडले.

दीपोत्सवाच्या निमित्ताने महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

श्री अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष रविराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय पुंडेकर व समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि स्वयंसेवकांनी या भव्य आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

पहिल्याच दिवशी दीपोत्सवाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता यंदाचा महोत्सव कौडण्यपूरच्या सांस्कृतिक आणि धार्मिक वैभवात नवी भर घालणारा ठरत आहे.

विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत सीताबाई संगई हायस्कूलचा डंका

मिहीर टांक - देवांश येवले ठरले तालुक्याचे विज्ञान चॅम्पियन



अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर

शिक्षण विभाग, पंचायत समिती अंजनगाव सुर्जी, अंजनगाव तालुका मुख्याध्यापक संघ, अंजनगाव तालुका विज्ञान अध्यापक मंडळ तथा कृष्णाबाई सारडा सेमी इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनां तर्गत घेण्यात आलेल्या विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत सीताबाई संगई हायस्कूल व कनिष्ठ महाविद्या लय, अंजनगाव सुर्जी येथील इयत्ता दहावीचे विद्यार्थी मिहीर टाक व देवांश येवले यांनी प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यां मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, विज्ञानविषयक जिज्ञासा आणि सामान्य वैज्ञानिक ज्ञानाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत मिहीर टाक व देवांश येवले यांनी आपल्या अचूक उत्तरांनी, जलद विचारशक्तीने आणि विज्ञानविषयक सखोल ज्ञानाच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळविला. स्पर्धेच्या प्रत्येक फेरीत त्यांनी दाखविलेली आत्मविश्वासपूर्ण कामगिरी परीक्षकांसह उपस्थितांची विशेष प्रशंसा ठरली.

या यशासाठी विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक पराग चवरे व अजिंक्य गिते यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने सराव, प्रश्नांची तयारी आणि वैज्ञानिक संकल्पनांचे सखोल आकलन यासाठी प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई व विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव प्रसन्न संगई व अजय संगई, कार्यकारिणी सदस्य अविनाश संगई, ज्येष्ठ सदस्य मुकुंद संगई व अशोक संगई तसेच सदस्य आशिष संगई, विनय संगई व अनुप संगई यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.शाळेचे प्राचार्य राकेश डोणगावकर, उपमुख्या ध्यापक राजेश वैद्य व पर्यवेक्षक डॉ. निलेश डाहाळे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

कुऱ्हा-अंजनवती रस्त्याच्या दुतर्फा काटेरी झाडांचे अतिक्रमण

कुऱ्हा/ वार्ताहर

कुऱ्हा ते अंजनवती मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूंना काटेरी झाडांची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून, या झाडांच्या फांद्या थेट रस्त्यावर आल्याने वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या कडेला वाढलेल्या या काटेरी झुडपांमुळे रस्त्याची रुंदी कमी झाल्याप्रमाणे परिस्थिती निर्माण झाली असून, वाहनचालकांना ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे.

विशेषतः दुचाकीस्वारांना या काटेरी फांद्यांचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. समोरून मोठे वाहन आल्यास बाजू देताना रस्त्याच्या कडेला असलेल्या काटेरी झाडांच्या फांद्या अंगाला लागण्याची तसेच वाहनांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. रात्रीच्या वेळी या मार्गावरून प्रवास करताना काटेरी फांद्यांचा अंदाज येत नसल्याने अपघाताचा धोका आणखी वाढला आहे. त्यामुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून या मार्गावरून प्रवास करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार, दुचाकीस्वार तसेच इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. अशा परिस्थितीत रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेली काटेरी झाडे ही केवळ गैरसोय नसून वाहनधारकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न बनली आहे. मात्र, अद्याप संबंधित विभागाकडून या



झाडांची छाटणी करण्याबाबत ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नाही.संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा जबाबदार यंत्रणेने या समस्येकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

पुढील वर्षी उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर या राज्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकांसाठी राजकीय हालचालींना वेग आला असून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी आपापली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. यापैकी चार राज्यांत भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे, तर पंजाबमध्ये आम आदमी पक्षाचे सरकार आहे. त्यामुळे भाजपसाठी चार राज्यांतील सत्ता टिकविण्याचे, आम आदमी पक्षासाठी पंजाबमधील आपले वर्चस्व कायम राखण्याचे आणि काँग्रेससह विरोधी पक्षांसाठी गमावलेली राजकीय जमीन पुन्हा मिळविण्याचे आव्हान आहे.


नव्या निवडणुकांचे पडघम

चालू वर्ष सरण्यास काही आठवडेच शिल्लक असताना आगामी २०२७ मध्ये होणाऱ्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे पडघम आतापासूनच वाजू लागले आहेत. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर या पाच राज्यांमध्ये होणाऱ्या या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशभरातील राजकीय वातावरण तापू लागले असून, सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपापले राजकीय डावपेच आखण्यास सुरुवात केली आहे.

या पाच राज्यांपैकी मणिपूर विधानसभेचा कार्यकाळ सर्वात आधी म्हणजेच १३ मार्च २०२७ रोजी संपत आहे. गोव्याच्या विधानसभेचा कार्यकाळ १४ मार्च २०२७ रोजी, पंजाबचा १६ मार्च रोजी, उत्तराखंडचा २८ मार्च रोजी आणि उत्तर प्रदेशचा कार्यकाळ २२ मे रोजी संपणार आहे. २०२२ मध्ये या पाचही राज्यांत एकाच वेळी निवडणुका झाल्या होत्या; परंतु उत्तर प्रदेश विधानसभेचे पहिले अधिवेशन २२ मे २०२२ रोजी झाले होते. पुढील वर्षी या राज्यांत एकाच वेळी निवडणुका होणार असल्याने निवडणूक आयोग नेहमीच्या पद्धतीनुसार सर्वात आधी कार्यकाळ संपणाऱ्या विधानसभेच्या तारखेपूर्वी सर्व निवडणुका पूर्ण करण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाच्या घटनात्मक अधिकारानुसार, विधानसभेचा कार्यकाळ संपण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत कधीही निवडणूक घेता येते. उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राज्यात बहुटप्प्यांत मतदान होण्याची दाट शक्यता आहे. मात्र, बिहार आणि पश्चिम बंगालमधील निवडणुकांचा अनुभव पाहता यावेळी टप्प्यांची संख्या कमी असू शकते. निवडणूक आयोगाने बिहारप्रमाणे केवळ दोन टप्प्यांत निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला, तर मतदान फेब्रुवारी महिन्यात किंवा मार्चच्या सुरुवातीला सुरू होऊ शकते.

या पाच राज्यांपैकी सर्वाधिक लक्ष देशातील सर्वात मोठे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशकडे लागले आहे, जिथे विधानसभेच्या ४०३ जागा आहेत. त्याखालोखाल पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या पंजाबचा क्रमांक लागतो, जिथे विधानसभेच्या ११७ जागांसाठी मतदान होणार आहे. उत्तराखंड, गोवा आणि मणिपूर ही राज्ये आकाराने लहान असली, तरी सामरिक आणि भौगोलिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जातात. विशेषतः उत्तराखंडच्या सीमा नेपाळ आणि चीनला भिडलेल्या आहेत, तर मणिपूरमध्ये गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ दोन वांशिक गटांमध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर तिथे शांततापूर्ण वातावरणात निवडणुका पार पाडणे हे निवडणूक आयोगासमोर मोठे आव्हान ठरणार आहे.

सध्याच्या राजकीय समीकरणांचा विचार केल्यास या पाच राज्यांपैकी उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मणिपूर आणि गोवा या चार राज्यांमध्ये केंद्रात सत्तेत असलेल्या भारतीय जनता पक्षाची सरकारे आहेत, तर केवळ पंजाबमध्ये आम आदमी पक्षाचे पूर्ण बहुमताचे सरकार सत्तेत आहे. या पाचही राज्यांपैकी एकाही राज्यात देशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसची सत्ता नाही, तरीही आगामी निवडणुकांमध्ये खरा मुकाबला हा भाजप आणि काँग्रेसप्रणीत 'इंडिया' आघाडीमध्येच पाहायला मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. भाजपविरोधात जनमत तयार करण्यासाठी काँग्रेसचे नेते राहुल गांधी सातत्याने प्रयत्न करीत आहेत; मात्र राष्ट्रीय पातळीवर उपस्थित केले जाणारे मुद्दे आणि राज्याराज्यांतील राजकीय वास्तव यांची सांगड घालण्यात काँग्रेसला कितपत यश मिळेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



उत्तर प्रदेशच्या राजकारणात योगी आदित्यनाथ यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. उत्तर प्रदेशात मायावती, मुलायमसिंह यादव आणि अखिलेश यादव यांच्या नेतृत्वाखालील सरकारांच्या काळात सातत्याने सत्तांतर होत होते; मात्र योगी आदित्यनाथ यांनी सलग दोन विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपला सत्ता मिळवून दिली. उत्तर प्रदेशासारख्या जातीय आणि सामाजिक समीकरणांचे प्राबल्य असलेल्या राज्यात ही कामगिरी दुर्लक्षिण्यासारखी नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याखेरीज भाजपच्या ज्या नेत्यांना देशव्यापी लोकप्रियता प्राप्त झाली आहे, त्यामध्ये योगी आदित्यनाथ यांचे स्थान महत्त्वाचे आहे. दहा वर्षांच्या सत्तेनंतर अँटिइन्कम्बसी निर्माण होऊ शकते; पण योगींचा कामाचा धडाका, भाजपचा तळागाळात तयार झालेला व्यापक जनाधार पाहता अखिलेश आणि राहुल यांची मोटबांधणी फारशी प्रभावी ठरण्याची शक्यता दिसत नाही.

पंजाबमध्ये काँग्रेसपुढील आव्हान वेगळ्या स्वरूपाचे आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या हातून पंजाबची सत्ता जाण्यास पक्षांतर्गत संघर्षही मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरला. कॅप्टन अमरिंदरसिंह यांना मुख्यमंत्रिपदा वरून दूर करण्यात आले. नवज्योतसिंह सिद्धू यांना प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली. चरणजितसिंह चन्नी यांच्या माध्यमातून दलित नेतृत्वाला संधी देण्याचा प्रयत्न झाला; मात्र या सर्व घडामोडींमुळे पक्षातील गटबाजी अधिकच वाढली. अमरिंदरसिंह भाजपमध्ये दाखल झाले. सिद्धू, चन्नी, अमरिंदरसिंह राजा वडिंग, परगटसिंह अशा विविध नेत्यांभोवती काँग्रेसचे राजकारण विभागले गेले. नेतृत्वातील या विसंवादाचा सर्वाधिक फायदा आम आदमी पक्षाला झाला. भगवंत मान यांच्या सरकारच्या कारभाराबद्दल जनतेत नाराजी असेल, तर त्याचा राजकीय लाभ उठवण्याची संधी काँग्रेसला आहे. मात्र, आम आदमी पक्षाच्या किती जागा कमी होतील, यापेक्षा काँग्रेसच्या किती जागा वाढतील, याचा विचार पक्षाने करायला हवा. पंजाबमध्ये भाजपही आपले राजकीय स्थान विस्तारण्याचा प्रयत्न करीत आहे. अकाली दल आणि भाजप पुन्हा एकत्र आले, तर पंजाबमधील निवडणुकीची समीकरणे बदलू शकतात. उत्तराखंडच्या निर्मितीनंतर भाजप आणि काँग्रेस यांच्यात आलटून पालटून सत्तांतर होत होते. २०२२ मध्ये भाजपने ही परंपरा मोडीत काढली. पुष्करसिंह धामी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने राज्यातील सत्ता कायम राखली. या सरकारच्या कारभाराबद्दल उपस्थित होणारे प्रश्न, प्रशासनाविषयीच्या तक्रारी आणि भ्रष्टाचाराचे आरोप हे काँग्रेससाठी प्रचाराचे मुद्दे ठरू शकतात. तथापि, राज्यात काँग्रेसचा सेनापती कोण असेल आणि कोणत्या कार्यक्रमाच्या आधारे पक्ष जनतेसमोर जाणार आहे, याची स्पष्टता आवश्यक आहे. मणिपूरच्या प्रश्नावर राहुल गांधी यांनी राष्ट्रीय पातळीवर आक्रमक भूमिका घेतली होती. तेथील हिंसाचारावरून केंद्र सरकारच्या धोरणांवर काँग्रेसने टीकेची झोड उठवली; परंतु तेथील प्रश्नांची गुंतागुंत लक्षात घेता केवळ भाजपविरोधी प्रचार पुरेसा ठरणार नाही. विविध समाजघटकांमध्ये विश्वास निर्माण करणे, शांतता प्रस्थापित करण्यासाठी व्यवहार्य कार्यक्रम मांडणे आणि स्थानिक नेतृत्वाला निर्णय प्रक्रियेत महत्त्व देणे आवश्यक आहे. मणिपूरमध्ये जनतेला राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा सुरक्षिततेची आणि स्थैर्याची अधिक गरज आहे.

गोव्यात काँग्रेसची अडचण भाजपबरोबरच अन्य विरोधी पक्षांमुळेही वाढली आहे. तृणमूल काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने गोव्याच्या राजकारणात प्रवेश केल्याने बिगरभाजप मतांचे विभाजन झाले. राष्ट्रीय पातळीवर भाजपला पराभूत करण्यासाठी एकत्र येण्याची भाषा करणारे पक्ष राज्यांच्या निवडणुकांमध्ये एकमेकांच्या मतदारवर्गात शिरकाव करीत आहेत. विरोधकांच्या या परस्परविरोधी राजकारणाचा भाजपला फायदा होतो. राष्ट्रीय आघाडीतील घटकपक्षांमध्ये राज्यांच्या पातळीवर कोणत्या स्वरूपाचे संबंध असावेत, याचे धोरण काँग्रेसला आखावे लागेल.

या निवडणुकांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, प्रत्येक राज्यातील स्थानिक मुद्दे आणि राजकीय परिस्थिती पूर्णपणे वेगळी असून, एका राज्याचे समीकरण दुसऱ्या राज्याशी जुळताना दिसत नाही. तथापि, राष्ट्रीय पातळीवरील मुद्दे स्थानिक पातळीवर प्रभाव टाकू शकतात. त्यादृष्टीने विचार करता केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजना, लोकाभिमुख निर्णयांचे प्रतिबिंब व पडसाद या निवडणुकांमध्ये उमटताना दिसतील. या निवडणुकांमध्ये भाजपची ताकद अबाधित राहिल्यास विरोधी गटामध्ये कमालीची अस्वस्थता आणि असुरक्षितता पसरण्याची शक्यता आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वावरही त्यामुळे प्रश्नचिन्ह उभे राहील. त्यामुळेच विरोधी पक्षांनी जोरदार तयारी सुरू केल्याचे दिसते.

पोपट नाईकनवरे

गुंजन बोलण्यात काय चुकली?

गुंजन पाटील दिसायला सुंदर आहे सुंदर बोलते सुंदर कविता करते आणि एक स्त्री आहे. तिने छान छान तिच्यासारख्या नाजूक सुंदर कविता कराव्या, खुसखुशीत चिमटे काढावे. छान पैकी शुगर कोटिंग प्रबोधन करावं म्हणजे मग गुंजन पाटील सगळ्यांच्या मोबाईल मधली वॉलपेपर आणि सोशल मीडिया फीड मधली सेलिब्रिटी होऊ शकते.

पण मग गुंजन पाटील कविता सोडून काहीतरी वेगळंच बोलायला लागते. काय तर म्हणे अगदी तिच्याच शब्दात;

'पुरुषांना बायका लेकरं पैदा करण्याची मशीन वाटतात.

मी सायन्सची विद्यार्थिनी आहे तर मी साधं उदाहरण सांगते जर तुमची (म्हणजे पुरुषांची) नसबंदी केली तर जास्तीत जास्त एक आठवडाभर तुम्हाला डोकेदुखीचा त्रास होईल. पण स्त्रियांची गर्भ पिशवी काढली तर रिकवरी ला दोन महिने लागतात आयुष्यभरासाठी हार्मोन डिस्टर्ब होतात. बाईचं आयुष्य पूर्णपणे बदलून जातं'

गुंजनचं बोलणं सामाजिक आणि मेडिकलच्या भाषेमध्ये चुकीचं कुणीही ठरवू शकणार नाही. स्त्री पेक्षा पुरुषाने जर नसबंदी केली तर त्याचे फायदे काय आहेत हे सांगणारे अनेक डॉक्टर त्यांचे व्हिडिओ त्यांच्या पोस्ट बघायला भेटतील पण आत्तापर्यंत तिच्या खुसखुशीत कविता मुळे आवडती असणारी गुंजन अशा पद्धतीने डोळ्यावर आली की पार तिच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगायला एक सर्व जाती-धर्माची एकच पुरुष जात तिच्या



कमेंट सेक्शन मध्ये उतरली आहे.

एखादा पुरुष कीर्तनकार बाईला गाऊन घातलेलं जनावर म्हणतो, तिच्या मेकअप वरून, दागिन्यांवरून, साडी घालण्यावरून टीका करतो तिला कुरूप म्हणतो आणि पुढे बसलेला स्वतःला सात्विक विठ्ठलाचा भक्त समजणारा समाज खो खो हसत महाराजाला दाद देतो. पण गुंजन सारखी एखादी बाई जेव्हा सरळ स्पष्ट भाषेमध्ये 'बाईला नऊ दिवस फक्त देवी बनवून देव्हाऱ्यामध्ये बसवू नका ३६५ दिवस तिला तिच्या बाई पणाला दर्जा द्या' ही गोष्ट समाजाच्या पचनी पडणारी नाही.

This is the perfect example how misogyny is deeply rooted in our society ! पत्नीला त्रास नको म्हणून मी माझी सर्जरी करून घेतो म्हणून नसबंदी करून घेणार आहे एखादा पुरोगामी विचारांचा शरद पवारांसारखा नेता असतो पण मुलगा पाहिजे म्हणून तीन-तीन वेळा बाईला चान्स घ्यायला लावणारे अनेक नवरे आणि सासरची मंडळी या समाजामध्येच करतात. पण त्याच्याविषयी बोलायचं नाही.

मग नक्की कशा पद्धतीचा समाज प्रबोधन केलं पाहिजे? तर डांगी वर ठसठसणारं गळू दाखवू नका फकस्त चेहऱ्यावर चोपडलेली क्रीम आणि सेट वेट झटाक केलेल्या कोंबडा हेअर स्टाईल वर फक्त बोला अशा पद्धतीचं खंगरी आणि डंगरी समाज प्रबोधन करा अशी आपल्या समाजाची मागणी आहे!!

अंजली झरकर

मातृत्वाचा बाजार

राज्यात दिवसेंदिवस वाढणाऱ्या 'सिझेरियन' प्रसुतीच्या प्रमाणावर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाच्या 'कुटुंब कल्याण कार्यालया' ने नुकताच एक महत्त्वपूर्ण आदेश काढला आहे. वैद्यकीय आवश्यकता नसताना केल्या जाणाऱ्या अनावश्यक शस्त्रक्रिया रोखण्यासाठी शासकीय रुग्णालयांमध्ये होणाऱ्या प्रत्येक 'सिझेरियन' शस्त्रक्रियेची त्या दिवशी पडताळणी करणे या आदेशानुसार बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच संबंधित डॉक्टरांना या शस्त्रक्रियेचे ठोस वैद्यकीय कारण लेखी स्वरूपात द्यावे लागणार आहे.



'जागतिक आरोग्य संघटनेच्या' निकषानुसार एकूण प्रसुतीपैकी केवळ दहा ते पंधरा टक्के प्रकरणांमध्येच वैद्यकीयदृष्ट्या 'सिझेरियन' शस्त्रक्रियेची आवश्यकता असते, मात्र भारतातील आणि विशेषता महाराष्ट्रातील परिस्थिती या मानकांपेक्षा कितीतरी पटीने भयावह आहे. 'राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५' नुसार देशभरातील सरकारी रुग्णालयांमध्ये सिझेरियन यांचे प्रमाण १४.३% असताना खाजगी रुग्णालयांमध्ये तर ते ४७.४ टक्क्यावर पोचल्याचे आढळते. सध्या वैद्यकीय सेवा ही नफेखोरी आणि लुटमारीसाठीचा व्यवसाय झाला आहे. अनेक खाजगी रुग्णालयात डॉक्टर नैसर्गिक प्रसुतीची वाट न बघता स्वतःच्या वेळेची सोय पाहून झटपट कमाई साठी थेट शस्त्रक्रियेचाच घाट घालतात. 'सिजेरियन ' शस्त्रक्रिया केवळ आर्थिक लुटमारी पूर्ती मर्यादित नाही, तर तिचे आईसह नवजात बालकाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर अत्यंत गंभीर आणि दीर्घकालीन दुष्परिणाम होतात. नफेखोरीसाठी आरोग्याची हेळसांड करणाऱ्या सरकारी आणि खाजगी रुग्णालयांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. 'बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन' आणि 'क्लीनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट ' या कायद्याची प्रभावी कार्यवाही करून खाजगी रुग्णालयासाठी तसेच प्रत्येक 'सिझेरियन ' शस्त्रक्रियेसाठी त्रयस्थ वैद्यकीय समितीकडून प्रशिक्षण करणे बंधनकारक केले पाहिजे.

लीना गाडगीळ

शेतकरी शिक्षणाचा नवा विचार

शेतीत राहणाऱ्या तरुणांनाही आधुनिक तंत्रज्ञानासोबत आर्थिक नियोजन, बाजारपेठ, व्यवसाय व्यवस्थापन आणि उद्योजकतेचे प्रशिक्षण योग्य स्वरूपात मिळताना तितकेसे दिसत नाही. ही केवळ शेती क्षेत्राची समस्या नसून आपल्या शिक्षणयवस्थेच्या रचनेतील एक मूलभूत उणीव आहे. उद्योजकतेकडे जाणारा प्रवासच भारतीय शेतीच्या परिवर्तनाचा खरा पाया ठरू शकतो.

आज भारतीय शेती अतिशय महत्त्वाच्या वळणावर उभी आहे. हवामानातील अनिश्चितता, उत्पादन खर्चात सातत्याने होणारी वाढ, बाजारभावातील चढ-उतार, मजुरांची कमतरता, नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास आणि जागतिक बाजारपेठेतील वाढती स्पर्धा यामुळे शेती व्यवसाय दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीचा होत आहे. पूर्वी अनुभवाच्या जोरावर घेतले जाणारे अनेक निर्णय आज तितकेसे प्रभावी ठरत नाहीत. त्यामुळे आजचा खरा प्रश्न असा आहे की, आपण शेतकऱ्यांना केवळ शेती करायला शिकवत आहोत, की शेतीचा व्यवसाय समजून घेण्यासाठी सक्षम करत आहोत?

भारताला कृषिप्रधान देश म्हणून ओळखले जाते. देशाच्या अर्थव्यवस्थेत, रोजगारनिर्मितीत आणि अन्नसुरक्षेत शेतीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मात्र या क्षेत्राला भारतीय शिक्षणव्यवस्थेत अपेक्षित स्थान मिळालेले दिसत नाही. शाळांमध्ये गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल यांसारखे विषय शिकवले जातात; परंतु अन्न कुठून येते, पीक कसे वाढते, मातीचे आरोग्य कशावर अवलंबून असते, पाण्याचे नियोजन कसे करावे, अन्नाची मूल्यसाखळी कशी कार्य करते आणि शेतमालाला बाजारपेठेत मूल्य कसे मिळते याची ओळख मुलांना शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यात फारशी करून दिली जात नाही.

कृषिप्रधान देशात शेती ही अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक बनली; परंतु ती शिक्षणव्यवस्थेचा मूलभूत भाग होऊ शकली नाही. परिणामी, शेतीकडे विज्ञान, व्यवसाय, संशोधन आणि उद्योजकतेची संधी म्हणून पाहण्याची दृष्टी समाजात पुरेशा प्रमाणात विकसित झाली नाही. आज अनेक ग्रामीण तरुण शेतीपासून दूर जाण्याचा विचार करतात. शेतीत राहणा? या तरुणांनाही आधुनिक तंत्रज्ञाना सोबत आर्थिक नियोजन, बाजारपेठ, व्यवसाय व्यवस्थापन आणि उद्योजकतेचे प्रशिक्षण योग्य स्वरूपात मिळताना तितकेसे दिसत नाही. ही केवळ शेती क्षेत्राची समस्या नसून आपल्या शिक्षणव्यवस्थेच्या रचनेतील एक मूलभूत उणीव आहे.



मागे एकदा शिक्षणतज्ञ विवेक सावंत यांनी सह्याद्री फार्म्समध्ये केलेले भाषण मी ऐकले. त्यांनी मांडलेले काही विचार मला महत्त्वाचे वाटतात. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकातील माहिती पाठ करणे, परीक्षा देणे आणि गुण मिळवणे नव्हे. शिक्षणाचा खरा उद्देश माणसाला विचार करायला, प्रश्न विचारायला, निरीक्षण करायला आणि अनुभवातून स्वतचे ज्ञान निर्माण करायला शिकवणे हा आहे. मारिया मॉन्टेसरी यांच्या शिक्षणपद्धतीतही मुलांच्या प्रत्यक्ष कृती, निरीक्षण आणि अनुभवाला विशेष महत्त्व दिले आहे. मुलांनी स्वत वस्तू हाताळणे, प्रयोग करणे आणि कृतीतून शिकणे यामुळे त्यांचे आकलन अधिक सखोल होते. थॉमस एडिसनच्या जीवनातील अनेक उदाहरणांतूनही जिज्ञासा, प्रयोगशीलता आणि पारंपरिक शिक्षणाच्या पलीकडे असलेल्या क्षमतांचे महत्त्व अधोरेखित होते. हाच विचार शेतीच्या शिक्षणालाही लागू होतो. शेतकऱ्याला खतांची शिफारस थेट सांगण्यापेक्षा स्वतच्या शेतातील माती तपासून घेणे, माती परीक्षणाचा अहवाल समजावून घेणे, पिकाची अवस्था पाहणे आणि त्यानुसार खतांचे नियोजन करायला शिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण माहिती ऐकणारा शेतकरी आणि त्या माहितीचा वापर करून निर्णय घेणारा शेतकरी यांच्यात मोठा फरक आहे.

आज शेतक-यांपर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी अनेक माध्यमे उपलब्ध आहेत. कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी विभाग, कृषी अधिकारी, कृषी निविष्ठा विक्रेते, खासगी कंपन्या, प्रगतिशील शेतकरी, यूट्यूब, व्हॉट्सआप आणि विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म यांमुळे शेतीविषयक माहिती मिळवणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. मात्र माहितीची उपलब्धता म्हणजे ज्ञानाची प्राप्ती असे नाही. उदाहरणार्थ, एखाद्या व्हिडीओमध्ये विशिष्ट औषधाची फवारणी केल्याने चांगले उत्पादन मिळाल्याचे दाखवले जाते; परंतु त्या शेतातील हवामान, जमिनीचा प्रकार, पिकाची अवस्था, रोगाचा प्रादुर्भाव, औषधाची मात्रा आणि फवारणीची वेळ यांचा संदर्भ दिलेला नसतो. दुसऱ्या शेतकऱ्यानेही त्याच पद्धतीचा वापर केला तर त्याला तसाच परिणाम मिळेल याची खात्री नसते. अनेकदा अशा अपु? या माहितीवर आधारित निर्णय घेतले जातात. याचा परिणाम केवळ एका हंगामाच्या उत्पादनावर होत नाही, तर जमिनीचे आरोग्य, पाण्याचा वापर, कीड-रोगांचे व्यवस्थापन आणि शेतक? याच्या आर्थिक स्थितीवरही होतो. म्हणूनच शेतक? याला माहिती देण्याबरोबरच माहितीची सत्यता तपासणे, तिचा संदर्भ समजून घेणे आणि स्वतच्या परिस्थितीनुसार तिचा वापर करणे शिकवणे आवश्यक आहे.

प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण देणे म्हणजे केवळ शेतावर प्रात्यक्षिके घेणे एवढाच त्याचा अर्थ नाही. शेतकऱ्यांच्या शिक्षणातून तीन मूलभूत क्षमता विकसित होणे आवश्यक आहे. पहिली म्हणजे साक्षरता. यात वाचन-लेखनाच्या पारंपरिक साक्षरतेबरोबर आर्थिक, डिजिटल, तांत्रिक आणि बाजारपेठीय साक्षरतेचा समावेश झाला पाहिजे. शेतकऱ्याला बँकेचे व्यवहार, कर्जाचे गणित, डिजिटल साधनांचा वापर, बाजारभाव आणि शासकीय योजनांची माहिती समजली पाहिजे. दुसरी म्हणजे सक्षमता. माती परीक्षणाचा अहवाल वाचणे, पाण्याचे नियोजन करणे, उत्पादन खर्च मोजणे, पीक व्यवस्थापन करणे आणि योग्य तंत्रज्ञानाची निवड करणे या गोष्टी तो स्वतंत्रपणे करू शकला पाहिजे. तिसरी म्हणजे चारित्र्यसंपन्नता. कुतूहल, चिकित्सक विचार, धाडस, प्रामाणिकपणा, शिस्त, प्रयोगशीलता आणि अपयशातून शिकण्याची तयारी हे गुण विकसित होणे गरजेचे आहे. यासोबतच Learning, Unlearning आणि Relearning म्हणजे शिकणे, कालबाह्य झालेल्या गोष्टी सोडून देणे आणि नव्याने शिकणे ही वृत्तीही विकसित झाली पाहिजे. कारण शेतीत अनुभवाला मोठे महत्त्व असले तरी प्रत्येक जुन्या पद्धतीला अंतिम सत्य मानणे योग्य नाही. बदलत्या परिस्थितीत अनुभवाची चिकित्सा करून आवश्यकतेनुसार पद्धती बदलणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शेतकरी शिक्षणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, शेतीकडे उद्योजकतेच्या दृष्टिकोनातून पाहणे. आजही अनेक शेतक? यांचा विचार 'काय पिकवायचे आणि किती उत्पादन घ्यायचे' या दोन प्रश्नांभोवती फिरतो. परंतु बदलत्या बाजारपेठेत हे प्रश्न पुरेसे नाहीत. माहितीपासून ज्ञानाकडे, ज्ञानापासून कौशल्याकडे आणि कौशल्यापासून उद्योजकतेकडे जाणारा प्रवासच भारतीय शेतीच्या परिवर्तनाचा खरा पाया ठरू शकतो. शेतकऱ्याला केवळ शेतीचे तंत्र शिकवून चालणार नाही; त्याला शेतीचा विचार करायला, तिचे अर्थशास्त्र समजून घ्यायला आणि स्वतच्या ज्ञानातून भविष्य घडवायला शिकवावे लागेल, तेव्हाच शेती हा केवळ उदरनिर्वाहाचा पर्याय न राहता सन्मानाचा, शाश्वततेचा आणि उद्योजकतेचा व्यवसाय बनू शकेल.

रितेश पोपळघट

■ सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्रय

अकोला
जिल्हा विशेष

मनपाच्या सभेत मोबाइल रेकॉर्डिंगवरून रणकंदन!

■ नगरसेवकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला लगाम घालण्याचा प्रयत्न?
■ सत्ताधारी-विरोधक आमनेसामने येण्याची शक्यता; आज सभागृहात खडाजंगीचे संकेत

■ प्रतिनिधी | अकोला ■

महापालिकेच्या सभागृहात नेमके काय घडते, कोण काय बोलते, कोणावर आरोप होतात आणि सत्ताधारी कोणत्या मुद्द्यांवर अडचणीत येतात, हे नागरिकांपर्यंत पोहोचविणाऱ्या मोबाइल व्हिडिओ रेकॉर्डिंगवरच आता निर्बंध आणण्याची तयारी सुरू असल्याचे चित्र आहे. सभागृहात नगरसेवकांनी भ्रमणध्वनीद्वारे व्हिडिओ चित्रीकरण करू नये, असा विषय थेट सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यावर समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे हा केवळ मोबाइल वापराचा विषय नसून, सभागृहातील कामकाजाची पारदर्शकता, लोकप्रतिनिधींचे अधिकार आणि नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराशी संबंधित राजकीय संघर्ष ठरण्याची शक्यता आहे.

आज सोमवारी, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या विषयावर जोरदार चर्चा होण्याचे संकेत आहेत. मोबाइल रेकॉर्डिंगवर बंदी आणण्यामागे नेमकी कोणती गरज आहे, याचे स्पष्टीकरण सत्ताधाऱ्यांना द्यावे लागणार आहे. सभागृहात होणाऱ्या चर्चा, आरोप-प्रत्यारोप आणि लोकप्रतिनिधींच्या भूमिकांचे चित्रीकरण नागरिकांपर्यंत पोहोचत असेल, तर त्यावर निर्बंध आणण्याची वेळ नेमकी का आली, हा प्रश्नही उपस्थित होणार आहे.

रेकॉर्डिंगला विरोध म्हणजे पारदर्शकतेला विरोध?

लोकशाही व्यवस्थेत सभागृहातील चर्चा ही केवळ नगरसेवकांपुरती मर्यादित नसते. शहरातील करदात्यांच्या पैशातून चालणाऱ्या महापालिकेच्या कारभारावर चर्चा होते. विकासकामांचे निर्णय घेतले जातात. प्रशासनाला जाब विचारला जातो. सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जातात. या सर्व प्रक्रियेची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचणे ही लोकशाहीच्या पारदर्शकतेची अपेक्षा आहे.

अशा परिस्थितीत मोबाइल रेकॉर्डिंगवर निर्बंध आणण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. सभागृहातील कामकाजाचे अधिकृत इतिवृत्त उपलब्ध असतेच; मात्र प्रत्यक्ष सभेत झालेली वक्तव्ये, त्यावेळचे वातावरण आणि लोकप्रतिनिधींच्या भूमिका नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम व्हिडिओच्या माध्यमातून होते. त्यामुळे रेकॉर्डिंग बंद करण्यापेक्षा त्यासाठी स्पष्ट नियमावली तयार करणे अधिक योग्य ठरणार नाही काय, असा सवाल उपस्थित होऊ शकतो.

पाणीटंचाईवर उपाय की केवळ कागदी नियोजन?

शहरात पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना या सभेत पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांवरही चर्चा होणार आहे. नवीन हायड्रंट उभारणे, विहिरींवर पंप बसविणे, बोअरवेलची पाणीक्षमता तपासणे आणि अवैध नळजोडण्या नियमित करण्यासाठी मोहीम राबविणे, अशा विषयांचा अजेंड्यात समावेश आहे.

मात्र, नागरिकांना प्रत्यक्ष किती पाणी मिळणार, नवीन उपाययोजनांची अंमलबजावणी कधी होणार आणि पाणीपुरवठ्यातील त्रुटींना जबाबदार कोण, याची उत्तरे सभेत मिळणे अपेक्षित आहे. केवळ उपाययोजनांची यादी सादर करून पाणीटंचाईचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी कालबद्ध कृती आराखडा आणि प्रशासनाची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे.

प्रभागातील विकासकामांवरही निर्णय

प्रभाग क्रमांक ६ आणि ११ मधील मनकर्णा प्लॉट, गवळीपुरा येथे अकोट रोडसमोरील रस्त्यावर कमान उभारण्याबाबत नगरसेवक चांद चौधरी यांनी दिलेल्या निवेदनावरही सभेत निर्णय होणार आहे. याशिवाय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २३ अन्वये नैमित्तिक रिक्त जागा भरण्याचा विषयही अजेंड्यावर आहे.

एकीकडे शहराच्या मूलभूत प्रश्नांवर निर्णय घेण्याची जबाबदारी, तर दुसरीकडे सभागृहातील मोबाइल रेकॉर्डिंगवर निर्बंध आणण्याचा प्रस्ताव, अशा परस्परविरोधी विषयांमुळे आजची सभा राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे. सभागृहातील चर्चा नागरिकांपासून दूर ठेवायची की लोकशाहीच्या चौकटीत अधिक पारदर्शक करायची, याचे उत्तर आजच्या सभेत मिळणार आहे. मोबाइल रेकॉर्डिंगचा मुद्दा केवळ तांत्रिक नियमांचा नसून, महापालिकेच्या कारभारातील पारदर्शकतेची कसोटी ठरणार आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये या मुद्द्यावर कोणती भूमिका घेतली जाते, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.

रस्तेयोग्य वाहनांनाच परवानगी देणे हा स्वयंचलित चाचणी केंद्राचा उद्देश

प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार

■ प्रतिनिधी | अकोला ■

मोटार वाहन कायद्यानुसार अकोला येथे स्वयंचलित चाचणी केंद्र (ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन) ३ ऑगस्टपासून कार्यान्वित आहे. वाहनांची योग्यता वस्तुनिष्ठपणे तपासून केवळ पात्र वाहनांनाच रस्त्यावर चालविण्याची परवानगी देणे हा त्याचा हेतू आहे. वाहने रस्तेयोग्य असल्यास फेल होत नाहीत व पुन्हा चाचणीची गरज भासत नाही, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार यांनी स्पष्ट केले आहे.

ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन येथे सुमारे ८० टक्के वाहन फेल होत असल्याचा दावा काही माध्यमांतील बातम्यांत करण्यात आला आहे. तथापि, ती चुकीची माहिती आहे. वास्तविक, पात्र वाहनांना परवानगी देऊन वाहतूक सुरक्षित करणे हा केंद्राचा हेतू आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

या केंद्राचा मुख्य उद्देश वाहनांची योग्यता, सुरक्षा, ब्रेक चाचणी, प्रदूषण चाचणी, हेडलाइट, उत्सर्जन, सस्पेन्शन इतर निकषांची तपासणी करून केवळ कायद्यानुसार पात्र वाहनांनाच चालविण्याची परवानगी देणे हा आहे. चाचणी स्वयंचलित आणि कॅलिब्रेटेड उपकरणांद्वारे केली जाते. मानवी हस्तक्षेप किमान ठेवला जातो. त्यामुळे निकाल वस्तुनिष्ठ असून डिजिटल स्वरूपात वाहन किंवा एएफएमएस प्रणालीशी जोडला जातो. मानवी तपासणीतील व्यक्तिनिष्ठता दूर होते आणि रस्ते सुरक्षा व उत्सर्जन नियंत्रण या सरकारी धोरणांना बळकटी मिळते. हे केंद्र फक्त चाचणीसाठी असून, इतर व्यावसायिक व्यवहार करण्यास परवानगी नाही.

वाहन फेल होण्यामागील कारणे

वाहन फेल होण्याचे मुख्य कारण म्हणजे केंद्रीय मोटार वाहन नियम आणि मोटार वाहन कायद्यानुसार निर्धारित निकष पूर्ण न करणारी वाहने चाचणीसाठी सादर केली जातात. प्रदूषण चाचणी, ब्रेक चाचणीमध्ये निकष पूर्ण न होणे, हेडलाइटची चुकीची दिशा किंवा तीव्रता कमी होणे, अतिरिक्त उत्सर्जन, टायरची झीज, सस्पेन्शनमधील दोष आदी कारणांमुळे वाहने अपात्र ठरतात. हे निकष केंद्र शासनाने निश्चित केले व देशभर समान आहेत. त्यामुळे वाहनधारकांनी चाचणीपूर्वी आपली वाहने पूर्णतः रस्तेयोग्य करावीत जेणेकरून ती फेल होणार नाहीत. पुन्हा चाचणीची गरज भासणार नाही आणि अनावश्यक त्रास टळेल. स्वयंचलित चाचणी केंद्र हे राज्य शासनाने अधिकृत केलेली यंत्रणा आहे. त्याचे दैनंदिन कामकाज, व्यवस्था, उपकरणांचे संचालन आदी कामे अधिकृत खासगी यंत्रणेद्वारे केली जातात. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी समीर शेख यांना स्वयंचलित चाचणी केंद्राच्या दैनंदिन प्रशासनाचे किंवा कामकाजाचे कोणतेही काम सोपविण्यात आले नाही. त्यांची या केंद्राच्या दैनंदिन कार्यपद्धतीत कोणतीही भूमिका नाही. प्रादेशिक परिवहन कार्यालयाची भूमिका केवळ विहित पर्यवेक्षणापुरती मर्यादित आहे. त्यामुळे यासंबंधी यापूर्वी प्रसिद्ध काही बातम्या विपर्यस्त आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. चाचणी केंद्राचा उद्देश रस्ता सुरक्षा वाढविणे हा असून, नागरिकांनी वाहने रस्तेयोग्य करूनच चाचणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

गृहसणाचा हर्षोल्हासात समारोप; हंगामाचा सण उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | अकोला ■



बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभा; फळे व वस्तूंच्या लिलावातून चर्चच्या विकासासाठी निधी

ख्रिश्चन धर्मीयांच्या गृहसणाची सांगता रविवारी हंगामाचा सण उत्साहात साजरा करून करण्यात आली. गेल्या पंधरवड्यापासून सुरू असलेल्या या धार्मिक उत्सवाचा खदान परिसरातील ख्रिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभा आणि विविध धार्मिक कार्यक्रमांनी समारोप झाला.

ख्रिसमस अर्थात नाताळ सणाच्या महिनाभर आधी ख्रिश्चन धर्मीयांच्या गृहसणाला सुरुवात होते. या काळात चर्चमधील सदस्यांच्या घरी भेटी देऊन कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस केली जाते. तसेच त्यांच्या सुख-समृद्धी आणि कल्याणासाठी सामूहिक प्रार्थना केली जाते. अकोला शहरातील कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट या दोन्ही पंथांच्या चर्चमध्ये नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून गृहसणाचे आयोजन करण्यात येते.

रविवारी, २२ नोव्हेंबर रोजी बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्चमध्ये आयोजित विशेष प्रार्थना सभेला पंचमंडळ सदस्य राजेश ठाकूर यांनी संबोधित केले. यावेळी चर्चचे वडील जस्टीन मेश्रामकर, असिस्टंट पाळक वैशाली डोंगरदिवे, सचिव सरला मेश्रामकर, खजिनदार अरविंद बिरपॉल, पंचमंडळ सदस्य अमित ठाकूर आणि संडे स्कूल शिक्षिका डॉ. शीतल ठाकूर उपस्थित होते.

गृहसणाच्या निमित्ताने ख्रिश्चन कॉलनी परिसरात सायंकाळी प्रकाशफेरी काढण्यात आली. या फेरीत कार्यकारी मंडळ, तरुण संघ, महिला संघ तसेच संडे स्कूलमधील बालकांसह आबालवृद्धांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध भक्तिगीते सादर करीत चर्चच्या सदस्यांच्या घरी भेटी देण्यात आल्या. यावेळी कुटुंबीयांची आपुलकीने विचारपूस करून त्यांच्या कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली.

विशेष प्रार्थना सभेत मार्गदर्शन करताना राजेश ठाकूर यांनी बायबलमधील वचनांच्या आधारे प्रेम, प्रीती आणि सेवाभावाचे महत्त्व विशद केले. प्रभू येशू ख्रिस्तावरील श्रद्धा दृढ ठेवून त्यांच्या शिकवणुकीनुसार आचरण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

बायबलचे नियमित वाचन करून त्यातील शिकवण प्रत्यक्ष जीवनात उतरवावी, तसेच येशू ख्रिस्ताच्या आगमनासाठी सदैव सज्ज राहून त्यांच्या राज्याची सुवार्ता समाजापर्यंत पोहोचवावी, असेही त्यांनी सांगितले. यावेळी संडे स्कूलच्या चिमुकल्यांनी सुंदर भक्तिगीत सादर केले. सभेचे संचालन सुनीता बिरपॉल यांनी केले.

हंगामाच्या सणातून चर्चच्या विकासाला हातभार

विशेष प्रार्थना सभेनंतर चर्चच्या आवारातील बेथसैदा सभागृहात हंगामाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. या परंपरेनुसार चर्चच्या सदस्यांनी आणलेल्या विविध वस्तू आणि फळांचा लिलाव करण्यात आला. या लिलावातून जमा झालेला निधी चर्चच्या विकासकामांसाठी राखून ठेवण्यात आला. या उपक्रमाचे संचालन राजेश ठाकूर आणि अरविंद बिरपॉल यांनी केले. गृहसणानिमित्त पंधरवडाभर आयोजित करण्यात आलेल्या विशेष आत्मिक सभांचा शेकडो ख्रिश्चन बंधू-भगिनींनी लाभ घेतला.

अकोल्याच्या ३६ योगशिक्षकांची चमकदार उपस्थिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

योगशिक्षकांची संघटनात्मक एकजूट, योगसंस्कृतीचा प्रसार आणि योगक्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी नवी दिशा देणारा महाराष्ट्र योगशिक्षक संघाचा दोन दिवसीय 'महायोगोत्सव २०२६' धुळे येथील प्रसिद्ध श्री स्वामीनारायण मंदिरात १४ व १५ नोव्हेंबर रोजी उत्साहात संपन्न झाला. राज्यभरातील सुमारे ९०० योगशिक्षकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या महोत्सवात अकोला जिल्ह्यातील ३६ योगशिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महाराष्ट्रात स्वतंत्र योग आयोग स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव यावेळी सर्वानुमते मंजूर करण्यात आला.महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, नियोजन समिती अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, कार्याध्यक्ष डॉ. कृणाल महाजन, राज्य प्रमुख क्रीडा विभाग राहुल येवला, राज्य कोषाध्यक्ष संतोष खरटमोल आणि योग फाउंडेशनचे सचिव अर्जुन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

योगशिक्षकांच्या समस्या व प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या हक्कांसाठी संघटित प्रयत्न करणे, विविध जिल्ह्यांतील योगशिक्षकांमध्ये विचारांची देवाणघेवाण घडवून आणणे आणि योगक्षेत्राचा सर्वांगीण विकास साधणे हा महोत्सवाचा मुख्य उद्देश होता. यावेळी योगक्षेत्रातील तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने तसेच प्रमाणित योग खेळाडूंची आकर्षक योगासन प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

संघटनात्मक निर्णयानुसार राज्य कोषाध्यक्ष संतोष खरटमोल यांच्यावर २०२७-२८ या वर्षासाठी राज्य कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

महानगरात ६५ व्या हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेस थाटात प्रारंभ



■ प्रतिनिधी | अकोला ■

६५ व्या हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेस शनिवारी प्रमिलाताई ओक हॉल येथे थाटात प्रारंभ झाला.शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने दरवर्षी ही स्पर्धा आयोजित केली जाते.यंदा स्पर्धेचे ६५ वे वर्ष असून प्रमिलाताई ओक हॉल येथे मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे दीप प्रज्वलन व नटराज पूजन करून थाटात उद्घाटन झाले.या उद्घाटन सोहळ्यात उद्घाटक म्हणून जेष्ठ रंगकर्मी अरुण घाटोळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी शशी जोशी,गीताबाली ऊनवणे,मनीष ऊनवणे,विष्णू निंबाळकर,मधु जाधव, अशोक ढेरे उपस्थित होते.मान्यवरांनी यावेळी परीक्षकांचे स्वागत करून आपले विचार व्यक्त करून या उपक्रमाची उपयुक्तता प्रतिपादित केली. स्पर्धेचे समन्वयक अमोल ताले, सहसमन्वयक महेश बगडिया, तसेच स्वयंसेवक महेंद्र घ्यारे, अंकुश गोतमारे,अभिषेक अंबुस्कर यांनी उत्तम पद्धतीने कार्यक्रमाचे संयोजन केले.या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रतिभा पाटील,शेखर वाघ आणि राम चव्हाण हे उपस्थित होते.या नाट्य स्पर्धेत टिंगल, टिंगल, हे दोघे बंधू, येस माय डियर, आरशातल्या आरशात वारले बेवारशी,भृण हत्या एक अभिशाप, एक कहानी गमतीची, छिन्नमस्था, घोसाळकर दार बंदच ठेवा,अल्पविराम,यातायात,थल ई कुथल,कोमार्य, मलिका,केस नंबर ९९, तास वाजे झणांना, स्त्री अंत्यकथा, ही परी अस्मानीची, अर्धशक्ती ,चिंधी बाजार,गाणे सहजीवनाचे आदि नाटिका या स्पर्धेत रंगणार आहेत.प्रमिलाताई ओक हॉल येथे शनिवार दि २१ नोव्हेंबर ते १९ डिसेंबर पर्यंत साय ७ वाजता आयोजित या स्पर्धेतील नाट्यप्रयोगांना नाट्य रसिकां नी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हौशी कलाकारांचा उत्साह वाढवावा असे आवाहन प्रशांत खेडेकर यांनी केले.

एम.ए. मराठी परीक्षेत विद्यापीठातून सहावा क्रमांक; ११५ हून अधिक प्रकाशित पुस्तकांचे लेखक

■ प्रतिनिधी | अकोला ■



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एम.ए. मराठी परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रा. आतिश सुरेश सोसे यांनी सहावा क्रमांक प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाचे शैक्षणिक, साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून कौतुक होत आहे. प्रा. सोसे हे बहुविद्याविभूषित शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, संपादक आणि पत्रकार म्हणून परिचित आहेत. त्यांच्या लेखणीतून आजवर ११५ हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांच्या साहित्याचे २४ भारतीय व परकीय भाषांमध्ये तसेच ११ बेगवेगळ्या लिपींमध्ये प्रकाशन झाले आहे. त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल त्यांना विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. मुंबई येथील महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळात त्यांनी सहसंपादक म्हणून कार्य केले असून, मराठी विश्वकोशाच्या खंड १७ ते २० मध्ये लेखन, संपादन व समीक्षणाचे योगदान दिले आहे. तसेच 'कुमारकोश' आणि 'महाराष्ट्र कन्या चरित्रकोश' या प्रकल्पांमध्येही त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

पत्रकारिता क्षेत्रातही त्यांचा प्रदीर्घ अनुभव असून, साठ भाषेतून प्रकाशित झालेल्या ओरिसा येथील 'प्रिय ताई' मासिक आणि मुंबई येथील 'राजमंच' पाक्षिकाचे कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, जि. अकोला.

जा.क्र./तह./प्रस्तु-१/कावि-११८२/२०२६ दिनांक - १४/१०/२०२६

जाहीरनामा

मौजे मोरगांव भाकरे ता.जि. अकोला येथील गट क्र. २२ च्या इतर अधिकारातील कुळाचा शेरा कमी करणेबाबत.

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. राजेंद्र सुखदेव जंजाळ रा. मोरगांव भाकरे ता.जि. अकोला यांनी मौजे मोरगांव भाकरे ता. जि. अकोला येथील गट क्र. २२ च्या इतर अधिकारात असलेला स प सुखदेव अंबु जंजाळ यांच्या नावाचा कुळाचा शेरा कमी करणेबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला आहे.

अर्जदार यांनी या कार्यालयात प्रकरण सादर केल्यानुसार उपरोक्त प्रकरणात ज्यांना आक्षेप / हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी ०७ दिवसांचे आंत या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले आक्षेप / हरकती सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेले आक्षेप / हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का (कुणाल झाल्टे) तहसिलदार अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३३८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

बाळाची परस्पर दत्तक प्रक्रिया बेकायदेशीर; नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई!

■ प्रतिनिधी | अकोला ■

बालकाला परस्पर संमतीने किंवा कोणत्याही अनधिकृत माध्यमातून दत्तक घेणे अथवा देणे हा कायद्याने दंडनीय अपराध आहे. शासनाने निर्धारित केलेल्या कायदेशीर प्रक्रियेचे उल्लंघन करून बालक दत्तक घेणे किंवा देणे, तसेच अशा बेकायदेशीर प्रक्रियेस मदत करणे, याप्रकरणी संबंधित व्यक्तींविरुद्ध बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील कलम ८० व ८१ अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाईची तरतूद आहे. त्यामुळे कोणत्याही दाम्पत्याने किंवा व्यक्तीने नियमबाह्य पद्धतीने बालक दत्तक घेऊ नये, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास विभाग व जिल्हा बाल संरक्षण कक्ष, अकोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अमरावती येथे उघडकीस आलेल्या बाळ विक्री प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. अनेक दाम्पत्यांना विविध कारणांमुळे नैसर्गिकरीत्या अपत्यप्राप्ती होत नाही. अशा परिस्थितीत बालकाला प्रेम, माया आणि सुरक्षित कौटुंबिक वातावरण देण्याच्या उद्देशाने दत्तक घेणे हा चांगला पर्याय आहे. मात्र, बालक दत्तक घेण्यासाठी शासनाने विशिष्ट कायदेशीर प्रक्रिया निश्चित केली आहे.

काही दाम्पत्यांना दत्तक प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्यामुळे ते मध्यस्थ, नातेवाईक किंवा इतर व्यक्तींच्या माध्यमातून परस्पर बालक दत्तक घेण्याचा प्रयत्न करतात. मात्र, अशा प्रकारची अनधिकृत प्रक्रिया बालकांच्या हिताच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. बेकायदेशीर दत्तक प्रक्रियेमुळे बालकांची विक्री, तस्करी, शोषण तसेच अत्याचार होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रत्येक इच्छुक पालकाने केवळ कायदेशीर प्रक्रियेद्वारेच बालक दत्तक घेणे आवश्यक आहे.

बालक दत्तक घेताना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ तसेच दत्तक विनियमन, २०२२ मधील तरतुदींनुसार विहित प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. इच्छुक दत्तक पालकांनी केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरणाच्या (CARA) अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी https://cara.wcd.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. दत्तक प्रक्रियेसाठी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला किंवा मध्यस्थाला पैसे देऊ नयेत. बालकाची खरेदी-विक्री किंवा परस्पर हस्तांतरण करण्याचा प्रयत्न करू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

अकोला जिल्ह्यातील इच्छुक दत्तक पालकांनी दत्तक प्रक्रियेबाबत मार्गदर्शन व अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, अकोला येथे संपर्क साधावा. तसेच बालकांची विक्री, बेकायदेशीर दत्तक प्रक्रिया, बालकांचे शोषण किंवा बालकांच्या सुरक्षिततेला बाधा आणणारा कोणताही संशयास्पद प्रकार निदर्शनास आल्यास तातडीने चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक १०९८ वर संपर्क साधावा. बालकांचे संरक्षण, सुरक्षितता आणि उज्ज्वल भविष्य सुनिश्चित करण्यासाठी नागरिकांनी बेकायदेशीर दत्तक प्रक्रियेपासून दूर राहून कायदेशीर दत्तक प्रक्रियेलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास विभाग आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष, अकोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

कृतज्ञता, अभिमान आणि आनंदाची पर्वणी ठरला 'प्रभास' सन्मान सोहळा!

कर्णबधिर मुलांच्या सक्षमीकरणासाठी समर्पित 'एकवीरा मल्टिपर्पज फाउंडेशन'चा गौरव

अमरावती/प्रतिनिधीः- समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करीत त्यांच्या सक्षमीकरणासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या एकवीरा मल्टिपर्पज फाउंडेशन, अकोला या संस्थेच्या सामाजिक योगदानाचा गौरव करणारा चौथा 'प्रभास सन्मान' सोहळा कृतज्ञता, अभिमान आणि आनंदाची पर्वणी ठरला. जन्मतः श्रवणदोष असलेल्या मुलांना संवादाचे माध्यम उपलब्ध करून देत त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सुचेता श्रीकांत बनसोड यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यातून समाजसेवेचा एक प्रेरणादायी आदर्श उपस्थितांसमोर उभा राहिला.

दैनिक हिंदुस्थानच्या आधारवड स्व. प्रभा अरुण मराठे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संस्था आणि व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी दैनिक हिंदुस्थानतर्फे दरवर्षी 'प्रभास सन्मान' प्रदान केला जातो. यंदा या पुरस्काराचे चौथे वर्ष होते. शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी स्थानिक श्याम चौकातील जोशी हॉल येथे हा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वानंद समुपदेशन केंद्राच्या संचालिका तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मोहना कुळकर्णी होत्या. प्रमुख अतिथी म्हणून भारत सरकारचे माजी पराराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर मुळे, डॉ. साधना शंकर, पुरस्कारार्थी सुचेता व श्रीकांत बनसोड आणि डॉ. अविनाश मोहरील उपस्थित होते.

दीपप्रज्वलन, माता सरस्वती पूजन आणि दैनिक हिंदुस्थानच्या वाटचालीत मोलाचे योगदान देणाऱ्या मराठे परिवारातील दिवंगत व्यक्तिमत्वाच्या स्मृतिपूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून मानवतावाद, सामाजिक एकात्मता आणि समाजाप्रती प्रत्येक व्यक्तीच्या



कर्तव्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अविनाश मोहरील यांनी केले. संचालन वसुंधरा काशिकर यांनी, सन्मानपत्राचे वाचन रसिका वडवेकर तर आभार सर्वेश मराठे यांनी मानले. कार्यक्रमाला माजी पालकमंत्री डॉ. सुनिल देशमुख, राज्य माहिती आयुक्त अरुण डोंगरे, महाबिजचे महाव्यवस्थापक दिलीप स्वामी, उपमहापौर निलेश भेंडे, डॉ. अनंत मराठे, ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. सुरेश सावदेकर, डॉ. चंद्रशेखर कुळकर्णी, डॉ. ऋषिकेश सावदेकर, डॉ. स्मिता हंतोडकर, डॉ. जयंत पांढरीकर, माजी खासदार अनंत गुढे, मंगल वस्त्रालयाचे संचालक प्रशांत मुंधडा, श्रीकांत बोरखडे, ॲड. राजेंद्र पांडे, डॉ. ॲड. रविंद्र उल्हास मराठे, जि.बी.देशमुख, माजी उपमहापौर प्रमोद पांडे, बिल्डर निलेश ठाकरे, अनिल माधोगढीया, एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशनचे विरेंद्र लड्ढा, डॉ. किशोर फुले, दिलीप दाभाडे, दिलीप कलोती, प्रा. अलखनंदा तुळजापूरकर, माजी प्राचार्या डॉ. शोभा रोकडे, डॉ. स्मिता सिकची, डॉ. सुशिल सिकची, प्राचार्य अनिल खांडेकर, प्रा. संजय मराठे, अनिता कुळकर्णी, नितीन अग्रवाल, माजी नगरसेवक संजय अग्रवाल, सुरेशकाका ढोक, नितीन जाधव, पाठक सर, प्रा. निनाद सोमण, सुरेंद्र बुरंगे, अतुल देशमुख, किशोर कलोती, ॲड. गणोरकर, डॉ.श्रीगोपाल राठी, प्रा.नरेंद्र राऊत, सोपान गोडबोले, प्रा. मोहन काटे, डॉ. गोपी भामोरे, ॲड. श्रीकांत खोरगडे, अविनाश भडांगे, दिपक अग्रवाल, प्रा. मनोज पिंपळे, रोहीत पटेल, सुधिर गाडगे, संदिप वानखडे, प्रसिध्दी मिडीया चे सुनिल देशमुख, प्रा. सावन देशमुख, डॉ. बबन बेलसरे, डॉ. विलास नांदूरकर, संजिवनी भोगावकर, प्रा. कुमार बोबडे, सुर्यकांत कोल्हे, जितेंद्र रोडे, राजूआप्पा सपाटे, अभिनंदन पेंढारी, दिपक हुंडीकर, उद्योजक अरुण वरणगावकर, डॉ. मोना चिमोटे, प्रा. किशोर शिरभाते, विक्रम झंवर, ॲड. संजय सांगाणी, प्रा. अनंत उताणे, श्रीनाथ वानखडे, जयंत कद्रे, ॲड. देशमुख, दिपक गुल्हाने, उदय चाकोते, पियुष जोशी, संजय पाखोडे, शशांक नागरे, रविंद्र लाखोडे, डॉ. उज्वला टांक, अरविंद लुंक्कड, विष्णू सोळंके, प्रा. संजय खडसे, जगदिश सायसीकमल, प्रा. यशवंत हरणे, रविंद्र उल्हे, डॉ. नितीन सेठ, महेंद्र अंबरते, गोपाल उताणे, दै. हिंदुस्थान परिवारातील जांबूवंत देशमुख, शरद गढीकर, शैलेश धुंदी, दै. हिंदुस्थानचे उपसंपादक अजय दुपारे यांचेसह शहरातील गणमान्य उपस्थित होते.

भातकुलीत धोकादायक दुचाकीस्वारावर कारवाई

रस्त्यावर झिगझॅग दुचाकी चालविणे पडले महागात

अमरावती/प्रतिनिधीः- सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालविताना वेग आणि निष्काळजीपणा इतरांच्या जीवावर बेतू शकतो. याचाच प्रत्यय भातकुली परिसरात आला. भरधाव वेगाने झिगझॅग पद्धतीने दुचाकी चालविणाऱ्या एका चालकाला गस्तीवरील पोलिसांनी थांबविले. तपासणीदरम्यान त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवानाही नसल्याचे समोर आले. याप्रकरणी तौसीफ खान युसुफ खान (वय ३८, रा. सोमेश्वर मंदिरामागे, नालसाहबपुरा, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारी, २१ नोव्हेंबर रोजी भातकुली पोलीस ठाण्याचे पथक वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार परिसरात गस्त घालत होते. पोलीस अंमलदार सागर चव्हाण यांच्यासह अन्य कर्मचारी भातकुली परिसरातून सायत गावाच्या दिशेने जात असताना दुपारी सुमारे १.१० वाजता एक दुचाकी त्यांच्या निदर्शनास आली. सदर दुचाकी भरधाव वेगाने आणि रस्त्यावर झिगझॅग पद्धतीने चालविली जात होती. वाहनाची ही पद्धत धोकादायक वाटल्याने पोलिसांनी वाहतूकविषयक इशारा देत चालकाला थांबविले. त्यानंतर पंचांसमक्ष वाहनाची आणि चालकाची चौकशी करण्यात आली.

तपासणीत दुचाकी स्प्लेंडर कंपनीची असून तिचा क्रमांक एमएच २७ एडब्ल्यू ४३५४ असल्याचे निष्पन्न झाले. चालकाची ओळख पटविल्यानंतर त्याच्याकडे वाहन चालविण्याच्या परवान्याबाबत विचारणा करण्यात आली. मात्र, त्याच्याकडे परवाना नसल्याचे त्याने सांगितले.

सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने निष्काळजीपणे आणि धोकादायक पद्धतीने वाहन चालविल्याप्रकरणी पोलिसांनी पंचनामा करून त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१ अन्वये गुन्हा नोंदविला. या प्रकरणी भातकुली पोलीस पुढील तपास करीत आहेत.

अमरावतीत आजपासून ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे आयोजन



अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने '६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२६-२७' अंतर्गत अमरावती केंद्राच्या प्राथमिक फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. पंचवटी चौकातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६ पासून सायंकाळी ७ वाजता या स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

या स्पर्धेत विविध संस्थांची नाटके सादर होणार असून २३ नोव्हेंबर रोजी 'विलंब', २४ नोव्हेंबर रोजी 'फ्रेंडशिप' आणि २५ नोव्हेंबर रोजी 'समांतर' ही नाटके रंगणार आहेत. त्यानंतर २६ नोव्हेंबरला 'अनिमा', २७ नोव्हेंबरला 'द व्हल्यर अँड लिटिल गर्ल', २८ नोव्हेंबरला 'सखी गं सखी', ३० नोव्हेंबरला 'उत्तरायण', १ डिसेंबरला 'नांदी', २ डिसेंबरला 'आयुष्यावर बोलू काही', ३ डिसेंबरला 'चौथरा', ४ डिसेंबरला 'नवा अध्याय', ५ डिसेंबरला 'हे घ्या एक फूल', ६ डिसेंबरला 'अध्याय', ७ डिसेंबरला 'नायक', ८ डिसेंबरला 'जन्म मृत्यूचा', ९ डिसेंबरला 'शेवट तितका गंभीर नाही', १० डिसेंबरला 'अभिमन्यू', १२ डिसेंबरला 'चार चौघी', १४ डिसेंबरला 'रानू', १५ डिसेंबरला 'रिंगण', १६ डिसेंबरला ''Color Code' ' एकच रंग... पाच ढंग... नात्यांचा नवा अंतरंग'' आणि १७ डिसेंबर २०२६ रोजी 'लोककलेच्या बैलाले पो' या नाटकांचे सादरीकरण होणार आहे.


सर्व नाट्यप्रयोग सायंकाळी ७ वाजता सुरू होतील, अशी माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांच्या वतीने देण्यात आली. रसिकांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

श्री कार्यसिद्धी हनुमान मंदिरात भव्य अन्नकूट महोत्सव

हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

अमरावती/प्रतिनिधीः- सक्करसाथ येथील श्री कार्यसिद्धी हनुमान मंदिरात दीपावली व नववर्षानिमित्त भव्य अन्नकूट प्रसादी महोत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात श्री हनुमानजी महाराजांना विधिवत चोला अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर प्रभूंना ५६ भोगांचा दिव्य नैवेद्य अर्पण करण्यात आला. वैदिक मंत्रोच्चारात भव्य महाआरती संपन्न झाल्यानंतर अन्नकूट प्रसादीचे वितरण करण्यात आले.

अन्नकूट प्रसादीचा लाभ घेण्यासाठी हजारो भाविक भक्तांनी मंदिरात हजेरी लावली. संपूर्ण मंदिर परिसर 'जय श्रीराम' व 'जय बजरंगबली'च्या जयघोषाने दुमदुमून गेला आणि वातावरण भक्तिमय झाले.






यावेळी उपस्थित मान्यवर, लोकप्रतिनिधी, गणमान्य नागरिक व भाविकांनी कार्यक्रमाचे आयोजक व संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम रामबिलास शर्मा यांचे मनःपूर्वक आभार मानले.

कार्यक्रमास शहरातील सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

उपस्थितांनी महाप्रसादाचा लाभ घेत दीपावली व नववर्षाच्या शुभेच्छांची देवाणघेवाण केली तसेच श्री हनुमानजी महाराजांच्या चरणी सर्वांच्या सुख, समृद्धी व मंगलमय जीवनासाठी प्रार्थना केली.प्रमुख उपस्थितीत भाजप नेते प्रा. रवी खांडेकर, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शिवसेना नेते व माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता, शिवसेना नेत्या प्रीतीताई बंड, युवा नेते यश खोडके, शिवसेना नेते नानकराम नेभनानी, नगरसेवक विलास इंगोले, स्वीकृत नगरसेवक ॲड. प्रशांत देशपांडे, स्वीकृत नगरसेवक प्रा. संजय तीरथकर, नगरसेवक संजय शिरभाते, भाजयुमो अमरावती शहर जिल्हाध्यक्ष विजय उर्फ विक्की शर्मा, प्रा. डॉ. राजेश जयपूरकर, जुगलकिशोर पटेरिया, देवदत्त जोशी, राजू भेले, सुरेश रतावा, स्वराज बंड, समीर जवांजळ, विनोद गुहे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

चांदूर रेल्वे पोलिसांची 'ऑपरेशन कवच' अंतर्गत कारवाई

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः- विविध गुन्ह्यांमध्ये सहभागी असतानाही पोलिसांना गुंगारा देत दीर्घकाळापासून फरार असलेल्या आरोपींच्या मुसक्या आवळण्यात चांदूर रेल्वे पोलिसांना यश आले आहे. ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'ऑपरेशन कवच' मोहिमेंतर्गत पोलिसांनी तब्बल दहा वर्षांपासून फरार असलेल्या एका आरोपीसह एकूण तीन फरार आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक केली. पहिल्या कारवाईत चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यातील गुन्ह्यात गेल्या दहा वर्षांपासून फरार असलेला मांजरखेड येथील रामेश्वर ऊर्फ रामू वसंता जाधव (वय ४०) याला परसोळा गावातून अटक करण्यात आली. अटकेपासून बचाव करण्यासाठी तो जिल्ह्याबाहेर लपून राहत होता. मात्र, पोलिसांनी त्याचा शोध घेत त्याला अखेर जेरबंद केले.



दुसऱ्या कारवाईत २०२३ मध्ये दाखल झालेल्या चोरीच्या गुन्ह्यात तीन वर्षांपासून फरार असलेला शिरजगाव कोरडे येथील साजन विजय उके (वय ३०) याला नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वेणी गणेशपूर येथून ताब्यात घेण्यात आले. तिसऱ्या कारवाईत १५ मे रोजी दाखल झालेल्या एका गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला विरूळ रोंघे गावातून अटक करण्यात आली. गुन्हा घडल्यानंतर तो जिल्ह्याबाहेर लपून बसला होता. पोलिसांनी त्याचा माग काढत त्याला ताब्यात घेतले. पोलीस निरीक्षक मंगेश मोहोड यांच्या नेतृत्वाखाली पीएसआय मुलचंद भांबुरकर, कैसर खान, नितीन शेंडे, अमोल देशमुख आणि सोनल उमरे यांनी ही कारवाई केली.

वेगवेगळ्या ठिकाणांहून आरोपी जेरबंद

धारणी-परतवाडा मार्गावर रुग्णवाहिका खड्ड्यात उलटली

सेमाडोह-पिली गावादरम्यान मध्यरात्री अपघात

धारणी/प्रतिनिधीः- धारणी–परतवाडा मार्गावर सेमाडोह आणि पिली गावादरम्यान मध्यरात्रीच्या सुमारास एका खासगी रुग्णवाहिकेचा अपघात झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रुग्णवाहिका रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात जाऊन उलटली.

या अपघातात वाहनाचे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळी खासगी रुग्णवाहिका धारणी–परतवाडा मार्गाने जात होती. दरम्यान, सेमाडोह आणि पिली गावादरम्यान चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे रुग्णवाहिका रस्त्याच्या खाली उतरून बाजूला असलेल्या खड्ड्यात जाऊन उलटली. अपघातात रुग्णवाहिकेचे नुकसान झाले. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. चालकाचे नियंत्रण सुटले की अन्य काही कारणामुळे हा अपघात घडला, याची माहिती समोर आलेली नाही. रात्रीच्या वेळी या मार्गावरून प्रवास करताना वाहनचालकांनी विशेष खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे.

कत्तलीसाठी नेले जाणारे १४ गोवंश मुक्त

धारणी पोलिसांची जंगलात कारवाई

धारणी/प्रतिनिधीः- कत्तलीच्या उद्देशाने गोवंशीय पशूंना जंगलमार्गे घेऊन जात असल्याचा प्रकार धारणी पोलिसांनी उघडकीस आणला. बारातांडा परिसरातील शेतातून जंगलाच्या मार्गाने १४ गोवंशीय पशू निर्दयतेने हाकत नेणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी पकडले. त्याच्या ताब्यातून सर्व पशूंची मुक्तता करण्यात आली असून, ४ लाख ४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार अवैध व्यवसाय तसेच कत्तलीच्या उद्देशाने गोवंशीय पशू आणि गोमांसाची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कारवाई सुरू आहे. याच मोहिमेअंतर्गत १८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास धारणी पोलिसांनी ही कारवाई केली.

पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या आदेशानुसार सुसर्दी बाजार येथे बंदोबस्तासाठी पोलीस पथक तैनात होते. यावेळी बारातांडा परिसरातील शेतातून जंगलाच्या मार्गाने काही गोवंशीय पशू कत्तलीसाठी नेले जात असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली.

माहितीच्या आधारे पोलिसांनी बारातांड्यापासून सुमारे अडीच किलोमीटर आत जंगलातील शेत परिसरात धाव घेतली. पोलिसांना घटनास्थळी एक व्यक्ती १४ गोवंशीय पशूंना दोरीने घट्ट बांधून निर्दयतेने हाकत नेताना आढळला. पोलिसांनी त्याला जागीच पकडून चौकशी केली. त्याने आपले नाव शंकर बुढा भिलावेकर (वय ३३, रा. बारातांडा, ता. धारणी) असे सांगितले. पशूंच्या मालकी व वाहतुकीसंदर्भातील वैध कागदपत्रांची मागणी केली असता त्याच्याकडे कोणतीही कागदपत्रे आढळली नाहीत. पोलिसांनी १४ गोवंशीय पशूंना ताब्यात घेतले. त्यांची एकूण अंदाजित किंमत ४ लाख ४ हजार रुपये असून, पुढील देखभालीसाठी त्यांना बाबदा येथील वंदे मातरम् गोशाळेत पाठविण्यात आले आहे. पोलीस कर्मचारी शरद आडे यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या नेतृत्वात शिवचरण डोंगरे, शंकरलाल कासदेकर, जयकुमार मेटांगे आणि शरद आडे यांनी ही कारवाई केली. प्रकरणाचा पुढील तपास धारणी पोलीस करीत आहेत.

आईने मुलाच्या घरावर चालवला जेसीबी

कौटुंबिक कलह शिगेला

अमरावती/प्रतिनिधीः- कौटुंबिक कलह शिगेला पोहोचल्याने नात्याची नाजूकता विसरून एका आईनेच आपल्या मुलाचे घर जेसीबीने उजाडले. या कारनाम्यात तिच्या दोन मुलींनी आणि जावयांनी साथ दिली. मुलगा आणि सून एका क्षणात बेघर झाले.नवसारी परिसरातील गोकुळ ले आऊट मध्ये दिवसा-ढवळ्या ही घटना घडली. घर उजाडल्याने मुलगा-सून आणि १० वर्षांच्या नातीवर बेघर होण्याची वेळ आली आहे. घरातील फर्निचर, कपडे आणि संसारोपयोगी साहित्य मलब्याच्या ढिगाऱ्याखाली दबले गेले आहे.

केबल ऑपरेटरचे काम करणारे सुरज प्रभाकर भुते हे आपली पत्नी राधिका व १० वर्षांच्या मुलीसोबत चांगापूरला गेले होते. घरात कोणी नसल्याचा फायदा घेऊन सुरजची आई कमल भुते, दोन मुली राजश्री व जयश्री तसेच जावई देवानंद तेलकर व विजय हरणे यांनी जेसीबीच्या मदतीने घर पाडल्याचा आरोप सुरजने केला आहे. सूरज म्हणाला, मी कामानिमित्त गावी गेलो होतो. परत आलो तर माझे घरच नव्हते. आईनेच माझे घर पाडले, यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही.विशेष म्हणजे हे घर सुरजचे वडील प्रभाकर यांनी बांधले होते. घर पाडण्यासाठी कोणत्याही कोर्टाचा आदेश नव्हता, असे सुरजचे म्हणणे आहे.कोर्टात वाद सुरू असताना, कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता थेट जेसीबी आणून घर पाडणे, हा प्रकार बेकायदेशीर असल्याचा आरोप पीडित कुटुंबाने केला आहे. घर पाडल्यानंतर घरातील सामानाची नासधूस झाली. टीव्ही, फ्रिज, कपाट, बेड, स्वयंपाकाची भांडी, मुलीची शाळेची पुस्तके, कपडे सगळे मलब्यात दबले. या घटनेत सर्वात जास्त हाल झाले ते १० वर्षांच्या चिमुकलीचे. शाळेतून परत आल्यावर तिला आपले घरच दिसले नाही.

तिचे कपडे, पुस्तके, खेळणी सगळे ढिगाऱ्याखाली गेले.पीडित कुटुंब सध्या नातेवाईकांकडे आश्रयाला आहे. थंडीत उघड्यावर राहायचे कसे, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे.या प्रकरणी गाडगे नगर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. पोलिसांनी तक्रार घेऊन चौकशी सुरू केली आहे.पोलीस आता जेसीबी चालक, घर पाडण्याचा आदेश कोणी दिला, यात कोणाचा सहभाग होता, याची चौकशी करीत आहेत. घराच्या कागद पत्रांचीही तपासणी सुरू आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

दसरा मैदानात दरोड्याचा डाव उधळला; सात जणांना अटक

मिरची पूड, चाकू, लोखंडी रॉडसह ३.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावता/प्रतिनिधीः- शहरातील दसरा मैदानावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सात जणांना गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून अटक केली. तोंडाला दुपट्टे बांधून अंधारात आणि झुडपांच्या आड दबा धरून बसलेल्या या संशयितांकडे दरोड्यासाठी लागणारे साहित्य आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून मिरची पूड, लोखंडी रॉड, टॉमी, लाकडी दांडके, चार चायना चाकू, दोरी, मोबाइल आणि तीन दुचाकी असा एकूण ३ लाख २८ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, अटक केलेल्या सातपैकी पाच जणांविरुद्ध यापूर्वीही विविध पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

गुन्हे शाखेच्या पथकाला सात संशयित व्यक्ती दसरा मैदान परिसरात दरोड्याच्या तयारीने एकत्र जमल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या व्यक्तींनी तोंडाला दुपट्टे बांधले असून, त्यांच्याकडे धारदार शस्त्रे आणि लोखंडी रॉड असल्याची माहितीही पोलिसांना मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने रवी नगर रोडच्या दिशेने दसरा मैदान गाठून परिस्थितीची पाहणी केली. यावेळी अंधाराचा आणि झुडपांचा आडोसा घेऊन काही व्यक्ती वाहनांसह दबा धरून बसल्याचे दिसून आले. संशयितांची खात्री पटल्यानंतर पोलिसांनी परिसराला वेढा घातला. पोलिसांची चाहूल लागताच सातही जणांनी घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, गुन्हे शाखेच्या पथकाने पाठलाग करून सर्वांना वाहनांसह ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता दरोड्याच्या तयारीसाठी वापरले जाणारे साहित्य आढळून आले. यात मिरची पूडीची पाकिटे, लोखंडी टॉमी, रॉड, लाकडी दांडके, चार चायना चाकू, दोरी, मोबाइल आणि तीन दुचाकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या सातही जणांविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, शाम घुगे, प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पथकातील गजानन सोनुने, सुनील लासुरकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवळे, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाले, जहीर शेख, मिर्झा नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे तसेच चालक संदीप खंडारे, राहुल दुधे आणि मोहन साबे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ८०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर

दहेगाव गोसावी आरोग्य केंद्राचा कारभार रामभरोसे

मुख्यालयी राहण्याच्या नियमाला केराची टोपली दाखविणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे ग्रामीण आरोग्य यंत्रणा व्हेंटिलेटरवर

सेलू/अभय बेदमोहता

कुंपणानेच शेत खाल्ले तर दाद कोणाकडे मागायची अशीच काहीशी भयावह अवस्था सध्या सेलू तालुक्यातील दहेगाव गोसावी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची झाली आहे. नुकतीच या केंद्राच्या दुरवस्थेबाबत प्रसिद्ध झालेली बातमी हा तर केवळ एक 'ट्रेलर' असून, प्रत्यक्षात या आरोग्य मंदिराचा कारभार त्याहूनही अधिक सडलेला असल्याचा संतापजनक सूर आता गावकऱ्यांमधून उमटू लागला आहे. रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असतानाही येथील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वागण्यात तसूभरही सुधारणा होत नसल्याने, मी नाही त्यातली आणि कडी लावा आतली या उक्तीप्रमाणे या कामचोर यंत्रणेचा मनमानी कारभार राजरोसपणे सुरू आहे.



डॉक्टरांची 'अरेरावी' आणि 'मीच सर्वोपरी'चा माज

ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र हा मोठा आधार असतो. मात्र, दहेगाव गोसावी केंद्रात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या रास्त मागण्यांना येथील डॉक्टरांकडून अक्षरशः 'चिल्लर' समजून वाटाण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत. रुग्णांची व्यथा ऐकून घेण्याऐवजी डॉक्टर स्वतःचेच म्हणणे आणि मनमानी कृत्य सर्वोपरी समजून वागत असल्याचा गंभीर आरोप नागरिक करत आहेत. 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी अवस्था या केंद्राची झाली असून, डॉक्टरांच्या या मुजोरीला नेमके कोणाचे अभय मिळत आहे, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. शासनाने अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहून २४ तास सेवा देण्याचे बंधन घातले आहे. परंतु, दहेगाव गोसावी केंद्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना जणू 'मुख्यालयाची ॲलर्जी'च झाली आहे. दिवसाढवळ्या केंद्राकडे पाठ फिरवणारे हे कर्मचारी रात्रीच्या वेळी तर गावात फिरकतही नाहीत. रात्रीच्या वेळी एखाद्या गरीब रुग्णावर वैद्यकीय आणीबाणी ओढवली, तर केवळ एका कर्मचाऱ्याच्या भरवशावर असलेले हे केंद्र त्याला कसे वाचवणार पगार शासनाचा घ्यायचा आणि सेवा मात्र वाऱ्यावर सोडायची, या कामचोर प्रवृत्तीमुळे सामान्य जनतेच्या आरोग्याशी थेट तडजोड सुरू आहे.

अस्वच्छतेचे साम्राज्य की रोगांचा कारखाना

ज्या ठिकाणी रुग्ण बरे होण्यासाठी येतात, त्याच आरोग्य केंद्राच्या परिसरात आणि स्वच्छतागृहांमध्ये घाणीचे साम्राज्य सर्वत्र पसरले आहे. दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे येथे उपचाराऐवजी नव्या संसर्गाचा धोका निर्माण झाला आहे. 'घरात नाही दाणा अन् बाजीराव म्हणा' अशा थाटात वरिष्ठ अधिकारी केवळ मंत्र्यांच्या दौऱ्यापुरती निवडक केंद्रांची रंगरंगोटी करून स्वतःची पाठ थोपटून घेत आहेत.

प्रशासनाला निर्वाणीचा इशारा आहे की,

तालुका आरोग्य यंत्रणेचे या केंद्रावर नियंत्रण आहे की नाही, असा प्रश्न पडला आहे. जिल्हा आरोग्य प्रशासनाने आता तरी कुंभकर्णी झोपेतून जागे होऊन या केंद्राची अचानक झाडाझडती घ्यावी, कर्तव्यात कसूर करणाऱ्या आणि रुग्णांशी उद्धटपणे वागणाऱ्या मुजोर डॉक्टर व कामचोर कर्मचाऱ्यांचे निलंबन करावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

हिवाळी अधिवेशनात आवाज उठवा

हिवताप व हत्तीरोग विभागातील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ.सुमित वानखेडे यांना निवेदन

विरुळ (आर्वी)/जनमाध्यम

आरोग्य विभागातील हिवताप व हत्तीरोग नियंत्रण विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना अखेर लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून वाचा फोडण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या समस्यांची शासनदरबारी दखल घेतली जावी, यासाठी संघटनेच्या वतीने आ.सुमित वानखेडे यांना निवेदन देण्यात आले.



कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रश्नांमध्ये पदोन्नतीचा रखडलेला प्रश्न, पदनामात सुधारणा, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा कायम प्रवास भत्ता (पीटीए) वाढवून नियमित करणे तसेच नियुक्ती प्राधिकाऱ्यांमध्ये आवश्यक बदल करणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या या प्रश्नांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असून, त्यांच्या न्याय्य मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली. आगामी हिवाळी अधिवेशनात या प्रश्नांवर तारांकित प्रश्न उपस्थित करून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी विनंतीही करण्यात आली.

आ.वानखेडे यांनी कर्मचाऱ्यांचे म्हणणे सविस्तर ऐकून घेत हिवाळी अधिवेशनात हा विषय प्राधान्याने मांडून पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.यावेळी संघटनेचे पदाधिकारी देवेंद्र थेटे, गंगाधर वानरे आणि सतीश इंगोले यांनी निवेदन सादर केले.

संक्षिप्त



श्रीकृष्णाच्या जयघोषाने नगाजी पार्डी दुमदुमले

हिंगणघाट- नगाजी पार्डी येथे श्रीकृष्णाच्या जयघोषाने दुमदुमलेले गाव, भक्तिरसात रंगलेले वातावरण आणि दहीहंडीचा उत्साह अशा मंगलमय वातावरणात हिंगणघाट तालुक्यातील नगाजी पार्डी येथे जयंतीनिमित्त भव्य गोपाळकाला सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.या धार्मिक सोहळ्यानिमित्त गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गावातील नागरिक, युवक, महिला आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीकृष्णाच्या चरणी नतमस्तक होत उत्सवाचा आनंद घेतला. पारंपरिक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या गोपाळकाल्याच्या कार्यक्रमात दहीहंडीने विशेष रंगत आणली. श्रीकृष्णाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील राऊत, राजू मंडवकर, प्रफुल भडे, रामू भोयर, रामू चाफळे, मनोज चिडे, घनश्याम खूणकर, सारंग दौड, नरेंद्र मंडवकर, अतुल घोरपडे, सचिन महाजन यांच्यासह आयोजक मंडळ आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

ऑटोचालकाला दगडाने मारले

सेवाग्राम- गावातील रस्त्याने ऑटो घेऊन जात असताना दोघांनी शिवीगाळ करून दगडाने मारहाण केल्याची घटना खरांगणा गोडे येथे २१ नोव्हेंबर रोजी सकाळी घडली. जितेंद्र निळकंठ राऊत (४०), रा. खरांगणा गोडे असे जखमी ऑटोचालकाचे नाव आहे. याप्रकरणी संदीप सिरस्कार आणि आयुष सिरस्कार यांच्याविरुद्ध सेवाग्राम पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० नोव्हेंबर रोजी गावातील चौकात बसलेले असताना जितेंद्र यांचा आरोपींसोबत वाद झाला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी ९.१५ वाजताच्या सुमारास जितेंद्र ऑटो घेऊन आरोपींच्या घरासमोरील रस्त्याने जात असताना दोघांनी त्यांना शिवीगाळ केली. यावरून बाचाबाची झाली. दरम्यान, एका आरोपीने पुन्हा या रस्त्याने जायचे नाही, असे म्हणत दगडाने जितेंद्र यांच्या कपाळावर वार केला. यात ते जखमी झाले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

लोखंडी पट्टीने मारहाण; तरुण जखमी

वर्धा- बजाज चौक परिसरातून घरी जात असलेल्या तरुणाला जुन्या वादातून लोखंडी पट्टीने मारहाण करून जखमी केल्याची घटना २१ नोव्हेंबर रोजी घडली. अभिषेक अनंताजी गोडघाटे रा. शिवाजीनगर, स्टेशनफैल, वर्धा असे जखमी तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्याच परिसरातील संगम बाबूलाल मेश्राम याने त्याला अडवून, माझ्याकडे रोखून का पाहतोस, अशी विचारणा केली.

एनसीसीचे छात्र सैनिक देशाची खरी संपत्ती-कर्नल जिसांतो

सेवाग्राम येथे विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन ; नागपूर विभागातील ४५० छात्र सैनिकांचा सहभाग

सेवाग्राम/जनमाध्यम

देशाच्या संरक्षणासाठी सक्षम आणि शिस्तबद्ध युवा पिढी घडविण्यात राष्ट्रीय छात्र सेनेची (एनसीसी) महत्त्वपूर्ण भूमिका आहे. भारतीय सैन्य दलाच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये शिस्त, साहस, कर्तव्याची जाणीव, नेतृत्वकौशल्य, देशभक्ती आणि समर्पणाची भावना निर्माण केली जाते. या प्रशिक्षणातून जबाबदार नागरिक घडतात. त्यामुळे एनसीसीचे छात्र सैनिक ही देशाची खरी संपत्ती असल्याचे प्रतिपादन



२१ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल जिसांतो यांनी केले.

सेवाग्राम येथील बापूराव जी देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात १७ नोव्हेंबर रोजी आयोजित एनसीसीच्या विशेष प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्नल जिसांतो होते. प्रमुख अतिथी म्हणून एनसीसीचे प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल आर. के. सामानंदा आणि सुबेदार मेजर गुरुप्रीत सिंग उपस्थित होते.

या विशेष शिबिरात २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसीसह नागपूर विभागातील विविध शाळा आणि महाविद्यालयांतील एकूण ४५० छात्र सैनिक सहभागी झाले आहेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार सैनिकी प्रशिक्षण मिळावे यासाठी दोन सुबेदार, १७ एनसीओ आणि चार एनसीसी अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेचा विकास करण्यावर भर दिला जात आहे.

शिबिरात ड्रिल, अडथळे पार करण्याचे प्रशिक्षण, निशानेबाजी, नकाशा वाचन, अंतराचा अचूक अंदाज घेणे, फिल्ड क्राफ्ट, युद्धकला आणि शारीरिक कवायतींचा समावेश आहे.

याशिवाय नेतृत्वकौशल्य विकसित करण्यासाठी विविध उपक्रम, मैदानी खेळ, प्रश्नमंजुषा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रशिक्षण दिले जात आहे. या उपक्रमांमधून छात्र सैनिकांमध्ये आत्मविश्वास, संघभावना आणि संकटांचा सामना करण्याची क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिबिरामुळे विद्यार्थ्यांना सैनिकी जीवनशैलीचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

प्रभाग १५ मध्ये आरोग्य सुरक्षेचा जागर, २,८१० नागरिकांची ई-केवायसी पूर्ण

हिंगणघाट/जनमाध्यम

शासनाच्या आरोग्यविषयक योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने प्रभाग क्रमांक १५ मध्ये नगरसेवक विकी वाघमारे यांच्या पुढाकारातून आयुष्यमान भारत कार्ड, ई-केवायसी आणि वय वंदन कार्ड नोंदणीचे मोफत शिबीर आयोजित करण्यात आले.या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून २३७ नागरिकांनी सहभाग नोंदविला. प्रभागातील दोन अंगणवाडी केंद्रांमध्ये हे शिबीर घेण्यात आले.



आयुष्यमान भारत योजनेंतर्गत या दोन्ही केंद्रांमधील एकूण ४ हजार २४३ पात्र नागरिकांपैकी २ हजार ८१० नागरिकांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. उर्वरित पात्र नागरिकांची नोंदणी पूर्ण करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत.शासनाच्या आरोग्यविषयक योजनांपासून कोणताही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी सातत्याने काम करणार असल्याचा निर्धार नगरसेवक विकी वाघमारे यांनी व्यक्त केला. शिबिराच्या माध्यमातून आयुष्यमान भारत योजना, ई-केवायसी आणि वय वंदन कार्डाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. शिबिराच्या यशस्वितेसाठी गटप्रवर्तक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका आणि आरोग्यमित्र यांनी सहकार्य केले. प्रभागातील प्रत्येक पात्र कुटुंबाला आरोग्य सुरक्षेचा लाभ मिळवून देण्यासाठी असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे वाघमारे यांनी सांगितले.

वर्धेत डब्ल्यूसीसीएल क्रिकेटचा थरार उत्साहात

फियरलेस फाल्कन्सने पटकावले विजेतेपद



वर्धा/जनमाध्यम

युवा एकता क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय डब्ल्यूसीसीएल (Wardha Cricket Champions League) टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा समारोप २० नोव्हेंबर रोजी अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात झाला. संपूर्ण स्पर्धेदरम्यान क्रिकेटप्रेमी प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेषतः अंतिम सामन्याला वर्ध्यातील सुमारे ४ ते ५ हजार क्रिकेटप्रेमींनी उपस्थिती लावून खेळाडूंचा उत्साह द्विगुणित केला.

२० नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता फियरलेस फाल्कन्स आणि बीरा या दोन बलाढ्य संघांमध्ये अंतिम सामना रंगला. दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले. चुरशीच्या आणि रोमांचक लढतीत फियरलेस फाल्कन्स संघाने बाजी मारत डब्ल्यूसीसीएल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या जिल्हास्तरीय स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग घेतला होता. उत्कृष्ट नियोजन, दर्जेदार क्रिकेट, खेळाडूंचा उत्साह आणि प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद यामुळे डब्ल्यूसीसीएल ने वर्धा जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली. या भव्य आयोजनासाठी पंकजजी भोयर, दिलीपजी किटे, प्रदीप ठाकूर, विपिन राऊत यांच्यासह इव्होनिथ स्टील, डीसीबी बँक वर्धा शाखा, तिरुमला तिरुपती क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, आनंद फॅशन आणि जे.के. स्टील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्व मान्यवरांचे आणि प्रायोजक संस्थांचे डब्ल्यूसीसीएल समितीच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.वर्धेकरांनी दाखवलेले प्रेम, विश्वास आणि सहकार्य याबद्दल डब्ल्यूसीसीएल समितीच्या वतीने सर्व नागरिकांचे, क्रिकेटप्रेमी प्रेक्षकांचे आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

रोहित पठारे हत्याकांडातील आरोपींना फाशी द्या; आज वर्धेत धरणे आंदोलन

वर्धा/जनमाध्यम

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथे भीमसैनिक रोहित अनिल पठारे यांची हत्या करण्यात आली. या हत्याकांडातील सर्व आरोपींना कठोर शिक्षा देऊन फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, या मागणीसाठी आज २३ नोव्हेंबर रोजी वर्ध्यात धरणे व निदर्शने आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलनात फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारेच्या सर्व समाजबांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आंबेडकरी नेते महेंद्र मुनेश्वर यांनी केले आहे.

आज सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सिव्हिल लाईन परिसरातील पुतळ्याजवळ हे आंदोलन होणार आहे. रोहित पठारे यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा आणि हत्याकांडातील सर्व आरोपींना जलदगती न्यायालयात कठोर शिक्षा व्हावी, अशी आंदोलकांची मागणी आहे.

या आंदोलनात विविध पक्ष आणि संघटनांचे बॅनर बाजूला ठेवून केवळ तिरंगा,निळा ध्वज आणि पंचशील ध्वज घेऊन सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अंगीकार करून समाजाने अन्यायाविरोधात एकजुटीने उभे राहण्याची गरज आहे.समाजावरील अन्यायाविरोधात मौन बाळगणे योग्य नाही. त्यामुळे सर्व भीमसैनिक आणि आंबेडकरी कार्यकर्त्यांनी मतभेद बाजूला ठेवून लोकशाही व संविधानिक मार्गाने आंदोलनात सहभागी व्हावे,असे महेंद्र मुनेश्वर यांनी प्रसिद्धीपत्रकातून म्हटले आहे.

विठ्ठलभक्तीचा जागर! कौंडण्यपुरात वारकरी सेवेचा भक्तिमय सोहळा-सुधीर दिवे


स्व. वामनराव दिवे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सलग १८ व्या वर्षी वारकऱ्यांचे स्वागत, सन्मान व महाप्रसादाचे आयोजन

आर्वी/जनमाध्यम

विदर्भाची पंढरी म्हणून सर्वदूर प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपुरात कार्तिकी भक्तीचा अनोखा सोहळा बुधवार २५ रोजी रंगणार आहे. कार्तिक प्रतिपदा अर्थात दहीहंडीच्या पावन पर्वावर भरणाऱ्या पारंपरिक यात्रेनिमित्त हजारो वारकरी,दिंड्या,टाळ-मृदुंगाचा गजर आणि हरिनामाच्या अखंड जयघोषाने संपूर्ण कौंडण्यपुर नगरी भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

विठुरायाच्या चरणी सेवा अर्पण करण्याची भावना मनाशी बाळगून स्व. वामनराव दिवे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुधीर दिवे आणि परिवाराच्या वतीने वारकऱ्यांचे स्वागत, सन्मान आणि महाप्रसादाचा भक्तिमय उपक्रम आयोजित हा उपक्रम वारकरी संप्रदायाप्रती असलेली श्रद्धा, संतपरंपरेचा आदर आणि निःस्वार्थ सेवाभाव जपणारा आहे. वारकऱ्यांची सेवा करण्याचा हा उपक्रम यंदा सलग १८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे.

कौंडण्यपुरच्या या यात्रेला धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेचा मोठा वारसा लाभला आहे. येथील श्री संत सदाराम महाराज दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे जाऊन विठुरायाचे दर्शन घेत असत. मात्र वृद्धापकाळामुळे



त्यांना पंढरपूरची वारी करणे अशक्य झाल्यानंतर प्रत्यक्ष विठ्ठलानेच आपण कौंडण्यपुरात कार्तिक पौर्णिमा व प्रतिपदेला येत असल्याचे सांगितल्याची आख्यायिका आहे.

या भक्तिमय सोहळ्याला श्री संत आचार्य जितेंद्रनाथ महाराज (देवनाथ मठ, अंजनगाव सुर्जी), श्री संत सचिन देव महाराज तसेच श्री संत सयाजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

श्री संत अच्युत महाराज यांची तपोभूमी असलेले शिवभवन हे या यात्रेचे विशेष आकर्षण आहे. भूमिगत तीन शिवलिंगे, प्राचीन शिवपंचायतन आणि संतांच्या आध्यात्मिक साधनेचा समृद्ध वारसा लाभलेले हे स्थान भाविकांसाठी अत्यंत पवित्र व श्रद्धेचे केंद्र मानले जाते.रुक्मिणीचे माहेरघर म्हणून ओळख असलेल्या कौंडण्यपुराला पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्वही लाभले आहे. भगवान श्रीकृष्णाने याच नगरीतील अंबिका मातेच्या मंदिरातून रुक्मिणीचे हरण केल्याची पौराणिक कथा प्रसिद्ध आहे.

त्यामुळे भक्ती, श्रद्धा आणि ऐतिहासिक परंपरेचा अनोखा संगम असलेल्या या भूमीला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

वारकऱ्यांच्या भक्तिरसपूर्ण दिंड्या, टाळ-मृदुंगाचा निनाद, विठ्ठलनामाचा गजर आणि सेवाभावाने भारावलेले वातावरण यामुळे कौंडण्यपुरातील हा सोहळा अविस्मरणीय ठरणार आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलसेवा या भावनेतून आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक एकात्मता, संतपरंपरेचा सन्मान आणि सेवाभावाचा प्रेरणादायी आविष्कार आहे.या वर्षी रुक्मिणी माते करिता १०० मीटरची साडी सुरत येथील भक्तांकडून अर्पण केली जाणार आहे, हे यावर्षीचे विशेष उल्लेखनीय राहणार आहे.या पवित्र भक्तिसोहळ्यात भाविकांनी, वारकरी बांधवांनी आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुधीर दिवे (मार्गदर्शक, स्व. वामनराव दिवे चॅरिटेबल ट्रस्ट) यांनी केले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३५५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

वाढत्या वाहतुकीचा महामार्गाला विळखा

यवतमाळ-अमरावती मार्गाचे चौपदरीकरण कधी?

अरुंद रस्त्यावर वाहनांची प्रचंड वर्दळ; ओव्हरटेकिंगचा धोका वाढला, अपघातांना निमंत्रण

अमरावती/का.प्र.

अमरावती आणि यवतमाळ या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांना जोडणारा यवतमाळ- अमरावती महामार्ग सध्या वाढत्या वाहतुकीच्या प्रचंड दबावाखाली आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असताना रस्त्याची रुंदी मात्र मर्यादितच असल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अरुंद रस्ता, अवजड वाहनांची सततची वर्दळ, धोकादायक ओव्हरटेकिंग आणि अपघातांचा वाढता धोका पाहता या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जिल्ह्यातील अनेक प्रमुख मार्गांचे रुंदीकरण आणि चौपदरीकरण होत असताना यवतमाळ-अमरावती हा महत्त्वाचा मार्ग अद्याप अपेक्षित विकासाच्या प्रतीक्षेत असल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

या महामार्गावरून आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेशाकडे जाणाऱ्या वाहनांची दिवसरात्र मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. प्रवासी वाहतूक, मालवाहतूक, खासगी वाहने तसेच अवजड वाहनांचा सततचा राबता असल्याने या मार्गाला दळणवळणाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. त्यातच महामार्गालगत असलेल्या मोठ्या लोकवस्तीच्या गावांमुळे स्थानिक नागरिक, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांचीही मोठी वर्दळ असते. मात्र,अपघातात एखाद्या कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा जीव गेल्यास त्या कुटुंबावर आर्थिक, सामाजिक आणि मानसिक संकट कोसळते.

महामार्गाच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्ष असून, त्यापैकी काही वृक्ष जीर्ण व धोकादायक अवस्थेत आहेत. चौपदरीकरण करताना आवश्यक त्या ठिकाणी वृक्ष हटविण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. मात्र, विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचे नुकसान होणार नाही, याचीही दक्षता घेणे गरजेचे आहे.यवतमाळ-अमरावती महामार्गावरील सद्यस्थितीतील वाहतूक क्षमता,



अपघातप्रवण ठिकाणे, भविष्यातील वाहनसंख्या आणि रस्त्यालगतच्या गावांच्या गरजा लक्षात घेऊन शासनाने तातडीने सविस्तर सर्वेक्षण करावे. त्यानुसार चौपदरीकरणाचा आराखडा तयार करून आवश्यक निधी मंजूर करावा आणि प्रत्यक्ष कामाला गती द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.प्रवासी, वाहनचालक, व्यापारी, स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांच्या दृष्टीने हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढत्या वाहतुकीचा ताण, अपघातांचा धोका आणि भविष्यातील विकासाची गरज लक्षात घेता यवतमाळ-अमरावती महामार्गाचे चौपदरीकरण ही आता केवळ विकासाची मागणी राहिलेली नसून सुरक्षित प्रवासासाठीची अत्यावश्यक गरज बनली आहे. शासन या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन चौपदरीकरणाबाबत ठोस निर्णय कधी घेणार, याकडे संपूर्ण परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांच्या नावाने संमेलन

अंगणवाडी आणि आरोग्य सेविकांची जमविली गर्दी

शेतकऱ्यांनाच मात्र ठेवले दूर; माजी मंत्री यशोमती ठाकूर यांची टीका

अमरावती/का.प्र.

अमरावतीत आयोजित करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज संमेलना'वरून माजी मंत्री तथा काँग्रेस नेत्या ॲड. यशोमती ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारवर जोरदार टीका केली आहे. शेतकऱ्यांच्या नावाने संमेलन आयोजित केले जात असताना प्रत्यक्षात शेतकऱ्यांनाच या संमेलनापासून दूर ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या कार्यक्रमासाठी केवळ अधिकारी वर्गाला बोलावण्यात आले असून, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य सेविकांना उपस्थित राहण्यास भाग पाडून गर्दी जमवण्यात आल्याची टीकाही त्यांनी केली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत अमरावती विभागस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा, सन २०२६-२७ च्या अभियानासंदर्भातील विभागस्तरीय कार्यशाळा तसेच 'दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन शनिवारी पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात करण्यात आले होते, त्यावरून यशोमती ठाकूर यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

शेतकऱ्यांच्या खात्यात अवघे पाच हजार रुपये जमा केले जात



असताना दुसरीकडे संमेलनावर लाखो रुपयांची उधळपट्टी केली जात आहे. या संमेलनासाठी येणाऱ्या मंत्र्यांच्या आलिशान वाहनांचा खर्च कोणाच्या पैशातून केला जाणार आहे? एकीकडे जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती असताना अशा प्रकारे सरकारी पैशांची उधळपट्टी कशासाठी? शेतीला पाणी देण्याचे नियोजन करण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत; मात्र अशा कार्यक्रमांवर खर्च करण्यासाठी पैसा उपलब्ध आहे, असा सवाल यशोमती ठाकूर यांनी उपस्थित केला.

जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरूच असून, ऑक्टोबर महिन्यात तब्बल २८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. नोव्हेंबर महिन्यातही आत्महत्यांच्या आणखी ८ ते ९ घटना समोर आल्याचे यशोमती ठाकूर यांनी नमूद केले. एका बाजूला शेतकरी कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळत असताना दुसरीकडे संमेलनाच्या रेड कार्पेट टाकून उत्सव साजरा करण्याची सरकारची भूमिका अत्यंत असंवेदनशील असल्याची टीका त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या नावाने कार्यक्रम आयोजित करून त्याच शेतकऱ्यांना उपस्थित न ठेवणे, त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे आणि दुसरीकडे सरकारी पैशांची उधळपट्टी करणे, हे सरकारच्या कार्यपद्धतीचे दुर्दैवी चित्र आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अनावश्यक खर्चाला लगाम घालावा आणि शेतकऱ्यांच्या पाणी, शेती व आर्थिक प्रश्नांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी ॲड. यशोमती ठाकूर यांनी केली.

जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत सीसीटीव्ही यंत्रणा

अंजनगाव बारी- विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शाळेतील शिस्त आणि शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद मुलांची शाळा,अंजनगाव बारी येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोषण जयसिंग पुनिया यांच्या पुढाकाराने आणि सर्वांच्या सहकार्याने हा महत्त्वपूर्ण उपक्रम यशस्वी झाला आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष, सर्व समिती सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच पालकांच्या सहकार्याने व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शाळेच्या परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. त्यामुळे शाळेतील विविध भागांवर देखरेख ठेवणे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे तसेच शाळेतील शिस्त व सुव्यवस्था राखण्यास मदत होणार आहे.आजच्या काळात शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा अत्यंत महत्त्वाचा विषय बनला आहे. या पार्श्वभूमीवर शाळेत सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचा निर्णय हा काळाची गरज ओळखून उचललेले सकारात्मक पाऊल ठरत आहे.००१या उपक्रमामुळे पालकांमध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.सर्वांच्या एकजुटीने आणि सहकार्याने शाळेच्या विकासाला नवी दिशा मिळत आहे.

निवृत्तीवेतनधारकांच्या जीवन प्रमाणपत्रासाठी आज विशेष कार्यशाळा

अमरावती - निवृत्तीवेतनधारकांना वार्षिक जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, जलद व अचूक व्हावी, यासाठी अमरावती विभाग, अमरावती व वरिष्ठ कोषागार कार्यालय, अमरावती यांच्यातर्फे सोमवार,२३ नोव्हेंबर रोजी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा जिल्हा कोषागार कार्यालय, अमरावती येथील जिजाऊ सभागृहात सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे.

या कार्यशाळेत निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल पद्धतीने जीवन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी 'जीवन प्रमाण ॲप' व फेस ऑथेंटिकेशन याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यशाळेत जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया, आवश्यक तांत्रिक बाबी, ॲपचा वापर, फेस ऑथेंटिकेशन, तसेच प्रत्यक्ष नोंदणीबाबत माहिती देण्यात येणार आहे. निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल पद्धतीने जीवन प्रमाणपत्र सादर करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन व प्रशिक्षणही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

निवृत्तीवेतनधारकांनी आधार कार्ड (मोबाईल क्रमांक नोंदणीकृत असलेले), पी.पी.ओ. (PPO) क्रमांक किंवा निवृत्तीवेतन पुस्तिका, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत तसेच ओटीपी प्राप्त करण्यासाठी व ॲप वापरण्यासाठी स्मार्टफोन सोबत आणणे

आवश्यक आहे. अमरावती विभाग व जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारकांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे, तसेच डिजिटल पद्धतीने जीवन प्रमाणपत्र सादर करण्याच्या प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती आणि वरिष्ठ कोषागार अधिकारी, अमरावती यांनी केले आहे.

संक्षिप्त



आष्टी-टाकरखेडा संभू-साऊर परिसरावर धुक्याची दाट चादर

आष्टी, टाकरखेडा संभू आणि साऊर परिसरात रविवारी पहाटेपासून दाट धुक्याने परिसर व्यापला. धुक्यामुळे रस्त्यावरील दृश्यमानता मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने वाहनचालकांची चांगलीच कसरत झाली.दाट धुक्यात समोरील वाहन व रस्ता स्पष्ट दिसत नसल्याने वाहनचालकांना वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात कमी करावा लागत होता. अनेक वाहनचालकांनी हेडलाईट सुरू ठेवून सावधगिरीने प्रवास केला. अचानक समोर येणारी वाहने, वळणे आणि रस्त्याच्या कडांचा अंदाज घेण्यात अडचणी येत असल्याने अपघाताचा धोका वाढला होता.त्यामुळे सकाळच्या वेळेत वाहतुकीचा वेगही मंदावल्याचे चित्र दिसून आले.

छायाचित्र : संतोष शेंडे, टाकरखेडा संभू

शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ लागू

अमरावती- शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश २३ नोव्हेंबर ते ७ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

श्री.क्षेत्र कौंडण्यपूर येथे बुधवारी दहीहंडी सोहळा

श्री.विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात धार्मिक कार्यक्रम

कुऱ्हा/वार्ताहर

विदर्भातील प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे कार्तिक मास सोहळा २०२६ अंतर्गत कार्तिक प्रतिपदा (दहीहंडी) निमित्त बुधवार,२५ नोव्हेंबर रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संस्थानच्या वतीने विविध धार्मिक, आध्यात्मिक व भक्तिमय कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण कौंडण्यपूर नगरी विठ्ठलनामाच्या गजराने आणि भक्तिमय वातावरणाने दुमदुमणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ५ ते सकाळी ७ वाजेपर्यंत श्रींच्या महापूजेने होणार असून, ही महापूजा सौ. व श्री. राजेश वानखडे (आमदार, तिवसा विधानसभा मतदारसंघ) तसेच सौ. व श्री. नामदेव अमाळकर (अध्यक्ष, श्री विठ्ठल-रुक्मिणी




संस्थान) यांच्या शुभहस्ते संस्थानच्या समस्त विश्वस्त मंडळींच्या उपस्थितीत होईल.या सोहळ्याला संत जिनेंद्रनाथ महाराज, जगद्गुरू श्री राजराजेश्वराचार्य महाराज (माऊली सरकार), श्री संत सचिनदेव महाराज व संत सयाजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. संत-महंतांच्या पावन सान्निध्यात तसेच सर्व पदाधिकारी व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार आहे. कार्तिक मासातील या पवित्र पर्वानिमित्त होणाऱ्या महापूजा, नगरप्रदक्षिणा, भजन, कीर्तन आणि दहीहंडी सोहळ्याच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाची परंपरा, भक्तीभाव व धार्मिक एकात्मतेचे दर्शन घडणार आहे. त्यामुळे परिसरातील तसेच दूरवरून येणाऱ्या सर्व भाविकांनी या मंगलमय सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा व संत-महंतांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन सदानंद साधू, सचिव, श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, श्री क्षेत्र कौंडण्यपूर हे करणार आहेत.

माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन

खल्लार- खल्लार हायस्कूलमध्ये दहावी २००२ व बारावी २००४ च्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहसंमेलन मेळावा रविवार,अत्यंत उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या शालेय आठवणींना उजाळा देत मैत्रीचे बंध पुन्हा दृढ केले. या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी अ. वि.चारथळ होते. प्रमुख पाहुणे म्हणून एस.के.ठाकरे, एस.एस. श्रीवास्तव, जि.एन.साबळे, कु.जे. बी.बांबल शिक्षकेतर कर्मचारी एन.व्ही.पाटील प्रदीप पारशिवकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन माजी विद्यार्थी अमोल खंडारे यांनी प्रस्ताविक मंगेश नाकट आभार उमेश गादे यांनी केले.यावेळी उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा देत मार्गदर्शन केले.अनेक वर्षांनंतर शिक्षक आणि विद्यार्थी एकत्र आल्याने संपूर्ण वातावरण भावनिक व आनंदमय झाले होते.सर्व माजी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा स्नेहमेळावा अविस्मरणीय ठरला.

नि.गु. उर्फ बाबासाहेब देशमुख पुसदेकर यांचे निधन

शिराळा- नजिकच्या पुसदा येथील प्रतिष्ठित नागरिक नि.गु.उर्फ



बाबासाहेब देशमुख पुसदेकर यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा चे सदस्य होते. काँग्रेस कार्यकर्ता शाम देशमुख यांचे वडील आहे. राजकारणील अनुभवी व्यक्तीमहत्व त्यांचे नाव लैकिक होते. ते वयाच्या ३० व्या वर्षापासून सलग १० वर्षे पुसदा चे संरपंच राहिले. त्यांच्या पश्चात एक मुलगा शाम देशमुख व तीन मुली असा आप्तपरिवार आहे. रविवार २२ नोव्हेंबरला त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

ज्येष्ठांची दिवाळी : सालईबन येथे मनजीत सिंग यांची अनोखी भेट!





निसर्गाच्या सान्निध्यात तीन दिवसीय निवासी शिबीर

खामगाव- माणसाच्या मनात जसे विचार असतात, तशीच परिस्थिती त्याच्या आयुष्यात आकार घेत असते. सकारात्मक विचारांतून सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि त्याचे प्रतिबिंब जीवनात उमटते, असे म्हटले जाते. प्रसिद्ध ऑस्ट्रेलियन लेखिका रोंडा बर्न यांनी मांडलेल्या 'आकर्षणाच्या सिद्धांताचा' (लॉ ऑफ अट्रॅक्शन) प्रत्यक्ष अनुभव देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे मनजीत सिंग! निसर्गाप्रती संपूर्ण आयुष्य समर्पित करून समाजसेवेचा वसा घेतलेल्या मनजीत सिंग यांनी सालईबन येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केलेल्या अनोख्या दिवाळी शिबिरातून सामाजिक उत्तरदायित्वाचा सुंदर आदर्श समाजासमोर ठेवला आहे.महात्मा गांधी, विनोबा भावे, बाबा आमटे आणि ठाकूरदासजी बंग यांच्या विचारांनी प्रेरित होऊन मनजीत सिंग यांनी एका व्यापक सामाजिक कार्याचा पाया रचला आहे. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतून मिळालेली जळगाव जामोद तालुक्यातील वडपाणी या आदिवासी गावाजवळील ७२ एकर जमीन महात्मा गांधी लोकसेवा संघाच्या मालकीची आहे. सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी सालई वृक्षांनी नटलेल्या या परिसरात तरुणाई फाउंडेशन, खामगावचे अध्यक्ष मनजीत सिंग यांच्या पुढाकारातून वृक्षारोपण आणि विविध सेवाकार्य उभे राहत आहे. या निसर्गरम्य प्रकल्पाला 'सालईबन' असे नाव देण्यात आले आहे.

याच सालईबनमध्ये मनजीत सिंग यांनी आयोजित केलेला 'ज्येष्ठांची दिवाळी' हा उपक्रम विशेष उल्लेखनीय ठरला आहे.आजच्या धावपळीच्या आणि भौतिक सुखसुविधांच्या युगात वृद्धाश्रमांची वाढती संख्या ही चिंतेची बाब आहे. ऐशआराम, नोकरचाकर आणि आधुनिक सुविधांच्या मागे धावताना अनेकदा ज्यांनी आपल्याला वाढवले, घडवले त्या आई-वडिलांकडे आणि घरातील ज्येष्ठांकडे दुर्लक्ष होते. आयुष्यभर मुलांसाठी कष्ट करणाऱ्या माता-पित्यांना वृद्धापकाळात एकाकी जीवन जगावे लागते, हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे.'साताची माय अन् खाटल्यावर जीव जाय' या म्हणीचा अनुभव अनेक ज्येष्ठांच्या वाट्याला येतो. याच सामाजिक वास्तवाची जाणीव मनजीत सिंग यांना झाली आणि त्यातूनच ज्येष्ठांसाठी वेगळ्या पद्धतीने दिवाळी साजरी करण्याची संकल्पना पुढे आली.दिवाळीनिमित्त वृद्धाश्रम, अनाथालये, रुग्णालये तसेच आदिवासी आणि पारधी वस्त्यांमध्ये मिठाई वाटपाचे अनेक उपक्रम राबविले जातात. मात्र, ज्येष्ठ नागरिकांना निसर्गाच्या सान्निध्यात काही दिवस आनंदाने, तणावमुक्त वातावरणात आणि आपुलकीच्या सहवासात घालवता यावेत, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला सालईबनमधील 'ज्येष्ठांची दिवाळी' हा उपक्रम खऱ्या अर्थाने वेगळा ठरला. महात्मा गांधी लोकसेवा मंच आणि तरुणाई फाउंडेशन, खामगाव यांच्या वतीने 'तीन दिवसीय निवासी शिबिर आनंदोत्सव : ज्येष्ठ नागरिक दिवाळी' या नावाने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. विदर्भातील पासष्टी-सत्तरी पार केलेली दहा ज्येष्ठ दांपत्ये या शिबिरात सहभागी झाली होती.

शिबिराची दिनचर्या अत्यंत शिस्तबद्ध, आरोग्यदायी आणि आनंददायी होती. सकाळी साडेपाच वाजता उठून सहा वाजता सर्वांनी मैदानावर एकत्र यायचे. तेथे गुळाचा बिनदुधाचा चहा अर्थात काढा घेऊन दिवसाची सुरुवात व्हायची. त्यानंतर हॉलमध्ये अर्धा ते पाऊण तास योगासने आणि विविध व्यायामप्रकार घेतले जात. यानंतर पक्ष्यांच्या किलबिलाटाच्या नैसर्गिक संगीतामध्ये वनभ्रमंतीचा आनंद घेण्यात आला. दोन तासांच्या विश्रांतीनंतर दुपारी एक वाजता सात्त्विक भोजनाचा आस्वाद घेतला जात असे. भोजनामध्ये तंतुमय (फायबरयुक्त) आहाराला प्राधान्य देत भाजीपाल्याचा अधिक वापर करण्यात आला होता.त्यानंतर विविध विषयांवरील बौद्धिक कार्यक्रम होत. एका रात्री कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने केशर,बदाम,चारोळी आणि काजू-पिस्त्यांनी समृद्ध असलेल्या गरमागरम मसाला दुधाचा आस्वाद घेताना सर्वांनी चांदण्यांनी उजळलेल्या रात्रीचा आनंद लुटला. शाहीर दिग्रसकर यांच्या भारदस्त आवाजातील भक्तिगीते आणि राष्ट्रभक्तिपर गीतांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. प्रवीण रेवतकर यांनी हरिद्वार येथील पं. श्रीराम शर्मा आचार्य यांनी स्थापन केलेल्या शांतिकुंज गायत्री तीर्थाची माहिती दिली. तर पत्रकार प्रा. न. मा. जोशी यांनी सत्य, धर्म, शांती, प्रेम आणि अहिंसा या मानवी मूल्यांची शिकवण देणाऱ्या सत्यसाई बाबांच्या विचारांची ओळख करून दिली.शिबिरातील आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे 'शांतीस्थळ' येथे उभारण्यात आलेले महात्मा गांधी यांचे अनोखे शिल्प! राजेंद्र कोल्हे यांच्या प्रयत्नातून साकारलेल्या या कलाकृतीतून दृष्टीभ्रमावर आधारित कलेचा अद्भुत आविष्कार पाहायला मिळतो. सुमारे २५ फूट उंचीचे हे शिल्प १७ लोखंडी खांबांवर उभारण्यात आले असून, पोलादाच्या पट्ट्या आणि कापलेल्या पोलादी पत्र्यांचा त्यासाठी वापर करण्यात आला आहे. या कलेला 'अनामॉर्फिक स्कल्प्चर' किंवा 'इल्युजन आर्ट' असे म्हणतात. जवळून पाहिल्यास केवळ विखुरलेले लोखंडी खांब आणि पोलादी तुकडे दिसतात; मात्र विशिष्ट अंतरावरून आणि विशिष्ट कोनातून पाहिल्यास त्यातून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हसतमुख प्रतिमा साकारलेली दिसते. ही कलाकृती पाहून शिबिरार्थी भारावून गेले. शिबिराच्या समारोपप्रसंगी पत्रकार न. मा. जोशी यांनी मनजीत सिंग यांच्या कार्याचे आणि त्यांच्या प्रेमळ, सर्वांचे मन जिंकणाऱ्या स्वभावाचे कौतुक करत, 'मनजीत सिंग म्हणजे माणसातील देव,' असे गौरवोद्गार काढले. त्यावर मनजीत सिंग यांनी नम्रपणे, 'मला देव करू नका, माणूसच राहू द्या,' असे उत्तर दिले. त्यांच्या या उत्तरातून त्यांची विनम्रता आणि सेवाभाव प्रकर्षाने जाणवला. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टिळक राष्ट्रीय विद्यालयाचे अध्यक्ष सुधाकर अजबे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य जीवन देशमुख आणि पुष्पाताई अजबे उपस्थित होते. प्राचार्य जीवन देशमुख यांनी मनजीत सिंग यांना सालईबनच्या निर्मितीची प्रेरणा कशी मिळाली आणि त्यातून सामाजिक कार्याचा विस्तार कसा झाला, याचे सविस्तर विवेचन केले. यावेळी न. मा. जोशी यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम दरवर्षी आयोजित करण्याची विनंती आयोजकांना केली. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी पुरस्काराने गौरविण्यात आलेले शाहीर दिग्रसकर, मधुकर कोल्हे, प्रवीण गुजर, टक्के बोराडे, रामदास श्याम उमाळे, नंदू का. सोले आणि विदीप अकोलेकर यांनीही यावेळी आपली मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन मनजीत सिंग यांनी केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अदानी प्रकल्पाविरोधात युवक काँग्रेसचे 'चिपको आंदोलन'

अमरावती/प्रतिनिधीः आडनदी परिसरात अदानी समूहाच्या २४० हेक्टर वनजमिनीवरील प्रस्तावित विद्युत प्रकल्पाला विरोध करण्यासाठी आणि जंगल वाचवण्यासाठी युवक काँग्रेसच्या वतीने 'चिपको आंदोलन' करण्यात आले. माती परीक्षणाच्या नावाखाली येथे शंभराहून अधिक झाडे तोडण्यात आल्याने स्थानिक आदिवासींमध्ये तीव्र संताप आहे. टायगर प्रोजेक्टमुळे स्थानिकांना रस्ते, पूल, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी परवानगी मिळत नसताना, उद्योगपतींच्या प्रकल्पाला वनजमीन कशी दिली जाते, असा सवाल युवक काँग्रेसचे



जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी उपस्थित केला. या प्रकल्पामुळे विस्थापनाची भीती असून, स्वयंचलित यंत्रणांमुळे स्थानिकांना रोजगार मिळणेही कठीण आहे. त्यामुळे आदिवासींचे हक्क व जंगलाचा विनाश करणारा हा प्रकल्प तात्काळ रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात राहुल येवले यांच्यासह यावेळी रतिराम भुसुम,गणेश बेलसरे,प्रकाश झारखंडे,दयाराम मोरे ,रामा बेलसरे ,संजू भुसुम ,दिपक बेलसरे, दशरथ बगाये, रामसिंग सराटे, चिंध्या हरसुले, हरिओम मोरे, राजेंद्र नागले, किसन अखंडे,बेलसरे उपस्थित होते.

मेळघाटातील प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पस्थळी बोअरवेलची तोडफोड

प्रकल्पस्थळी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्याचा आरोप

शिवसेनेचा आक्रमक इशारा

अमरावती/प्रतिनिधीः- मेळघाट परिसरातील आड नदीकाठी अदानी समूहातर्फे प्रस्तावित असलेल्या जलविद्युत प्रकल्पाच्या ठिकाणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पदाधिकाऱ्यांनी आणि शिवसैनिकांनी रविवारी (दि.२२) धडक देत जोरदार निदर्शने केली. यावेळी संतप्त शिवसैनिकांनी प्रकल्पाच्या ठिकाणची बोअरवेल फोडून ती बंद पाडली.

प्रकल्पस्थळी पोहोचल्यानंतर मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले. यावर तीव्र



संताप व्यक्त करत, 'ज्या कुऱ्हाडीने यापुढे झाडे तोडाल, त्याच कुऱ्हाडीने संबंधित अधिकाऱ्यांचे हात छाटू,' असा थेट व खळबळजनक इशारा शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी दिला.

मेळघाटची जैवविविधता, वन्यजीव आणि पर्यावरणाला धोका निर्माण करणारा तसेच वृक्षतोड करणारा कोणताही प्रकल्प मेळघाटावर लादू देणार नाही, अशी ठाम भूमिका यावेळी ☞(पान २ वर)

मॉर्निंग वॉकला गेलेल्या युवकाला अज्ञात वाहनाची धडक

धामणगाव रेल्वे-अंजनसिंगी मार्गावरील अपघात

उपचारादरम्यान मृत्यू

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः- सकाळच्या दाट धुक्यामुळे रस्त्यावरील दृश्यमानता कमी झालेली असतानाच मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या ४२ वर्षीय युवकाला अज्ञात चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या युवकाचा अमरावती येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. कैलास खंडारे असे मृताचे नाव असून, या घटनेमुळे अशोकनगर परिसरात शोककळा पसरली आहे.

प्राप्त माहितीनुसार, अशोकनगर येथील रहिवासी कैलास खंडारे हे रविवारी सकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडले होते. दरम्यान,



धामणगाव रेल्वे-अंजनसिंगी मार्गावरून जात असताना दाट धुक्यामुळे रस्त्यावरील दृश्यमानता कमी होती. याचवेळी भरधाव आलेल्या अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात खंडारे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्परता ☞(पान २ वर)

१४ वर्षीय रोहन जानवाडेचे 'मॅन्युप्लेटर' इंग्रजी पुस्तक प्रकाशित

अमरावती/प्रतिनिधीः- अवघ्या १४ व्या वर्षी आणि इयत्ता नववीत शिकत असतानाच अमरावतीच्या रोहन हेमंत जानवाडे या विद्यार्थ्याने 'मॅन्युप्लेटर' (Manipulator) हे इंग्रजी पुस्तक लिहून लक्ष वेधून घेतले आहे. दुसऱ्यांना आपल्या पद्धतीने हाताळणाऱ्या वृत्तीवर आधारित या पुस्तकाचे चेन्नई व हैदराबाद येथील प्रकाशनाने प्रकाशन केले असून, ते अमेझॉन आणि फ्लिपकार्टवर विक्रीस उपलब्ध झाले आहे. या



निमित्ताने स्वराध्या ग्रुपच्या वतीने रोहनचा गौरवही करण्यात आला.शहरातील अरुणोदय इंग्लिश हायस्कुलमध्ये ९ व्या

-अमेझॉन-फ्लिपकार्टवर उपलब्ध

वर्गात शिकणाऱ्या रोहन हेमंत जानवाडे ने इंग्रजी भाषेत पुस्तक लिहिण्याचे ठरवले अन विषय निवडला मेन्यूप्लेटर अर्थात आपल्या पद्धतीने दुसऱ्यांना काबीज करणारे. यात मिस्टर क्स च्या माध्यमातून, गोड बोलणारे, आपले काम काढून घेणारे, आपल्यातच विष कालवणारे असे अनेक किस्से ,अनुभव छोट्या छोट्या कथा पेरल्या आहेत.

चेन्नई व हैद्राबाद च्या प्रकाशनाने ☞(पान २ वर)

नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे पदरात अद्यापही निराशाच

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- राज्य शासनाने शेतकऱ्यांकरता दोन लाख रुपयांची कर्जमाफी ची घोषणा केली. कर्जमाफीचा लाभ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना मिळाला परंतु नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे पदरात मात्र अद्यापही आश्वासनाची प्रतीक्षाच पडली असल्याने नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये शासनाविषयी नाराजीचा सूर असल्याचे दिसून येते. वेळेवर कर्जाची परतफेड करून आर्थिक जबाबदारी पार पाडून बँकेचे व्यवहार सुरळीत ठेवणाऱ्या शेतकऱ्याला अन्याय सहन करावा लागत आहे. नियमित कर्ज भरणे म्हणजे आमची चूक आहे काय ? असा सवाल शेतकरी वर्गामधून उपस्थित होत आहे. शासनाकडून कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाखाची कर्जमाफी करून दिलासा देण्यात आला परंतु नियमित कर्जदाराला प्रोत्साहन




पर अनुदान देण्यात येईल या शासनाच्या घोषणेवर अद्यापही कोणत्याच प्रकारची प्रक्रिया सुरू नसल्याने ही घोषणा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना मृगजळ तर ठरणार नाही ना? अशी शंका शेतकऱ्यांमध्ये असून शासनाच्या प्रोत्साहन अनुदान या घोषणेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

दिवाळीनिमित्त शेतकऱ्यांना दुष्काळी मदत म्हणून पाच हजार रुपये देण्यात आले असले तरी या मदतीपासून अनेक शेतकरी अद्यापही वंचित आहे. पात्र असूनही ☞(पान २ वर)

भरधाव दुचाकीवर हुल्लडबाजी, तिघेजण पोलिसांच्या ताब्यात

चाकू आणि दुचाकी जप्त

खल्लार/प्रतिनिधीः- दुचाकी चालविताना हुल्लडबाजी करणाऱ्या तिघांना दर्यापूर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक चाकू आणि दुचाकी असा एकूण १५ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई शनिवार २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास एकविरा



शाळेसमोर करण्यात आली आहे. एका विधीसंघर्षित बालकासह दर्यापूर पोलिसांनी अभिनंदन आशीर्वाद डोंगरदिवे (वय १९) व रोहित मनोज लोखंडे (वय २२) तिघेही रा. दर्यापूर यांना ताब्यात घेतले.

भरधाव दुचाकीवर हुल्लडबाजी करणे त्यांना चांगलेच भोवले.

दर्यापूर ठाण्यातील पोलिस पथक शहरातील चांदूर-जहानपूर रोडस्थीत एकविरा शाळेसमोर असताना एका दुचाकीवर (एम.एच २७-ईजी ७३५०) तिघे जण जात असल्याचे दिसले. दुचाकीचालक कोणतीही काळजी न घेता भरधाव वेगाने वाहन चालवत होता, तर मागे बसलेल्या तरुणाच्या ☞(पान २ वर)

शेतकऱ्यांची कर्जमाफीच्या नावाखाली थट्टा

आगामी निवडणुकीत जनता सरकारला जागा दाखवेल : बबलू देशमुख

-अचलपूर युवक काँग्रेसचा भव्य कार्यकर्ता मेळावा

अचलपूर/प्रतिनिधीः- पथ्रोट येथील बाबाजी फार्म हाऊस सभागृहात अचलपूर तालुका युवक काँग्रेसचा भव्य कार्यकर्ता मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या मेळाव्यात अचलपूर तालुका युवक काँग्रेसची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. तसेच तालुक्यातील विविध गावांमधील नवनियुक्त युवा पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करून संघटनात्मक जबाबदारी सोपविण्यात आली.



मेळाव्याला खासदार बळवंतराव वानखडे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य वासंतीताई मंगरोळे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले, संचालक अमोल चिमोटे, देवेंद्र पेटकर, श्रीधर काळे, अमेद्र वर्मा, शाहिद भाई, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नामदेव तनपुरे, अंजनगाव सुर्जीचे तालुकाध्यक्ष प्रमोद दाळु, अचलपूर शहर काँग्रेस अध्यक्ष राहुल गवई, दिनेश वानखडे, सच्चिदानंद बेलसरे, शेख अनिस, नगरसेवक गुड्डू भैया, राहुल गाठे, मामराज कडू, विशाल खानझोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हा काँग्रेस हे ☞(पान २ वर)

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

अमरावती/प्रतिनिधीः- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यानुसार, बावनकुळे श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर समोरील सभागृह येथे सकाळी ११.४५ वाजता श्री अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समिती, श्री क्षेत्र कौंडण्यपूर तर्फे आयोजित 'अंबा रुख्मिणी महोत्सव' कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर ते कौंडण्यपूर येथून मोटारीने नागपूरकडे प्रयाण करतील.



नांदगाव पेठ ग्रामपंचायतवर पुन्हा महिलाराज!

नामाप्र स्त्री आरक्षण,राजकीय मोर्चेबांधणीला प्रारंभ

अमरावती तालुक्यातील ५९ ग्रामपंचायतींचे सरपंच आरक्षण जाहीर

नांदगाव पेठ/प्रतिनिधीः- अमरावती तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या १६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या पत्रानुसार अमरावती तालुक्यातील एकूण ५९ ग्रामपंचायतींचे सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.यामध्ये तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत म्हणून लौकिक असणाऱ्या नांदगाव पेठ ग्रामपंचायत वर पुन्हा महिलाराज येणार असून मागील पंचवार्षिक मध्ये कविता डांगे यांनी आपला कार्यकाळ पूर्ण केला आहे.

या आरक्षण सोडतीकडे तालुक्यातील राजकीय पक्षांचे पदाधिकारी, इच्छुक उमेदवार आणि ग्रामस्थांचे लक्ष लागले होते. आरक्षण जाहीर झाल्यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या दृष्टीने गावागावांतील राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार अनुसूचित जाती प्रवर्गातील इंदला, लोणटेक, उखळखेड, सावर्डी, जळका, आमला, पिंप्री यादगीरे, ब्राह्मणवाडा भगत, कापूसतळणी, कठोरा खुर्द, पिंपळखुटा, वडगाव जिरे, सुकीळी आणि धानोरा कोकाट या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी भानखेडा खुर्द, शेवती जहागीर, पोहरा आणि अंतोरा या ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी मलखापूर, टेंभा, ब्राह्मणवाडा गोविंदपूर, गोपाळपूर, देवरवाडा, सालोरा खुर्द,☞(पान २ वर)

१७ वर्षीय बालकाचा सर्पदंशाने मृत्यू

तिवसा येथील घटना

तिवसा/प्रतिनिधीः- वडील गेल्यानंतर कुटुंबाचा आधारवड म्हणून जिद्दीने काम करणाऱ्या १७ वर्षीय बालकाचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याची घटना आज २२ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास तिवसा येथे घडली.

धिरज संतोष बिजवे (वय १७,रा.समर्थ चौक, तिवसा) असे मृतक बालकाचे नाव आहे.शनिवार २१ नोव्हेंबर रोजी घरातील सर्व जण रात्री जेवण करून झोपले असतांना अचानक रात्रीच्या साखर झोपेत असताना सुमारे ४ वाजता दरम्यान धीरज ला त्याच्या हाताला काही तरी चावल्याचा भास झाला. त्यामुळे पाणी पिऊन तो पुन्हा झोपी गेला, दरम्यान पहाटे ६ वाजता त्याला स्वास घेण्यासाठी त्रास झाल्याने तातडीने तिवसा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात



आले.मात्र उपचारा आधीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.तिवसा पोलीसांनी पंचनामा करत मर्ग दाखल केला आहे.१७ वर्षीय धिरजच्या मृत्यूने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

तीन वर्षा पूर्वी वडिलांचे छत्र हरवले

मृतक धिरजच्या वडिलाचे तीन वर्षापूर्वीच निधन झाले. त्यामुळे घरातील उदरनिर्वाहाची जबाबदारी धीरजवर होती. शिक्षणासह तो भाजीपाला विक्री करून आईला उदरनिर्वाहासाठी मदत करत होता.धिरजला एक लहान भाऊ आहे. कमी वयातच वडिलांचे छत्र हरविल्याने धिरजवर कुटुंबाची जबाबदारी होती.मात्र मोठ्या मुलाच्या निधनाने आईला मोठा धक्का बसला असून परिसरात शोककाळ पसरला आहे.

क्रीडा महोत्सवः आरसीसी क्रिकेट क्लबने पटकावला प्रथम क्रमांक

सुयश बहुउद्देशीय संस्थेचा उपक्रम; २७ संघांचा सहभाग

क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः- चांदूर रेल्वे येथे सुयश बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित क्रीडा महोत्सव २०२६ अंतर्गत तीन दिवसीय खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या स्पर्धेमध्ये अमरावती, अकोला, धामणगाव रेल्वे व चांदूर रेल्वे येथील एकूण २७ संघांनी सहभाग नोंदविला. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेमुळे शहरात क्रिकेटप्रेमींमध्ये उत्साहाचे



वातावरण निर्माण झाले होते.

स्पर्धेतील अंतिम विजेतेपदाचा मान आरसीसी क्रिकेट क्लब, चांदूर रेल्वे या संघाने मिळविला. प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये रोख व भव्य ट्रॉफी देऊन संघाचा गौरव करण्यात आला. तर द्वितीय क्रमांकाचे ११ हजार रुपये रोख व ट्रॉफीचे पारितोषिक सूतगिरणी क्रिकेट क्लब, अमरावती या संघाने पटकावले.

याशिवाय वैयक्तिक पुरस्कारांमध्ये मॅन ऑफ द सिरीज निलेश गोळे, मॅन ऑफ द मॅच योगेश खेरकर, बेस्ट बॉलर करण आणि बेस्ट☞(पान २ वर)

ॲड. उर्वी केचे यांना पीएच.डी. पदवी प्रदान



अमरावती/प्रतिनिधीः- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने ॲड. उर्वी सतेज केचे - यावलीकर यांना विधी विषयात पीएच.डी. (आचार्य) पदवी प्रदान केली आहे.

'Defining the Contours of Right to Privacy in Digital India: A Comparative Analysis of Data Protection Law and Policy in India and European Union' या विषयावर त्यांनी संशोधन प्रबंध सादर केला. डिजिटल भारतातील गोपनीयतेचा अधिकार आणि भारत व युरोपियन युनियनमधील डेटा संरक्षणविषयक कायद्यांचा तुलनात्मक अभ्यास या संशोधनातून करण्यात आला आहे.

त्यांना डॉ. राजेश जी. पाटील यांचे संशोधन मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख, संशोधन केंद्र प्रमुख प्रा. डॉ. विजयकुमार चौबे, प्रा. डॉ. प्रणय मालवीय, संजय धाकुलकर, मनीष शास्त्री, मुरलीधर खोपडे आणि विवेक सोळंके आणि वैभव इंगळे यांचे सहकार्य लाभले.

या यशात आजी मुक्ता मधुकर केचे, आई- वडील वसुधा व सतेज केचे, पती सुदेश, सासू प्राचार्य रेखा, सासरे प्राचार्य डॉ. राज उर्फ पंडित यावलीकर, दीर सारंग ☞(पान २ वर)

चंद्रकला श्रीखंडकर यांचे निधन

तिवसा/प्रतिनिधीः- शहरातील विद्युत कॉलनी येथील शहीद सचिन श्रीखंडकर यांच्या आई चंद्रकला सुदाम श्रीखंडकर यांचे शनिवारी (दि.२१) रात्री दहा वाजता दरम्यान राहत्या घरी निधन झाले.मृत्यू समयी त्या



७४ वर्षाच्या होत्या.एका दुर्धर आजाराशी त्या झुंज देत होत्या.त्यांच्यावर हिंदू रितीरिवाजाने अंत्यसंस्कार पार पाडण्यात आले. त्यांच्या पश्चात पती सुदाम श्रीखंडकर,दोन मुलं, सुन व नातवंड असा परिवार आहे.